# माणूस

शनिवार । ६ ऑगस्ट १९७७

७५ पैसे

दलित पँथरवर
पुण्याच्या दंगलीची
जबाबदारी
ढकलण्याचा
जो प्रयत्न
पवारगटाकडून
सुरू आहे
तो पटण्यासारखा
नाही.

माहितगार

जे. पीं. च्या
तात्त्विक
व
राजकीय मर्यादा
जमेला धरूनही ते
लोकशाही क्रांतीच्या
संदर्भात
क्रांतिकारक
राहतील !

कॉम्रेड शरद पाटील

**साप्ताहिक माणूस**

वर्ष सतरावे–अंक दहावा

६ ऑगस्ट १९७७

मूल्य पंचाहत्तर पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
□
वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**
□
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
□
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले
□
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
□
दूरध्वनी । ४३४५९

# सप्रेम नमस्कार

## डॉक्टरी ‘लूट’

□ डॉ. अरुण लिमये याचे डॉक्टरांच्या नागविण्याच्या व्यवसायावरील लेखन वाचले. त्याचा परिसंवादाचा अहवाल चागला आहे. परिसवादाच्या विषयावरच आणीबाणीच्या काळात (इतर लेखन बंद असल्यामुळे) एक पहाणी केली होती, त्यातील काही मुद्दे वाचकाच्या माहितीसाठी धाडीत आहे.

१. नवीन डॉक्टराच्या पिढीस एका नव्या विचाराने ग्रस्त केले आहे. हा विचार म्हणजे ठराविक ‘स्टॅंडर्ड ऑफ लिव्हिंग’चा. प्रत्येक डॉक्टरजवळ गाडी (नवीन फियाट!) पाहिजेच, बगला पाहिजेच. फीज पाहिजेच. त्याशिवाय जीवन व्यर्थ आहे बर्शोन गॅस, गोदरेज कपाट, स्टीरिओ वगैरे गोष्टी घरात व दवाखान्यात एखादी फटाकडी रिसेप्शानिस्ट, एअर कंडिशड तपासण्याची खोली, फोमच्या गाद्या व उषा वगैरे या चिजा आवश्यक आहेत असे आज समजले जाते. इग्रजी माध्यम असलेल्या शाळेत मुलाने केस वाढविले नाहीत तर इतर मुलेमुली जशी त्याची हेटाळणी करतात, त्याला जवळ-जवळ वाळीत टाकतात, तसेच हा देखावा न करणाऱ्या डॉक्टरला समाजात आज प्रतिष्ठा मिळत नाही; त्याच्यात काही तरी कमी आहे असे समजले जाते; उपवधू डॉक्टरला ‘प्रोग्रेसिव्ह’ न समजले जाऊन त्यास त्याच्या योग्यतेची वधू मिळत नाही.

२ : ह्या साऱ्या दिखाऊ व अनावश्यक चिजाचा आभास समाजाने निर्माण केला आहे व हा समाज त्या आभासनिर्मितीची किंमत चुकवीत आहे.

३ : पूर्वी अशा खोटया चिजा ‘प्रेस्टीज इश्यू’ म्हणून प्रदर्शित केल्या जात नव्हत्या. बडोद्यात काही वर्षापूर्वी डॉ कीर्तने व डॉ. पेडसे हे त्यांच्या आर्थिक प्रगतीच्या उत्कर्षाच्या काळात पेशंटाच्या घरी सायकल वरून जात होते, त्यात त्याना लाज वाटत नव्हती हे मी प्रत्यक्ष डोळयानी पाहिले आहे वर्ष दोन वर्षे प्रॅक्टिस सुरू करून होतात न होतात तो आजच्या तरुण डॉक्टरला स्वतःच्या गाडीची आवश्यकता भासू लागते.

४ बडोदे शहर तसे लहान आहे पुण्याच्या एकतृतियांश माझ्या पहाणीत साऱ्याच डॉक्टरानी कबूल केले की गाडीची वास्तविक आवश्यकता बडोद्यात काही नाही. रिक्षा पाहिजे तेव्हा मिळते पस्तीस हजार रुपयाचे व्याज जर लक्षात घेतले तर त्या व्याजात आपल्याला रोज रिक्षा फुकट पडेल! पण गाडी नसली तर आपण ‘चालू’ डॉक्टर समजले जाण्याची धास्ती आहे, त्याचे काय?

५ सर्वच स्पेशालिस्टांची प्रॅक्टिस चागली चालत नाही इपोर्टेड गाडी, मग अॅंबॅसेडर आणि आता एक नवी वेस्पा स्कूटर–या क्रमाने माझ्या ओळखीच्या एफ. आर. सी. एस सर्जनाचे अवमूल्यन मी पाहिले आहे. परवडत नाही तर काय करणार?

६ : पैसे झाडाला लागत नाहीत निदान डॉक्टरासाठी. त्याना सारा दिवसभर मेहेनत करून ते मिळवावे लागतात. हे पैसे शेवटी पेशट्स्कडूनच येतात. ज्यांना प्रेस्टीज इश्यू करणाऱ्या चिजा खूप लौकर बाळगाव्या लागतात, त्यांना त्या पेशटाना लुटूनच मिळवाव्या लागतात!

७ : पेशटांना कसे लुटायचे हे शिक्षण आजकाल खुशालचेन्डू व बडया बापाचे बडे बेटे चक्क उघडपणे मेडिकल कॉलेजात मिळवितात. खाजगी कॉलेजात दाखल होण्यासाठी बापाचे ७५ हजार रुपये जो ‘बेटा’ घालवितो तो बेटा प्रॅक्टिस सुरू करताच पैसे कसे ‘लौकर व जास्त’ कमवायचे याच विचारानी ग्रस्त असतो.

८ : मेडिकलचे शिक्षण आज जास्त महागडे झाले आहे. काही दिवसांनी ‘Foo's and poors should not seek admission’ अशा पाट्या मेडिकल कॉलेजांवर दिसल्या तर आश्चर्य वाटावयास नको.

९ : मेडिकल कॉलेजात पदवीधर होणेच एवढे महागडे आहे की पुढच्या एम्. डी. वा

एम. एस चा विचार सामान्य मराठी माणूस करूच शकत नाही. समजा, स्पेशालिस्ट झाला, तर पुढचे लाख, दोन लाख रुपये गुत-विण्यासाठी कोठून आणायचे ? म्हणून मुंबईतील बहुतेक ऑनररीज् व स्पेशालिस्ट्स् शहा व गांधी आहेत आणि बिच्चारे जी. पी. ज् गुप्ते व करंदीकर आहेत. जी. पी. ज् मध्ये पाँश विभागात पुन्हा शहा व गांधीच पाहिजेत !

: १० : अमेरिकेत जाऊन पुढील स्पेशलायझेशन् करायचे आहे ? एक लाख रुपये खर्च करून जाऊ शकता. अमेरिकन वैद्यकीय पद्धती म्हणजे उपकरणे आणि उपकरणे ह्या गॅजेट्सच्या किंमती बेसुमार. म्हणजे टाका लाख, दोन लाख रुपये. आता व्यवसाय सुरू करा. गाडी, बंगला, क्लिनिक वगैरे. प्लस पागडी. म्हणजे पुन्हा दीड दोन लाख रुपये गुतवा. एवढे पैसे गुतविल्यावर तो सुपर-स्पेशालिस्ट डॉक्टर बेसुमार भाव व अनावश्यक शस्त्रक्रिया किंवा प्रोसिजर्स करणार नाही तर काय करणार, ते मला सांगा.

२२-७-७७ **दादूमिया,** बडोदे

---

## क्रियेवीण वाचाळता !

---

स. न. वि. वि.

¤ माणूस साप्ताहिकात बाबा आढाव, साधना साप्ताहिक याबद्दल व त्याच्या संघाविषयीच्या मताबद्दलचा लेख वाचला.

मी प्रथमच सांगतो, की मी संघ किंवा समाजवादी यापैकी कोणी नसून स्वतंत्र विचार करणारा आहे. समाजवादी पहिल्यापासूनच वाचाळपणाबद्दल प्रसिद्ध आहेत मला नवल वाटते की, समाजवादी स्वतःची संघटना म्हणजे राष्ट्रसेवादल निष्ठेने. प्रामाणिकपणाने आणि तनमनधनाने उदयास न आणता; तिचा विकास न करता केवळ संघावर टीका करून काय मिळवतात ? स्वतःचे धोतर फाटके असून पार्श्वभाग दिसत असताना दुसऱ्याला तुझी वाराबंदी फाटकी आहे असे हिणविण्यात काय अर्थ आहे ? संघात आवश्यक त्या सर्व गोष्टींचा विचार करण्यासाठी मोठ्या संख्येने बुद्धिमान माणसे आहेत ते त्याच्या कार्याचे बघून घेतील.

तेव्हा समाजवाद्यांनी दुसऱ्यावर टीका न करता दुसऱ्याचे आवश्यक ते चांगले गुण घेऊन व अनावश्यक ते दूर ठेवून स्वतःची संघटना मजबूत व प्रभावी करावी. वास्तविक समाजवादी मंडळींना जी सामाजिक समता व सामाजिक न्याय अपेक्षित आहे त्यासाठी त्यांच्याकडेसुद्धा संघासारखीच प्रभावी संघटना असणे आवश्यक आहे, परंतु आपली आहे ती संघटना न वाढवता, न जोपासता, केवळ दुसऱ्या प्रभावी संघटनेकडे पाहून तिला नावे ठेवणे हे शहाणपणाचे लक्षण नाही किंबहुना संघावर टीका करणे ही समाजवादी फॅशन असावी आणि सर्वजण तिचे अनुकरण करताना दिसताहेत

वास्तविक ह्या देशाची संपूर्ण परिस्थिती बदललेली आहे वरिष्ठ नेते एक होऊन एकमेकांच्या विचाराचे आदानप्रदान करीत असताना, पूर्वीच्या काही विचाराना मुरड घालीत असताना, केवळ समाजवादी म्हणून स्वस्त प्रसिद्धी मिळविण्यासाठी 'साधना' सारख्या साप्ताहिकानेही त्यात भाग घ्यावा हे दुर्दैवच म्हणावे लागेल. संघाच्या कार्यकर्त्यांची देशनिष्ठा, स्वार्थत्याग आपल्या कार्यकर्त्यांमध्ये कसा जोपासला जाईल याचे विचार 'साधना 'ने प्रसिद्ध करावयास हवेत.

समाजवाद्यांजवळ अखिल भारतीय कीर्तीचे, बुद्धिमान व तेजस्वी पुढारी असताना त्यांना अनुयायी मिळू शकले नाहीत याचे कारण त्यांची वाचाळता हेच आहे.

२१ जुलै, सिन्नर-

२१।७।७७ **दिलीप दत्तात्रेय देशपांडे**

---

## 'संघ बदला 'संबंधी....

---

¤ डॉ. बाबा आढाव ह्यांच्या 'संघाची ढोंगबाजी' ह्या लेखावरील श्री. सतीश कामत आणि डॉ. अरविंद लेले ह्यांच्या प्रतिक्रिया वाचल्या (माणूस शनि. १६ जुलै ७७). तुरुंगात नेमके काय घडले ह्याबाबतीत मतभेद जरी संभवत असले तरी डॉ आढाव ह्यांच्या लेखातील मुख्य वैचारिक गाभ्याला स्पर्श न करता केवळ तात्त्विक गोष्टींवर भर देउन पळवाट काढणाऱ्या ह्या दोन्हीही प्रतिक्रिया वाटल्या. खरे म्हणजे डॉ. आढाव ह्यांनी हा लेख लिहून क्रांतीबा फुले, डॉ. आंबेडकर ह्यांच्या तत्त्वज्ञानाची थोर परंपरा निष्ठेने चालविली म्हणून समाधानच वाटले. महाराष्ट्रातील प्रबोधनाची चळवळ ही ३०-४० वर्षे संघाच्या सध्याच्या उदोउदोमुळे पाठीमागे गेली आहे, हे डॉ. आढावांचे निदान म्हणजे द्रष्टेपणाच वाटतो.

संघ बदलतो आहे, त्यात सामाजिक-आर्थिक परिवर्तनाची नवी दिशा येते आहे या संदर्भात अलीकडे गौरवाने बोलले जाते; पण संघाचे मानसिक परिवर्तन होते आहे याबाबतीत काडीमात्र फरक होताना दिसत नाही. हिन्दुसंघटन, हिन्दुसंस्कृती, (भारतीय संस्कृती म्हणजे केवळ 'हिन्दुसंस्कृती' असे संघाचे मत आहे ) धार्मिक कर्मकांडाचे सार्वजनिक व संघटित स्तोम, एकचालक नेतृत्व, पौराणिक पुरुषांचे उदात्तीकरण आणि जुन्या मूल्यव्यवस्थेचे पुनरुज्जीवन ही संघाची व्यवच्छेदक लक्षणे आहेत. जी संघटना आपल्या आचार-विचारातून- घटनेतून हुकुमशाहीची बीजे जोपासते ती संघटना जेव्हा लोकशाहीवरील विश्वासाच्या, नागरी स्वातंत्र्याच्या कळकळीच्या बाजूने बोलू लागते तेव्हा लोकशाहीच्या मूल्यपरंपरेपेक्षा त्यांना संघटना टिकवणे महत्त्वाचे वाटते. नाही तर आणीबाणी जाहीर झाल्यानंतर श्री. देवरसांनी संघाचे कार्यक्रम आणि शाखा बंद होत आहेत असे जाहीर केले नसते. बंदी नसती तर एवढ्या संख्येने संघ स्वयंसेवक तुरुंगात गेले नसते, हे श्री. देवरसांचे उद्गार त्यामुळेच प्रामाणिक वाटतात.

दलितांसंबंधी अगर मुसलमानांसंबंधी संघाची नीती बदलली आहे असेही बोलले जाते; पण मागे पुरीच्या शंकराचार्यांनी हिन्दुधर्मातील अस्पृश्यतेचे समर्थन केले. पशुपक्ष्यात, दगडात-लाकडात जसे वर्ण असतात तसे माणसातही असतात असे जाहीर वक्तव्य केले ह्या विचाराचा, शंकराचार्यांचा धिक्कार केल्याचे ऐकिवात नाही जमाते इस्लामीसारख्या जातीय संघटनांबरोबर संघाचे नेते कुठल्या 'वेव्हलेन्थवर' बोलणी करीत आहेत ? संघ मुसलमानांना खुला करण्याच्या दृष्टीने विचार चालू आहेत असे श्री. देवरस म्हणतात. जमाते इस्लामीचे अमीर असे म्हणतात की, मुसलमानांनी संघा-

मध्ये जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. ह्या दोन सघटनाने संवादित्व कसे प्रस्थापित होणार हे अजून स्पष्ट झालेले नाही. दोन्ही संघटना ( जहाल जातीयवादी असल्यामुळे) समान नागरी कायद्याला विरोध करतात. तुरुगातील जीवनात आम्ही एकमेकाच्या जवळ आलो, असे दोन्ही सघटनाचे पुढारी सागतात. म्हणजे नेमके काय झाले? शिवाजी-पार्कवरील १४ मेच्या सत्काराला उत्तर देताना श्री. देवरसांनी असे सागितले की, आम्ही (हिन्दु) ४०० व ते (मुसलमान) ४०. त्याना वाटले 'आम्ही' त्यांना खाऊन टाकू; पण तुरुंगातील जीवनात 'त्याना' असे पटले की, 'आम्ही त्यांना खाणार नाही.' याचा अर्थ काय? श्री देवरस मुसलमानांना ह्या देशातील दुय्यम नागरिक म्हणून मानतात काय? आम्हाला ही भूमिका वैचारिक दृष्टया अतिशय धोक्याची वाटते. आम्ही ह्या देशातील समान नागरिक आहोत. श्री. देवरसांच्या संरक्षणछत्राखाली राहण्याची मानहानी करणारी भूमिका आम्हाला त्याज्य वाटते.

आपल्या देशाने निधर्मी मूल्यव्यवस्था मान्य केली आहे. याचा अर्थ खाजगी जीवनात धर्माचे स्तोम माजवायचे आणि सार्वजनिक जीवनात ते येत नाही असे कधी शक्य होते काय? ही माणसे झुंडीने आली म्हणजे जादा हिंसक होतात असा इतिहास आहे. संघाच्या मनोवृत्तीत बदल म्हणजे त्याच्या सास्कृतिक मूल्य कल्पनेत बदल होतो आहे हे जाणवत नाही. मुसलमान किंवा दलित ह्यांच्या गळयात हात घातला किंवा एकत्रित चहापान केले याचा अर्थ खऱ्या अर्थाने सामाजिक अभिसरण होत नाही एकीकडे अभिसरणाची भाषा करायची आणि दुसरीकडे आपले वेगळेपण– ब्राह्मणी सस्कृती– आचारविचार–कर्मकाड मौजीबंधन हे सारे जपून आपला जातीय अहकार व्यक्त करायचा, हा विरोधाभास वाटतो. म्हातारी मरते ह्याचे दु ख नाही," पण काळ सोकावतो ह्या न्यायाने डॉ. आढाव ह्यानी योग्य वेळीच सघावर मर्मी घाव घातला याबद्दल आढाव अभिनंदनास पात्र आहेत.

२७।७।७७ **महंमद दलवाई**

मुबंई **दया पवार**

श्री महमद दलवाई आणि श्री दया पवार याची सयुक्त प्रतिक्रिया वाचली. सर्वप्रथम मी हे पुन्हा एकदा सागू इच्छितो की, माझ्या लेखाचा उद्देश सघाची बाजू उचलून धरणे किंवा सघाच्या विचारप्रणालीचं समर्थन करणे हा नव्हता तर 'संघाची ढोगबाजी' या आपल्या प्रदीर्घ लेखात डॉ आढाव यानी राष्ट्रीय स्वयसेवक संघावर जे आरोप केले आहेत आणि त्या आरोपाच्या पुष्टयर्थ तुरुगातील घटनाचे जे पुरावे सादर केले आहेत त्याची सत्यासत्यता पडताळून पाहणे हा होता. त्यामुळे कुठून तरी पळवाट काढण्याचा प्रश्नच नव्हता. उलट या आघाडीवर डॉ. आढावाचा खोटेपणा सिद्ध झाल्यावर आता त्यातील वैचारिक गाभ्याकडे तरी लक्ष द्या असं सांगणं हीच पळवाट आहे

डॉ आढाव याच्या 'वैचारिक गाभ्याला' स्पर्श केला नाही असं पत्रलेखकानी म्हटलं आहे, पण मला त्या सबध लेखात असा काही प्रकार जाणवलाच नाही कारण कोणत्याही लेखातील अशा प्रकारचा काही गाभा शोधण्यापूर्वी त्यातील सत्यता, की जी कोणत्याही वैचारिक गाभ्याचा पाया असावी लागते ती पडताळून पहावयास हवी अशी सत्यता डॉ. आढावाच्या लेखात फारशी सापडतच नाही उलट प्रत्येक टिकाणी तपशिलाचा खोडसाळ विपर्यासच आढळतो फुले–आबेडकराच्या तत्त्वज्ञानाची थोर परपरा' निष्ठेने चालवणाऱ्या' व्यक्तीकडून किमान सत्यनेशी तरी प्रतारणा मला अपेक्षित नव्हती.

पत्रामध्ये संघावर 'ब्राह्मणी कर्मकाड, पौराणिक पुरुषाच उदात्तीकरण वगैरेसारखे जे नेहमी उगाळले जाणारे आरोप केले आहेत त्याची मला चर्चा करावयाची नाही. कारण त्या आरोपाच उत्तर किंवा स्पष्टीकरण देण्यासाठी मी बाधील नाही. माझा डॉ. आढावाशी आणि संघाशीही कधी सबध आलेला नाही तेव्हा सदरहू पत्रलेखकानी सरळ सघवाल्याकडेच सपर्क साधावा व त्याचे दोष त्यानाच समक्ष सागावेत

बाकी या पत्राच्या सदर्भात फारस काहीच लिहिण्यासारख नाही कारण या पत्रामध्ये बुद्धिनिष्ठ वादापेक्षा भावनिक त्रागा आणि आकाडताडवच अधिक आहे. कदाचित हे पत्र म्हणजे सघद्वेषाला करून दिलेला out–let च असेल. मला त्याच्याशी काही कर्तव्य नाही

शेवटी एकच गोष्ट पत्रलेखकाना सागावीशी वाटते. जर फुले आणि आबेडकराचाच वारसा चालवायचा असेल तर दुसऱ्या कोणावर तरी चिखलफेक करून काहीच निष्पन्न होणार नाही. अशी चिखलफेक थाबवणच अधिक चागल व उपयुक्त ठरेल. यातूनच काही तरी विधायक बाहेर पडू शकेल.

**—सतीश कामत**


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढरे डाग बरे करण्यात आमच्या उपचाराने मोठी ख्याती मिळविली आहे. उपचार सुरू झाले की सुधारणा दिसून येईल. रोगाच्या तपशिलासह लिहा. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पाढऱ्या डागापासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्याना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सागा.

**BHARAT AYURVEDASHRAM ( M ) P. O. KATRI SARAI ( GAYA )**

# पुण्याच्या निदर्शनामागील राजकारण !

माहितगार

विधानसभा-निवडणुका जवळ येत चालल्या आहेत तशी महाराष्ट्र कॉंग्रेसमधील गटबाजी गतिमान होऊ लागली आहे एक गट दुसऱ्या गटाला कसे मागे खेचता येईल, त्याचा प्रभाव कसा कमी करता येईल हा विचार करून 'कामाला' लागला आहे महाराष्ट्रात राष्ट्रपतिराजवट येण्याची शक्यता अनेकजण बोलून दाखवीत आहेतच ! राष्ट्रपतिराजवट येवो अथवा न येवो ! राज्यात मार्चमध्ये निवडणूक घ्यावीच लागणार आहे. त्यावर डोळा ठेवून कॉंग्रेसमधील गट कारवाया करू लागले आहेत. या कारवायांचा एक भाग म्हणूनच पतप्रधान मोरारजी देसाई यांच्याविरुद्ध पुण्यात (२४ जुलै) झालेल्या निदर्शनाकडे पाहिले जात आहे. इतकेच नव्हे तर त्याची खुलासेवार चर्चा केली जात आहे. त्यात कॉंग्रेस आमदार प्रामुख्याने आहेत. पुण्यातील निदर्शने युवक कॉंग्रेसने केली. हे युवक, गृहमंत्री शरद पवार याना मानणारे आहेत असे पुण्यातील कॉंग्रेस-आमदार सागतात. ज्या गावच्या बोरी त्याच गावच्या बाभळी असल्यामुळे पुण्यातील आमदार सागतात त्यात तथ्यांश असणारच ! राज्यातील कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी गृहमंत्र्यावर असते. शरद पवार गृहमंत्री आहेत. मुख्य मंत्रिपदाचे जे उमेदवार योजले जातात त्यात पवार याचेही नाव आहे. मुख्यमंत्री वसतराव पाटील याच्याविरुद्ध वातावरण व्हावे या हेतूने निदर्शनाचा बनाव घडवून आणला गेला. आपण काय पेरीत आहोत, त्याचे काय परिणाम होतील याचा विचार हा बनाव करताना युवक कॉंग्रेसला सुचला नाही. उभ्या केलेल्या नेतृत्वाच्या अपरिपक्वतेचा तो परिणाम आहे असे म्हटले जाते. पुण्याची निदर्शने सरकारच्या सगनमताने झाली असा आरोप विरोधी पक्षानी केला आहे.

निवडणुकीनंतर मुख्य मंत्रिपदी वसंतराव पाटील राहू नयेत यासाठी त्याना बदनाम करण्यात येत आहे. जनतापक्षाच्या केंद्रीय नेत्याशी दादाची जवळीक आहे ती तोडावी या उद्देशाने निदर्शने घडवून आणली हा सर्वसाधारण सूर आहे मुख्यमंत्री वसंतदादा यांच्या उपस्थितीत पतप्रधानाचा अवमान होईल अशी निदर्शने केली, की त्याचा परिणाम दादाच्या भवितव्यावर होईल. जनतापक्षाच्या केंद्रीय नेत्याची दादावर खप्पा मर्जी होईल व पोळी भाजण्यास वातावरण अनुकूल होईल असा हिशोब केला गेला. निदर्शनाचा बनाव निश्चित झाला, परंतु गृहमंत्री म्हणून होणाऱ्या परिणामाची जबाबदारी शरद पवार यांच्यावरच येणार आहे हे लक्षात घेतले गेले नाही. निदर्शने पूर्वनियोजित होती असा संशय घेण्यास जागा आहे. पतप्रधान ज्या ठिकाणाहून जाणार तो रस्ता चिंचोळा आहे याची कल्पना असूनही निदर्शकाना त्या मार्गापर्यंत येऊ कसे दिले ? कोणत्या स्वरूपाची निदर्शने होणार आहेत याची माहिती गुप्तचर विभागाला लागली होती, तरी चिंचोळ्या मार्गापर्यंत निदर्शक कसे गेले ? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. त्याची उत्तरे शोधण्यासारखी आहेत. निदर्शने पतप्रधानाविरुद्ध झाली तर त्यामागे महाराष्ट्र कॉंग्रेसमधील दोन गटाचा संबंध कसा येतो असेही विचारले जाईल.

मुख्य मंत्र्यांच्या समोर पतप्रधानाविरुद्ध उग्र निदर्शने झाल्याने मुख्यमंत्र्याची अडचण होणार होती. मुख्यमंत्री बदनाम होतील अशी कल्पना होती; परंतु दादानी हा डाव उधळून लावला. निदर्शकाना बाजूला रोखणे, त्याचप्रमाणे निदर्शने शांततेने पार पडतील यासाठी उपाय योजण्याची जबाबदारी गृहखात्याची आहे. आपला प्रत्यक्ष संबंध नाही. पंतप्रधानाप्रमाणे आपल्यालाही ही निदर्शने अनपेक्षित आहेत असे मुख्यमंत्र्यानी दाखवून दिले. दादा मोटारीतून खाली उतरले असते तर निदर्शकांना (जर त्यामागे अंतर्गत राजकारण नसते तर) ते नक्कीच शांत करू शकले असते ! दादाजवळ तेवढे कौशल्य आहे ! हे कौशल्य आहे की नाही हाही प्रश्न नाही. आपण आपल्या समारंभासाठी बोलाविलेल्या पाहुण्याचा अपमान होऊ नये एवढी काळजी घेण्यासाठीसुद्धा निदर्शकांना राखण्याचा कोणीही प्रयत्न केला असता आपल्या स्वतःच्या शपथविधीसमारंभात गर्दीमुळे गडबड उडाली तेव्हा दादा स्वतः खाली येऊन एखाद्या स्वयंसेवकाप्रमाणे व्यवस्था करीत होते हे दृश्य कोठे आणि पतप्रधानांविरुद्ध हिंसक निदर्शन होत असताना दादा स्वस्थपणे पाहात होते हे दृश्य कोठे ! निदर्शकाना आवरावे हा विचार दादाना सुचला नाही अशातला भाग नाही, पण त्यानी ते बुद्धयाच टाळले ! आपण अडचणीत यावे हा या प्रकारामागे हेतू आहे हे दादा समजून चुकले व त्यानी अडचणीत आणणारांना अडचणीत टाकण्याचा प्रतिडाव केला. निदर्शनप्रकरणात दोषाचे खापर कोणावर येते याची चर्चा सुरू आहे. शरद पवार यांचेच नाव खापर फोडण्यासाठी घेतले जाते. पुढील काळात दादा मुख्यमंत्री राहू नयेत म्हणून त्याना बदनाम करण्याचा प्रयत्न करण्यात आला, तर मुख्यमंत्री व्हावे असे ज्याना वाटते त्यांचीच पंचाईत करावी, त्यानाच अडचणीत आणावे व त्याचाच डाव त्याच्यावर उलटवावा हा विचार करून दादा निदर्शने पाहात राहिले.

निदर्शनाच्या प्रकारामुळे बहुसंख्य कॉंग्रेस आमदारही नाराज झाले आहेत. ते सर्व शरद पवार याना दोषी ठरवीत आहेत. त्यामुळेच विधानसभेत सगनमताने निदर्शने झाली असा आरोप केला तरी पवाराचे

मित्र म्हणून जे पाच–सहा आमदार एकत्र बसून कॉलेजातील गमतीची आठवण व्हावी असे वर्तन करतात, ते सारे आमदार आरोपाच्या वेळी मौन पाळून होते. निदर्शनावरील निवेदन, त्याचे खुलासे–प्रतिखुलासे, केंद्रसरकारला जाब देणे, या सर्व प्रकारांत मुख्य मंत्री म्हणून दादा कोठेही दिसत नाहीत. शरद पवारांचीच धावपळ चालू आहे. चूड लागली खरी; पण तिची दिशा उलटी झाली !

निदर्शने झाली त्याच्या दुसऱ्या दिवशी गृहमंत्री शरद पवार दिल्लीला गेले. पवारांना केंद्रीय मंत्र्यांनी बोलाविले म्हणून ते तातडीने तिकडे गेले असे सांगण्यात येते; परंतु शरद पवार ते खरे नाही असे म्हणतात. गेल्या चार महिन्यांत आपण दिल्लीला गेलो नव्हतो म्हणून दिल्लीला गेलो होतो; मला कोणी बोलाविले नव्हते असे पवार यांनी सांगितले.

केंद्रीय गृहमंत्री चरणसिंग यांची व आपली भेट झाली; पण त्या भेटीत निदर्शनांवर चर्चा झाली नाही. राज्यातील औद्योगिक प्रश्नांबाबत त्यांनी माझ्याशी चर्चा केली असे पवार यांनी म्हटले आहे.

जनतापक्षाचे अध्यक्ष चंद्रशेखर माझे जुने मित्र आहेत म्हणून त्यांना भेटलो. कॉंग्रेसमध्ये असताना चंद्रशेखर जनसंघाविरुद्ध बोलत होते; परंतु आता ते जनसंघाबरोबर आहेत. यासंबंधात आपण चंद्रशेखर यांना बोललो असे सांगताना पवार असा भाव आणतात की, मी चंद्रशेखरला चांगलेच ताणले आहे !

माझ्याशी खासगीत बोलताना पवार यांनी दिल्लीत आपल्याशी कोणीही निदर्शनांबाबत चर्चा केली नाही असे सांगितले. निदर्शनांबाबत त्यांना छेडले तेव्हा पवार यांनी जी माहिती दिली ती ऐकून वड्याचे तेल वांग्यावर काढण्याचा त्यांचा प्रयत्न चालला आहे हे स्पष्ट झाले.






युवककॉंग्रेसची बैठक पुण्याला झाली. त्या बैठकीला हजर असलेला एक पत्रकार म्हणतो, की पंतप्रधान यांच्याविरुद्धच्या निदर्शनाचा बेत त्या बैठकीत ठरला. ‘प्रधानमंत्री के मोटारपर हम पथ्थर फेकेंगे’ ‘जुते फेकेंगे’ अशी भाषा त्या बैठकीत झाली अशी पुण्याच्या पत्रकारांची माहिती आहे. त्यामुळे दलित पँथरवर दंगलीची जबाबदारी ढकलण्याचा जो सध्या पवार-गटातून प्रयत्न सुरू आहे तो पटण्यासारखा नाही.

निदर्शनाचा वापर मुख्यमंत्री पाटील यांनी आपल्याविरुद्ध केल्यामुळे पवार यांनी विधिमंडळ कॉंग्रेसपक्षाच्या बैठकीत दादांवर तोफा डागणारी माणसे तयार केली. श्रीमती लीला मर्चंट यांनी २८ जुलैच्या विधिमंडळ कॉंग्रेसपक्षाच्या बैठकीत दादांच्या कारभाराचे वर्णन ‘जत्रा’ या शब्दात केले. दादांच्या घरी जावे तेथे जत्रा, मंत्रालयात भेटण्यासाठी जावे तेथे जत्रा. आमदारांना दादांची भेट मिळणे मुष्किल आहे, अशी टीका श्रीमती मर्चंट यांनी केली. ही टीका सौम्य म्हणावी लागेल एवढी कडक टीका वामनराव मटकर यांनी केली.

**‘भ्रष्टाचाराबाबत पावलोपावली बोलले जात आहे. दादा, त्याची दखल घ्या. ‘चार महिने राहिलेत. तेवढ्या काळात हात धुऊन घेता येतील तेवढे घ्या, अशी मंत्र्यांची भूमिका आहे’ अशी चर्चा राज्यात आहे. त्याचा बंदोबस्त करा !’ असे मटकर म्हणाले. मटकर यांच्या भाषणाला सभासदांनी टाळ्या वाजवून पाठिंबा दिला. २८ जुलैच्या बैठकीत सदस्यांनी एकदाच टाळ्या वाजविल्या व त्या मटकरांच्या या विधानावर !**

आपल्याविरुद्धची हवा परतविण्यासाठी पवार यांच्या प्रेरणेने भ्रष्टाचाराविरुद्ध मटकर बोलले असे दादांना मानणारे आमदार म्हणतात.

कॉंग्रेसमधील गटबाजी निवडणूक जवळ येताच कसे डोके वर काढील याचे हे एक उदाहरण आहे. □



# नक्षलवादाच्या शोधात

लेखांक पाच

## एक चळवळ, अनेक दृष्टिकोन

शिरीष सहस्रबुद्धे । चंद्रशेखर पुरंदरे

नक्षलवादाचा शोध घेत भटकताना खूप आणि नाना तऱ्हांची माणसं भेटली. आम्हीही जमेल त्याला अगत्यानं भेटत गेलो आणि नक्षलवादाविषयीचे आणि नक्षलवादी चळवळीविषयीचे दृष्टिकोन गोळा करीत गेलो. चळवळीतल्या आणि चळवळीशी संबंधित असलेल्या माणसांकडून माहिती मिळतच होती; पण प्रश्नाच्या इतर काही बाजू असल्याच तर त्यांचाही मागोवा घेणं जरुरीचं होतं.

गांधीभवन. आंध्र प्रदेश कांग्रेस कमिटी ऊर्फ ए. पी. सी. सी. चं भलंमोठं कार्यालय. दारातून आत गेलो तो खादीच्या शुभ्रभट्टी झब्यापायजम्यातले एक बुटके पण आडव्या अंगाचे सद्गृहस्थ भेटले. आपली ओळख जलाल पाशा, अध्यक्ष, आंध्र प्रदेश युवक कांग्रेस अशी करून दिली आणि आम्हाला अगत्यानं चहा पाजला; पण इसम डोक्याकडून कच्चा असल्यानं नक्षलवाद वगैरे अवघड मुद्द्यावर चर्चा येताच श्यामकरण श्रीवास्तव नावाच्या आपल्या एका मित्र–सहकाऱ्यावर आम्हाला सोपवून हात झटकता झाला. मात्र श्रीवास्तवजींचं आणि आमचं गोत्र झक्क जुळलं. बी. कॉम्. झालेला हा तिशीतला तरुण खाजगी नोकरी करतो. पाशासाहेब ओळखीचे असले तरी ‘आपण कुठल्याच पक्षाबिक्षाचे नाही बुवा,’ असं बजावणारा हा गप्पिष्ट माणूस, आंध्रात आम्हाला भेटलेल्या सर्वसामान्य जनतेचा सगळ्यात उत्तम प्रतिनिधी होता असं आता वाटतं. ‘सगळ्यांच पक्षांचे लीडर्स साले सगळे चोर आहेत,’ हे सामान्यजनांचं typical तत्त्वज्ञान आम्हाला ऐकवून श्रीवास्तवजींनी वर अशीही माहिती पुरविली की नुकतंच हैदराबादेत जे अखिल भारतीय हिंदी सम्मेलन भरविलं गेलं, ते सुद्धा हिंदीच्या प्रेमातून नव्हे तर बड्या नेत्यांना बोलावून त्यांच्या पुढेपुढे करण्याच्या आणि मिरविण्याच्या स्थानिक नेत्यांच्या हौसेपोटीच जन्माला आलं होतं. ‘सारा काम स्वारथकी खातिर, पब्लिसिटीके वास्ते कर रहे हैं,’ असं त्याचं मत. गांधीभवनवाले तर त्यात आघाडीवर आहेत म्हणे.

नक्षलवाद्यांचं काय ?

‘साब, उनमें भी सचाई है। नहीं है ऐसी बात नहीं !,’ हे

पृष्ठ २६ वर

परराष्ट्रीय घडामोडी

# घाना

चंद्रशेखर पुरंदरे

परवाच पाकिस्तानात लष्करी उठाव झाला आणि अस्थिर राजकीय परिस्थिती लष्कराने ताब्यात घेतली. जनरल झियाउर हक याने तीन महिन्यांच्या आत निवडणुका घेऊन सत्ता लोकप्रतिनिधींकडे सोपवण्याचे आश्वासन दिले आहे. आपल्याला सत्तेची हाव नसल्याचे व नंतर कालबाह्य ठरलेले मुस्लिम कायदे परत अंमलात आणण्याचेही त्याने जाहीर केले.

लष्करी सत्ताप्रमुख बंदुकीच्या नळीच्या जोरावर सत्तेवर आलेले असतात, तेही मोठ्या तोंडाने दिलेली आश्वासने किती पाळतात?

घाना हा पश्चिम आफ्रिकेतला छोटासा देश पाच वर्षांपूर्वी १९७२ च्या जानेवारी-मध्ये अध्यक्षीय राजवट संपवून जनरल अॅचिमपाँग सत्तेवर आला. अध्यक्ष डॉ. बुसिया हा तर त्या वेळी अनुपस्थितच होता. पाकिस्तानसारखीच तेथेही रक्तहीन क्रांती झालेली होती.

जनरल अॅचिमपाँग हा भाविक माणूस. चर्च, अध्यात्मिक केंद्रे याना वारवार भेटी देणारा. साधेपणाने रहाणारा प्रथम प्रथम लोकांचे मत त्याच्याविषयी चांगले झाले. कारण भडकलेल्या किमती ताब्यात आणण्या-साठी लष्करशाही उपयोगी पडेल असा त्याचा अंदाज होता. प्रत्यक्षात मात्र जगात कोठेही येतो तसाच हुकुमशाहीचा अनुभव त्याना आला आणि मध्यमवर्गाने या अन्यायाला तोंड फोडायचे ठरविले.

घाना बार असोसिएशन ही घानातील वकिलांची देशव्यापी संघटना पूर्वीपासून या संस्थेची 'ग्रेटर आक्रा ब्रॅंच' ही घानाची राजधानी. आक्रामधील शाखा नेहमीच विरोधी आवाज उठवणारी ठरली आहे त्या परंपरेला अनुसरून १७ जूनला वकिलानी विद्यार्थ्यांना पाठिंबा म्हणून बेमुदत संप सुरू केला. घानातील विद्यार्थ्यांनी भाववाढीच्या निषेधार्थ विद्यापीठावर बहिष्कार घातलेला आहे. त्याला वकिलानी सहानुभूती दर्शविल्याचे पाहताच सरकारचे पित्त खवळले आगीत तेल म्हणून की काय, डॉक्टर्स, इंजिनिअर्स, फार्मासिस्ट्स, बँककर्मचारी, अकाउंटंट्स आणि व्हेटरिनरी सर्जन्स या सर्वांनी देशव्यापी संप सुरू केला. यांची मागणी मात्र मूलभूत होती. ती म्हणजे १ जुलैपर्यंत लष्करशाही संपून नागरी राज्य यावे. अॅचिमपाँगला सत्तेचे थोडेफार पाणी लागले असल्याने आता तो अधिकाधिक लोकपराङमुख होत चालला आहे. ७ जुलैला सरकारने या सर्व लोकांची सरकारी व्यावसायिक मान्यताच काढून घेतली. त्यापाठोपाठ म्हणजे जुलैच्या दुसऱ्या आठवड्यात त्यांची बँकेतील खाती गोठववण्यात आली. याला प्रत्युत्तर म्हणून जुलैचा पहिला पंधरवडा अत्यंत अनियमित वीजपुरवठ्यामुळे आक्रा ही घानाची राजधानी बहुतेक वेळ अंधारातच होती या वीजकर्मचाऱ्यांच्या कमी कामाच्या धोरणामुळे व्होल्टा या आक्राजवळच्या नदीच्या काठावरील टेमा या गावातील देशातील एक मोठा अॅल्युमिनियमचा प्रकल्प पहिल्यादाच संपूर्ण बंद पडला त्यामुळे १७ लाख ते २३ लाख पौंड एवढा तोटा झाला

या विजेच्या प्रतापापाठोपाठ शहरात पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवू लागले. जोडीला पेट्रोलची टंचाई होतीच. ह्यामुळे आक्रातील संपूर्ण जीवनच विस्कळित झाले त्यात अॅचिमपाँग याचे विलासी जीवनमान लोकांच्या डोळ्यात खुपू लागले हा पठ्ठा आता मर्सिडीजमधून हिंडतो. घानाचा पूर्वीचा हुकुमशहा क्वामे क्रुमा (एन्क्रुमा) याचा शाही राजवाडा ओसू या ठिकाणी आहे. त्या राजवाड्यातून आता अॅचिमपाँग बाहेर पडायलाच नाखूष असतो.

पण एका इंजिनिअरने फार समर्पक प्रतिक्रिया व्यक्त केली. आमच्याकडे केवळ बंदूक नाही म्हणून आम्ही विरोधी आवाज उठवूच शकत नाही अशी जर या हुकूमशहाची कल्पना असेल तर ती चुकीची आहे घानातील आज विस्कळित झालेले जीवन पहा म्हणजे वस्तुस्थितीचे गांभीर्य कळेल. उद्या कोणाता तरी मेजर येईल, त्याच्या लहरीप्रमाणे कारभार करू म्हणेल, हे किती काळ चालणार? या लोकाना मध्यमवर्गाची ताकद कळली म्हणजे चट वठणीवर येतील.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे अजून सत्तेची पूर्ण धुंदी न चढल्याने म्हणा अथवा परिस्थिती हाताबाहेर चालल्याची जाणीव झाल्याने म्हणा अॅचिमपाँगने ताकदीचे फार प्रदर्शन न करता (तसे रणगाडे आक्राच्या रस्त्यांवरून फिरू लागलेच आहेत) १ जुलै १९७९ ला सत्तांतर करण्यात येईल अशी घोषणा केली

पुढच्या वर्षीच्या (१९७८ च्या) मार्चमध्ये देशाला लष्करी राजवट हवी की नको या प्रश्नावर सार्वमत घेण्यात येईल त्याचा निर्णय पाहून १९ एप्रिल १९७८ ला घटनासमिती स्थापन करण्यात येईल. ती ऑक्टोबरपर्यंत आराखडा तयार करील, १९७९ च्या मार्च १५ पर्यंत घटना तयार होऊन १ जुलै १९७९ ला नवनिर्वाचित सरकार सत्तारूढ होईल असे त्याने वेळापत्रक सुचविले. याला मान्यता मिळून १८ जुलै १९७७ च्या सोमवारी व्यावसायिकांचा हा देशव्यापी संप समाप्त करण्यात आला.

पण या वरवर गोंडस दिसणाऱ्या योजनेमागे सद्हेतु खरोखरच आहे काय अशी शंका निर्माण व्हावी अशी परिस्थिती आहे कारण परवाच घानातून कष्टाने पळून आलेल्या शंभर लोकानी 'भयानक' या एकाच शब्दात घानाच्या परिस्थितीचे वर्णन केले त्यापाठोपाठ आक्राचा आन्तरराष्ट्रीय विमानतळही बंद झाल्याची बातमी आहे त्यामुळे जनतेला आणखी किती काळ लढा द्यावा लागतो हे आता पहायचे. □

## हम तुम...और बिजली खो जाए!

गेल्या बुधवारी रात्री म्हणजे तेरा तारखेच्या रात्री ९ वाजून ३५ मिनिटे अशी वेळ जेव्हा घड्याळे दाखवीत होती, त्या वेळी न्यूयॉर्कचा मेयर अब्राहम बीम आपल्या निवडणुकीच्या प्रचारसभेतील भाषण ठोकीत उभा होता. फ्रँक सिनात्रा त्याच्या हॉटेलच्या

अडतिसाव्या मजल्यावर त्याच्या बायकोची वाट पहात बसला होता. ब्रॉडवे या थिएटर-मध्ये 'ओ कलकत्ता 'चा सपूर्ण नटवर्ग नैस-र्गिक अवस्थेत स्टेजवर आला होता आणि आणखी आठच सेकदात न्यूयॉर्कच्या त्या २५ तासाच्या रात्रीला प्रारभ झाला.

अब्राहम बीमन 'मी इलेक्ट्रिसिटी बोर्डाचे बिल दिले नाही म्हणून दिवे गेले असतील' असा विनोद करून वेळ मारून नेली. फ्रँक सिनात्रान बायकोला फोन करून तिला जवळच्याच मित्राकडे जायला सागितले आणि प्रेक्षकाकडेच कपडे मागून 'ओ कल-कत्ता 'चा अभिनेत्याचा सच स्टेजवरून पसार झाला.

लवकरच परिस्थितीचे गाभीर्य लोकाच्या लक्षात आले, दिवे यापूर्वी गेले होते, पण ते होते १९६५ साल. त्यानंतर १२ वर्षांनी अशी आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली. झाले काय की एका पेट्रोलच्या टाकीवर वीज पडली न् ३०० फूट उचीचा डोब उसळला. त्यामुळे न्यूयॉर्कला वीज पुरविणारा एक जनरेटर्सचा सेट आणि upstate ट्रान्सफॉर्मर बद पडला. त्यामुळे दुसऱ्या सेटवर न पेलणारे लोड आले आणि तो बद पडला. तिसरा सावधानता म्हणून बंद करण्यात आला आणि न्यूयॉर्क अंधारात बुडाले. प्रकाशाचा ठिपकासुद्धा दिसेना. तेव्हा लोकानी रात्रभर मशाली जाळून, मेणबत्त्या जाळून (त्याच्या किंमती कल्पनातीत भडकल्या), काही बहाद्दरानी मोटर्स आणि मोटरसायकलच्या दिव्यात रात्र काढली.

पण जेव्हा सूर्य उगवला, तेव्हा खऱ्या परिस्थितीचा अदाज आला. शहरातली सगळी प्रमुख बाजारपेठेतील दुकाने पूर्णपणे साफ करण्यात आली होती. रत्नाच्या चोऱ्यापासून दारूच्या बाटल्यापर्यंत काहीही शिल्लक ठेवण्यात आले नाही. आतापर्यंत ३,५०० लोकाना पकडण्यात आले. त्यातले बरेचसे निग्रो तरुण होते. ते परत अभिमानाने आम्ही काय पळविले ते वार्ताहराना दाखवीत होते. 'कार्टरने आम्हाला काही दिले नाही, तेव्हा हे पळविणे आमचा हक्कच आहे' असे त्याचे मत होते आणि जी प्रचंड लूटालूट झाली तिच्यात त्याना वावगे काहीच वाटत नव्हते. दोनच उदाहरणे पुरेशी बोलकी आहेत. एका रत्नाच्या दुकानाबाहेर उभ्या असलेल्या विक्रेतीकडे एक छोटा मुलगा येऊन म्हणाला, 'हा दुसरा ख्रिसमस आहे, मला काही तरी दे!' आणि त्यापाठोपाठ झुंडीने लोक आत घुसले. दुसरे म्हणजे ब्रॉक्स या गॅरेजमधून एक नाही, दोन नाही, पन्नास कोऱ्या करकरीत ख्रिस्लर पोटिॲक गाड्या पळविल्या गेल्या. बरेचसे लुटारू मोटारीतून येऊन खिडक्याची तावदाने फोडून आत घुसले. जे हाताला लागेल ते पळविणे या गोष्टीचा कळस इतका झाला की, एका दारूच्या दुकानदाराने सागितल्याप्रमाणे आतल्या तर सगळ्या बाटल्या पळविल्या गेल्याच, पण शोकेसमध्ये (रस्त्याच्या बाजूच्या) ठेवलेले शोपीसेससुद्धा उचलले गेले त्यात दारू नव्हतीच, होते ते रगीत पाणी! मोठमोठे बसायचे कोचेससुद्धा डोक्यावर बॅलन्स करून लोक मध्यरात्री पळत होते

अग्निशामकदलाचे आणि पोलिसदलाचे हाल तर अवर्णनीय होते. अग्निशामकदलाला साडेसातशे कॉल्स आले. त्यातल्या सातशे ठिकाणी आगी लागल्याच होत्या. बाकीचे बोगस होते. पोलिसाना तर इतकी आमत्रणे आली की, ते कुठेच काही करू शकले नाहीत. नतर जे स्टॅटिस्टिक बाहेर आले त्यान्वये १९६८ च्या मार्टिन ल्यूथर किंगच्या खुनानतर झालेल्या दगल आणि अराजका-शीच तुलना करता येईल एवढ्या वाईट परिस्थितीत न्यूयॉर्क सापडल्याचे ध्यानात आले.

दुसरा दिवसही आदल्या दिवसासारखाच उकाड्याचा होता. तपमान ९० डिग्रीच्या (फॅरनहीट) आसपास होते आणि सुख-सोयीची सगळी साधने बंद होती. मेयरने आणीबाणी जाहीर केलीच होती. सगळ्यानी शातपणे घरी बसून रहावे अशी विनती केली होती. सगळे कामकाज अर्थातच बद होते. वाहतूक फक्त टॅक्सीने चालणे शक्य असल्याने त्यांनी तोंडाला येतील ते भाव मागायला सुरुवात केली होती. दुकानदार थक्क होऊन उद्ध्वस्त दुकानाकडे पहात होते, रस्त्रवेले पोलिस इकडेतिकडे धावत होते, राजकीय पक्ष याचे आपल्याला कसे भाडवल होईल तो विचार करू लागले होते आणि वरवरच्या सुरक्षिततेचा बुरखा अनपेक्षितपणे निमिषा-र्धात फाडला गेल्याने खालच्या असुरक्षिततेच्या हिडिस दर्शनाने सामान्य माणूस हवालदील झाला होता. किती भयानक परिस्थितीत आपण वावरत आहोत याची अशी जाणीव होईल, याची त्याला कल्पनाही नसेल!

'कन्सॉलिडेटेड एडिसन' ही न्यूयॉर्कची वीज पुरवणारी कपनी त्यानी नुकताच १५ वर्षांत सध्याचे कामकाज उत्कृष्ट चालल्याचा निर्वाळा दिला होता आणि लगेच हा फटका बसला. हा कमी म्हणून की काय मेयरचे एक, विरोधी नेत्याचे एक, गव्हर्नरचे एक, कार्टरचे एक अशी एकामागोमाग चार कमिशन्स (हे वेड फक्त आपल्याकडेच आहे असे नाही) नेमण्यात आली आहेत. शेवटी गुरुवारी रात्री १० वाजून ३८ मिनिटानी अखेरच्या विभागाला वीज मिळाली आणि त्या ४४,००० लोकाच्या घरातल्या दिव्या-बरोबर 'मोठ्या सफरचदाला रस परत मिळाला.' सध्या अमेरिकेत हाच विषय त्यामुळे जोरावर,–दुसरी एक घटना आहे छोटीशीच; पण वरच्याच धर्तीवरचा पश्चिम-जर्मनीचा चॅन्सेलर हेल्मुट स्मिट सध्या अमे-रिकेच्या भेटीवर आहे हे गृहस्थ परवा वॉशिंग्टनमध्ये नॅशनल प्रेस क्लबमध्ये वार्ता-हर-परिषद घेत होते. बोलायच्या आधी आपले महागडे रिस्टवॉच स्मिटसाहेबानी समोरच्या टेबलावर काढून ठेवले. पत्रकार-परिषद सपली, तेव्हा हे घड्याळ अदृश्य झालेले होते. जगातल्या सगळ्यात सपन्न राष्ट्राने, युरोपातल्या सगळ्यात सपन्न राष्ट्राच्या प्रमुखाला चागलाच हिसका दाखवला! □


# पूर्णिया

अनिल अवचट

किंमत : सहा रुपये

राजहंस प्रकाशन

पुणे ३०

# कर्नाटक
## काँग्रेसच्या बालेकिल्ल्यास तडे

वा. दा. रानडे

कर्नाटकात मुख्य मंत्री देवराज अरस याचा गट आणि के. एच्. पाटील यांचा गट याच्यातील वाढता संघर्ष लक्षात घेता कांग्रेसला दक्षिणेतील हा बालेकिल्ला आगामी विधानसभा–निवडणुकात कितपत टिकविता येईल याची शंका वाटते. केन्द्रीय नेत्याना या दोन गटात समझोता घडवून आणता आला नाही तेव्हा त्याना मुख्य मंत्री अरस यांना मंत्रिमंडळ पुनर्घटनेच्या बाबतीत पूर्ण मोकळीक दिली आणि के. एच्. पाटील याना पुनः प्रदेशकाँग्रेसचे अध्यक्ष नेमले.

आपापले गट मजबूत करण्यासाठी दोन्ही नेत्यांनी लागलीच हालचाली सुरू केल्या. के. एच् पाटील यानी मंत्रिपदाचा ताबडतोब राजिनामा दिला नाही म्हणून मुख्य मंत्री अरस यानी त्याना मंत्रिमंडळातून बडतर्फ केले आणि त्याच्या जागी प्रदेशकाँग्रेसचे अध्यक्ष नागराल याना मंत्रिमंडळात घेतले. जेवढ्या मंत्र्यानी राजिनामे दिले तेवढेच नवे मंत्री मंत्रिमंडळात न घेता त्यानी मंत्र्यांची संख्या वाढविली. सात मंत्री मंत्रिमंडळातून गेले त्याच्या जागी तेरा मंत्री त्यानी घेतले व मंत्र्यांची संख्या २२ वरून ३५ वर नेली. एवढे मोठे मंत्रिमंडळ बनविण्याची काय आवश्यकता होती? पण कर्नाटकचे मुख्य मंत्र्यांच्या पुढे महाराष्ट्राचे मुख्य मंत्री वसंतरावदादा पाटील याचा आदर्श असावा असे दिसते. दादानी ४० मंत्री घेतले तर आपण ३५ का घेऊ नयेत ? असा विचार त्यानी केला असावा. आपला गट बळकट करण्यासाठी आपल्या बाजूच्या जास्तीत जास्त लोकाना मंत्रिपदे देऊन खूष राखावे हा सरळ उद्देश या मंत्रिमंडळवाढीमागे आहे हे उघड आहे. आगामी निवडणुकांत कांग्रेसवर आपल्याच गटाचे नियंत्रण राखण्यासाठी ही धडपड आहे.

पण राज्याची सूत्रे आपल्या हाती ठेवायची तर केवळ मंत्रिमंडळ आणि विधिमंडळ कांग्रेसपक्ष आपल्या नियंत्रणाखाली असणे पुरेसे नाही प्रदेशकाँग्रेसवरही आपल्या गटाचा कबजा हवा हे मुख्य मंत्री अरस याना माहीत आहे. प्रदेशकाँग्रेसकमिटीने प्रदेशकाँग्रेसचा अध्यक्ष निवडावा अशी मागणी त्याच्या गटाने केन्द्रीय पार्लमेंटरी बोर्डाकडे केली होती, पण ती मान्य झाली नाही श्री. के. एच् पाटील याना लोकसभा निवडणुकीपूर्वी मंत्रिमंडळात घेण्यात आले त्याआधी ते प्रदेशकाँग्रेसचे अध्यक्ष होते आणि प्रदेशकाँग्रेस कमिटीने अध्यक्षपदी त्याची बिनविरोध निवड केलेली होती मंत्री झाल्यावर त्यांनी प्रदेशकाँग्रेसअध्यक्षपदाचा राजिनामा दिला, तेव्हा आता ते पुन: अध्यक्षपदी सरळ कसे येऊन बसतात? प्रदेशकाँग्रेसची बैठक होऊन अध्यक्षपदी पुन: त्याची रीतसर निवड व्हावयास हवी ही अरसगटाची मागणी आपल्या फायद्याच्या दृष्टीने केलेली असली तरी, ती चुकीची होती असे म्हणता येणार नाही; पण केंद्रीय पार्लमेंटरी बोर्डाने ही मागणी अमान्य केल्यावर अरसगटाने त्याबद्दल आग्रह धरला नाही.

विधिमंडळकाँग्रेसपक्षात तर आपल्यामागे बहुमत आहेच, पण प्रदेशकाँग्रेसमध्येही आपल्याला बहुमताचा पाठिंबा आहे असा दावा मुख्य मंत्री अरस यानी केलेला आहे. के एच. पाटील अध्यक्ष झाले तरी कार्यकारिणीचे व प्रदेश काँग्रेसचे बहुसंख्य सभासद आपल्या बाजूचे आहेत अशा स्थितीत श्री. पाटील याना आपल्या गटाच्या लोकाचेच ऐकावे लागेल. स्वत:च्या मताप्रमाणे काम करता येणार नाही. त्यानी आपल्या गटाला डावलले तर प्रदेशकाँग्रेसची बैठक भरवून त्याच्यावर अविश्वास व्यक्त करता येईल, असे आडाखे अरसगटाने बाधलेले आहेत. तेव्हा अरसगटाने सहकार्य दिले नाही तर पाटील याना काम करणे कठीण जाणार आहे. प्रदेशकाँग्रेसचे अध्यक्षपद मिळाल्याने संघटना आपल्या नियंत्रणाखाली येईल व आगामी निवडणुकीसाठी उमेदवार निवडताना आपल्या गटाच्या लोकाना अधिक तिकिटे देता येतील असा के एच. पाटील यांचा आडाखा असेल तर तो साधणे कठीण आहे. दोन्ही गटांत संघर्ष चालूच राहिला तर आगामी निवडणुकांत काँग्रेसला कर्नाटक आपल्या हाती टिकविणे कठीण जाईल. या गटाचे सध्याचे संबंध लक्षात घेता त्याच्यात समझोत्याची शक्यता दिसत नाही.

श्री. देवराज अरस हे श्रीमती इंदिरा गांधीच्या पसंतीचे नेते म्हणून त्याची मुख्य मंत्रिपदावर निवड झाली, पण लोकसभा–निवडणुकीनंतर अरस इंदिरा गांधी–गटाचे राहिलेले नाहीत असे त्याच्या काही भाषणावरून स्पष्ट झाले आहे. तेव्हा उघडपणे नव्हे तरी अप्रत्यक्षपणे के. एच. पाटील याच्या गटास इंदिरा गांधीचा पाठिंबा असावा असे दिसते.

हे दोन्ही गट काँग्रेसमध्येच राहतील की त्यातला एक गट बाहेर पडण्याची शक्यता आहे? प्रदेशकाँग्रेससंघटना आपल्या नियंत्रणाखाली आणण्याचा दोन्ही गटाचा प्रयत्न राहणार हे उघड आहे. या प्रयत्नात ज्या गटाला अपयश येईल तो बाहेर पडण्याची शक्यता आहे. उमेदवार–निवड निश्चित होईपर्यंत तरी दोन्ही गट काँग्रेसमध्ये राहतील आणि एकमेकावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करतील. लोकसभा–निवडणुकीपूर्वी काही थोडे आमदार, खासदार व कार्यकर्ते फुटून त्यानी लोकशाहीवादी काँग्रेस काढली; पण या फुटीला फारच थोडा प्रतिसाद त्या वेळी मिळाला. पक्षात अधिक मोठी फूट विधानसभा–निवडणुकाच्या वेळी पडेल का हे आताच सागणे कठीण आहे. यासबधीचा निर्णय त्या वेळच्या परिस्थितीवर अवलंबून राहील. येत्या काही महिन्यात अरससरकार आपली प्रतिमा कितपत उजळविते यावरही ते अवलंबून राहील.

केंद्रात जनतासरकार अधिकारावर आल्यानंतर आणीबाणीतील सारे अन्याय्य निर्बंध रद्द करून त्यानी लोकशाहीची गळचेपी थांबविली आणि लोकशाहीची व मूलभूत हक्काची पुन:स्थापना केली. आणीबाणीतील अत्याचाराच्या व सत्तेच्या गैरवापराच्या चौकशीसाठी कमिशने नेमली. वृत्तपत्रावरील निर्बंध गेले. राजकीय पक्ष निर्भय, मोकळ्या वातावरणात काम करू लागले. या साऱ्या गोष्टी जनतासरकारची प्रतिमा उजळणाऱ्या असल्या तरी तेवढ्यावर सर्वसामान्य जनतेचे फार काळ समाधान होणार नाही. तिला

पृष्ठ २५ वर



# ‘ग्रामायन ’मध्ये आपलाही सहभाग हवा

मिरजेजवळील म्हैसाळ गावातील दलितांनी संघटित होऊन स्थापन केलेला संयुक्त सहकारी शेती प्रकल्प आता चांगलाच नावारूपास आलेला आहे. स्वावलंबन हे या प्रकल्पाचे मुख्य सूत्र आहे. सावकारांकडे गहाण असलेल्या आपल्या जमिनी प्रथम दलितांनी सोडवून घेतल्या आणि सहकारी पद्धतीने त्या लावगडीखाली आणल्या. शेतीची आधुनिक तंत्रे आत्मसात करून उत्पन्नात वाढ केली. सभासदांना कर्जमुक्त केले. समाजातील दुष्ट चालीरीती मोडण्याचा प्रयत्न केला. आर्थिक उन्नतीबरोबरच सामाजिक एकात्मता साधणे हे या प्रयत्नांचे ध्येय आहे.

या प्रकल्पाचा परिणाम आसपासच्या भागातही आता जाणवू लागला आहे. ग्रामायनच्या सहकार्याने प्रकल्पाने वेळोवेळी आयोजित केलेली शिबिरे, मेळावे यांचा या दृष्टीने चांगलाच उपयोग झाला आहे. आता म्हैसाळ प्रकल्प हे दलितांच्या स्वावलंबी विकासाचे एक स्फूर्तिस्थान ठरू पाहात आहे. आणखी काही गावांतून म्हैसाळ पद्धतीने दलितांच्या आर्थिक–सांस्कृतिक विकासाला चालना देण्यासाठी विचारविनिमय सुरू आहे. सांगली–मिरजेतील सामाजिक कार्यकर्ते व युवक संघटनाही या कामी पुढाकार घेत आहेत.

उदाहरणार्थ, सांगलीपासून आठ मैलांवर असलेल्या कवठेपिरान या गावी दलितांनी म्हैसाळप्रमाणेच एक सहकारी शेतीसंस्था स्थापन केली आहे. ‘ नवजीवन संयुक्त सहकारी शेती सोसायटी ’ या नावाने ही संस्था नोंदली गेली असून ४८ हरिजन कुटुंबांची एकूण ६० एकर जमीन या सोसायटीमार्फत एकत्रितपणे कसली जाईल. जमिनीवरील पूर्वीची कर्जे फेडणे, शेतजमिनीची सुधारणा करणे, पाणीपुरवठ्याची सोय करणे इत्यादी प्रारंभीची कामे सोसायटीसमोर आहेत व त्या दृष्टीने पैसा उभा करण्यासाठी या भागातील एक अनुभवी निर्माण कार्यकर्ते श्री. अरूण चव्हाण प्रयत्नशील आहेत. म्हैसाळ प्रकल्पाचे पाठबळ तर गृहीतच धरलेले आहे.

‘ ग्रामायन ’ने आपला या उपक्रमातील वाटा म्हणून श्री. गोरख कांबळे या तेथे राहून काम करणाऱ्या तरुण कार्यकर्त्याच्या मानधनाची जबाबदारी दोन वर्षांसाठी उचलली आहे. याशिवाय ग्रामायनचे इतर सर्व प्रकारचे सहाय्य या कामात राहीलच. श्री. कांबळे हे सुप्रसिद्ध निर्माण कार्यकर्ते श्री. आबा करमरकर यांच्या समवेत मनोर आदिवासी भागात व नायगाव येथे काम करीत होते.

सुपे ( ता. बारामती ) येथेही ग्रामायनने एका कार्यकर्त्याची सवेतन नेमणूक करून विकासाची काही कामे सुरू केली आहेत. ‘ माणूस प्रतिष्ठान’ने तेथे पूर्वी खणलेल्या सामुदायिक विहिरीची खोली वाढविण्यासाठी ग्रामायनने सहाशे रुपये खर्च केले व विहिरीच्या भागधारकांनी प्रत्येकी पन्नास रुपये देऊन साडेचारशे रुपये गोळा केले. हा भाग कायम दुष्काळी आहे. या विहिरीच्या पाण्याने या भागधारकांना एका पिकाची तरी शाश्वती मिळाली आहे.

आता मातंग समाजाच्या मागणीवरून घायपाताची लागवड करण्याचे काम त्यांच्याच जबाबदारीवर हाती घेण्यात आले आहे. या मंडळींची थोडीफार कोरडवाहू शेती आहे; परंतु घायपाताच्या वाखापासून दोर वळणे हा या लोकांचा परंपरागत व्यवसाय आहे. त्या दृष्टीने या परिसरात घायपाताची लागवड मोठ्या प्रमाणावर करण्याचा उपक्रम या वर्षी यशस्वी झाल्यास २/३ वर्षांनंतर या ४५ मातंग कुटुंबांचा उपजीविकेचा प्रश्न सुटेल.

मुंबई-पुणे रस्त्यावर कामशेतजवळील नायगाव येथे श्री. आबा करमरकर यांच्या नेतृत्वाखाली असेच विकासाचे कार्य सुरू आहे. तिथे दलितांच्या वस्तीवर बांधण्यात आलेल्या विहिरीसाठी ग्रामायनच्या युवकांनी श्रमदान केले. विझर ( ता. हवेली ) येथे श्री. चंदूकाका रायरीकर कार्य करीत आहेत. तेथील सामुदायिक विहीर दलित व सवर्णांनी एकत्र येऊन वापरावी यासाठी ग्रामायनचे अध्यक्ष प्रा. व. द. देशपांडे यांनी विशेष प्रयत्न केले. विझर व नायगाव या दोन्ही प्रकल्पांना येथून पुढेही ग्रामायन सहाय्य देऊ इच्छिते. दोन्ही ठिकाणी कार्यकर्त्यांची निकड असली तरी त्यासाठी आर्थिक सोय अद्याप होऊ शकलेली नाही. मुळशी तालुक्यातील वेगरे येथेही विकासप्रकल्प सुरू करण्यासाठी ग्रामायनचे प्रयत्न चालू आहेत.

कवठे–पिरान, सुपे, नायगाव, वेगरे या खेड्यांमध्ये या ना त्या स्वरूपात ग्रामायनकडून मदतीची अपेक्षा आहे; परंतु या कामांसाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध नसल्याने ग्रामायन वेगाने पुढे जाऊ शकत नाही.

सुरुवात झाल्यापासून गेल्या तीन–साडेतीन वर्षांतील ग्रामायनची वाटचाल किरकोळ देणग्या; स्मरणिका वगैरे मार्गांनी पैसा जमा करून चालू होती, परंतु एवढ्यावर यापुढे भागणार नाही असे दिसते. ठराविक रक्कम दरमहा किंवा दरसाल देणाऱ्या व्यक्तींचा मोठा परिवार निर्माण करण्याची आता गरज आहे. यामुळे अर्थकारण सुधारेल व ग्रामायन चळवळ घरोघरी पोचण्यासाठी मदत होईल

'ग्रामायन'च्या उद्दिष्टाची व आजवरच्या कामगिरीची आपल्याला थोडीफार कल्पना असेलच. थोडक्यात सांगायचे म्हणजे खेड्यात राहून ग्रामीण विकासाचे प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी स्थापन झालेली 'ग्रामायन' ही एक संघटना आहे या क्षेत्रात स्वयंस्फूर्तीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे आणि लोकांच्या उत्स्फूर्त प्रयत्नांचे महत्त्व जाणवलेल्या, पुण्या–मुंबईतील काही सामाजिक कार्यकर्त्यांनी अशा ग्रामीण विकास कार्यकर्त्यांचे एक लहानसे संमेलन जानेवारी १९७४ मध्ये घेतले. या संमेलनात सर्वांच्या विचाराने ही संघटना स्थापन करण्यात आली.

ग्रामीण विकासाच्या अनेकविध, स्वयंस्फूर्त प्रयत्नांमध्ये समन्वय साधणे आणि या क्षेत्रातील कार्यकर्त्यांचे व संस्थांचे एक अनौपचारिक संघटन निर्माण करणे हे ग्रामायनचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. सामाजिक समतेचा व न्यायाचा आग्रह, जनतेचा सहभाग, स्वयंप्रेरणा, लोकशाही कार्यपद्धतीचा सर्व स्तरांवर वापर आणि स्थानिक नेतृत्वाची उभारणी या बाबींचा ग्रामायनच्या व्यापक उद्दिष्टांत अंतर्भाव आहे.

गेल्या तीन वर्षांत ग्रामायनने ग्रामीण विकास कार्यकर्त्यांचे पाच मेळावे घेतले. अशा मेळाव्यात ग्रामीण विकासाच्या एखाद्या निकडीच्या प्रश्नावर संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत उपयुक्त चर्चा होतात, कार्यकर्त्यांमध्ये अनुभवांची व कल्पनांची देवाणघेवाण होते, त्यांचा पुढील कामासाठी उत्साह वाढतो या कारणामुळे अशा मेळाव्यांना वाढती उपस्थिती आहे तरुणांनी या कार्याकडे वळावे या उद्देशाने ग्रामायनने आतापर्यंत तीन युवकशिबिरे घेतली. तसेच अन्य संस्थांच्या अशा शिबिरांना मदतही केली.

ग्रामायनने आतापर्यंत प्रसिद्ध केलेल्या 'आदिवासींच्या जमिनीचे हस्तांतर – नवा कायदा' व 'रोजगार हमी' या योजनांच्या प्रत्यक्ष कार्यवाहीसाठी आवश्यक ते मार्गदर्शन करणाऱ्या दोन पुस्तिका कार्यकर्त्यांना खूपच उपयुक्त ठरल्या आहेत. पुढेही अशा पुस्तिका प्रसिद्ध करावयाच्या आहेत.

गेल्या तीन वर्षांत म्हैसाळ, शहादे, दामखेडा, खानापूर, नायगाव (मावळ), विंझर येथील प्रकल्पांना ग्रामायनने थोडेफार सहाय्य केले आहे. मागील वर्षी झालेल्या सामुदायिक विहिरींच्या सर्वेक्षणात ग्रामायनचा सहभाग होता. यातील काही विहिरींची प्रकरणे हाती घेऊन ती पूर्ण करण्याचे ठरले आहे. विविध ग्रामविकास प्रकल्पांची ठिकठिकाणी जाऊन माहिती गोळा करणे हे काम नेहमीच चालू असते. अशा कामात प्रवासखर्च बराच होतो मेळावे, शिबिरे अशा कार्यक्रमासाठीही पैसे उभे करावे लागतात. पुण्यात राहून सर्व कामाचे संयोजन करणाऱ्या व कार्यालयीन कामकाज पाहणाऱ्या कार्यकर्त्यांच्या मानवेतनाचा खर्च आहे. याच वर्षी ग्रामायनचे सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट व पब्लिक ट्रस्ट ॲक्टनुसार रजिस्ट्रेशन झाले आहे. त्यामुळे कार्यालयीन व्यवस्थेचा खर्चही महत्त्वाचा आहे.

या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या तर ग्रामायनला पुढील एक वर्षासाठी पंचवीस हजार रुपयांपर्यंत निधी गोळा करावा लागेल व हा सर्व निधी आम्ही आपल्यासारख्यांच्या मदतीनेच उभा करणार आहोत ग्रामायनचे स्वयंस्फूर्त व निरपेक्ष स्वरूप कायम राखायचे असेल तर त्यासाठी आणि ग्रामायन चळवळीत लोकांचा सहभाग वाढविण्यासाठी सर्वसामान्य माणसाच्याकडूनच मदत मिळवायला हवी, असे आम्हाला वाटते. त्या दृष्टीने 'नियमीत सहभागा'ची एक योजना इथे सुचवीत आहोत.

आपण 'ग्रामायन'ला दरमहा कमीत कमी पाच रुपयांपासून आपल्याला योग्य वाटेल तेवढी ठराविक रकमेची मदत द्यावी. आमचा तरुण कार्यकर्ता ही रक्कम दरमहा आपल्याकडून गोळा करील व आपल्याला रीतसर पावती देईल आपण सलग किमान एक वर्ष तरी अशी रक्कम द्यावी अशी अपेक्षा आहे या योजनेला प्रतिसाद देऊन आपण ग्रामायनला सहकार्य द्यावे ही विनंती त्याचबरोबर नवनिर्माणाच्या या कार्यात आपण प्रकल्पांना भेटी देणे; मेळाव्यामध्ये सहभागी होणे, नियमित सभांना येऊन विचारविनिमयात भाग घेणे या मार्गांनी आपला सहभाग वाढवावा असेही आमचे आपणास आवाहन आहे

आपले,

**स. द. देशपांडे, दि. वि. गोखले, श्री. ग. माजगावकर श. द. कुलकर्णी, बिंदुमाधव जोशी, अनिल काळे, पुरुषोत्तम हर्डीकर**

पत्रव्यवहाराचा पत्ता :

**'ग्रामायन'**
द्वारा : साप्ताहिक 'माणूस'
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

'ग्रामायन', पब्लिक ट्रस्ट
रजि. नं. एफ् ९९६, पुणे.

# कलकत्ता मेल

तारा पंडित

सकाळी १० चा सुमार. श्री. ज्योती बसूंचे भाषण होते साहजिकच गर्दी खूप. मुख्य मंत्री असले तरी त्यांनी श्रोत्यांना तिष्ठत ठेवले नाही दहाच्या ठोक्याला ते व्यासपीठावर हजर

वेष तोच वर्षानुवर्षाचा–पांढरे शुभ्र धोतर नि कुडता आणि डोळ्यावर चष्मा. शरीरयष्टी सामान्य माणसासारखी मंत्री म्हटला की गोलगरगरित पोटाची आणि तुकतुकीत चेहऱ्याची आकृति आमच्या मनात साकार होत असते; पण ज्योतीबाबू अगदी १०० टक्के अपवाद साठी नुकतीच उलटली असली तरी चापल्य तरुण माणसासारखे. मुद्रा शांत, डोळ्यात अगणित विचार असावे, पण बोलताना संयम कमालीचा. कुणालाही आकर्षण वाटेल इतके सरळ, सोपे नि मुद्देसूद बोलण्याची पद्धत.

मार्क्सवादी नेता म्हणून भाषणे केलेली असली तरी आज एका राज्याचे मुख्य मंत्री ह्या नात्याने श्रोत्यासमोर ते उभे होते. त्यांचा विषय होता–The State of West Bengal–Its problems and prospects. विषय सर्वांना माहीत असला तरी ज्योतीबाबूंनी पुन्हा एकदा त्याचे मोठ्याने उच्चारण केले. मग ते म्हणाले–विषय फार मोठा आहे; तरीपण मी जे काय बोलेन ते माझ्या मनातील विचारांचे प्रगट चिंतनच असेल आणि लागलीच त्यांनी पश्चिम बंगालच्या समस्यांना हात घातला. ते म्हणाले–

पश्चिम बंगालमध्ये अत्यंत गहन समस्यांना आपण तोंड देत आलो आहोत. हे प्रश्न उपस्थित झाले नसते तर बंगालची परिस्थिती खचित सुधारली असती. येथील ७०-२० टक्के लोक खेड्यात राहतात जेथे कोणत्याही सुधारणा झाल्या नाहीत. केवळ शहराची प्रगती म्हणजे संपूर्ण प्रगती नव्हे. तीस वर्षांपूर्वी बंगालचे तुकडे झाले तेव्हा संपूर्ण बंगालचा फक्त ⅓ भाग हा पश्चिम बंगाल म्हणून भारताच्या वाट्याला आला. त्याच वेळी समस्यांना सुरुवात झाली. पूर्व पाकिस्तानातून ६० ते ७० लाख लोक निर्वासित म्हणून आले. त्यांना पश्चिम बंगालमध्ये आश्रय देणे भाग होते भारतातील इतर राज्यांना हे सहन करावे लागले नाही पंजाबमध्ये जरी निर्वासित आले होते तरी तेथून तेवढ्याच प्रमाणात परतही गेले होते. पंजाबचे बाबतीत मालमत्ता आणि माणसे यांची केवळ अदलाबदल झाली, एवढेच. पंजाबला पश्चिम बंगालप्रमाणे भार सहन करावा लागला नाही. खरे तर प. बंगालची ही समस्या संपूर्ण भारताची होती व तसे केंद्रसरकाने मानलेही होते; पण ते आपल्या वचनाला जागले नाहीत निर्वासितांनी इतरांच्या जागा बळकावल्या. सरकारने त्यांच्यासाठी काहीच केले नाही. आता आपल्या इथे ६०–७० ज्यूट–मिलस् आहेत, पण ज्यूट पिकतो तो पूर्व बंगालमध्यच. भारतसरकारने आम्हाला तांदुळाऐवजी ज्यूटचे पीक काढण्यास सांगितले जेणे करून ह्या मिलस् चालू राहतील. आम्ही ज्यूट पिकवू लागलो; पण आम्हाला कमी पडणारा तांदूळ इतर राज्यातून मिळेल असे तेव्हा दिलेले आश्वासन केंद्र सरकारने कधीच पाळले नाही.

दुसरी समस्या औद्योगिक क्षेत्रात निर्माण झाली. भारताच्या इतर भागापेक्षा पश्चिम बंगालमध्ये कारखाने फार अगोदर स्थापन झाले. कदाचित इंग्रज सरकारच्या काळापासूनच येथे मोठ्या प्रमाणावर कारखाने सुरू झाले होते. आमची सर्व मशिनरी साहजिकच आज जुनी झाली आहे. इतर राज्यात नवे कारखाने निर्माण झाले तशी नवी मशिनरी त्यांना मिळत गेली आणि परिणामतः त्यांचे कारखाने आमच्यापेक्षा अधिक चांगल्या प्रकारे चालू लागले. आम्ही मागेच पडलो. अर्थात ह्यात आम्ही कोणालाच दोष देत नाही. कारण इतर ठिकाणी कारखाने निर्माण करणे अत्यावश्यक होते. त्यांना नवी यंत्रे मिळणे साहजिक होते. तसेच आमची जुनी यंत्रे काढून नवी बसविणे खर्चाच्या दृष्टीने परवडणारे नव्हते. हे सर्व आम्ही मानतो. तरीपण हा मुद्दा लक्षात घेण्यासारखा आहे असे आवर्जून म्हणू इच्छितो.

आता तिसरा मुद्दा. प. बंगाल औद्योगिकदृष्ट्या इतर राज्यांच्या मानाने पुढे होता साहजिकच कारखान्यांना मजुरांची गरज निर्माण झाली आणि मग काय, इतर राज्यामधून मजुरीसाठी लोकांचे लोंढेच्या लोंढे येऊ लागले. लोक वाढले आणि त्याबरोबर इतर अनेक समस्या निर्माण झाल्या. काही वर्षांतच प. बंगालची प्रगतिपथावरील गती कासवापेक्षाही मंदावली. याची अनेक कारणे सांगता येतील एक तर वस्तूंचे दर सर्व राज्यात सारखे नव्हते– आजही नाहीत अन्यत्र ७ रु. किलोच्या भावाने मिळणारे गोडे तेल आम्हाला १४ रु किलो पडते. याप्रमाणे सर्व आवश्यक वस्तूंचे भाव वाढत राहिले. ह्याचा परिणाम राज्याच्या अर्थनीतीवर झालाच, पण राजनीतीवरही दिसून आला. यावर इलाज नाही. आता आंध्रमध्ये जास्तीचा तांदूळ पिकत असूनही केंद्रसरकार आमची गरज भागविण्यापुरता तांदूळ आम्हाला देऊ आमची उणीव भरून काढायला तयार नाही. अशा वेळी भारत खरोखरच एक आहे का असा संभ्रम मनात निर्माण होतो.

दुसरे कारण बेकारी. बेकारी सर्व भारतातच आहे हे खरे, पण येथ ६० टक्के कामगार अ–बंगाली असल्यामुळे बंगाली कामगार तसेच बेकार राहिले. बंगालमध्ये अन्य राज्यातून आलेल्या मजुरांना मजुरी देऊन सर्व भाषिकांना एकत्र आणण्याचा फार मोठा प्रयास आम्ही केला; पण याचा परिणाम काय झाला? तसेच निर्वासितांच्या वस्तीत कारखाना उभा केल्यावरही कामगार म्हणून त्यांच्या तरुण मुलांना कामावर न घेता अन्य राज्यातून कामगार आणले गेले. या वागण्याला काय म्हणावं? केंद्रसरकारकडून आम्हाला नेहमीच कमी कमी सवलती मिळत गेल्या. आमच्या अत्यावश्यक गरजा काय? म्हणून विचारण्यात येते तेव्हा काय काय सांगणार? यादी फार मोठी होते.

क्षुल्लक पण महत्त्वाची गोष्ट. खेड्यामधून पिण्याच्या पाण्याचा दुष्काळ आहे. अलीकडे शहरामधूनही दिसतो. त्यासाठी काहीच उपाययोजना झाल्या नाहीत. शिवाय इथे दारिद्र्य आहे, बेकारी आहे, शिक्षणाची पुरेशी व्यवस्था नाही. बंगालमध्ये फक्त २५ टक्के जमीन लागवडीखाली आहे. मी महाराष्ट्रात जाऊन पाहिले. पुण्यामुंबईसारखी

शहरे वगळता तेथील खेड्यांमध्येही अशीच दशा आढळून आली याचा अर्थ महाराष्ट्र आणि बंगाल याबाबतीत तरी एकाच माळेचे मणी होत, हे कळून चुकले. म्हणूनच पुण्या–मुंबईसारखी शहरे कितीही सुधारली असली तरी महाराष्ट्राने प्रगति केली असे म्हणता येणार नाही त्याची स्थिती बंगालसारखीच तिथेही इथल्याप्रमाणे कसेल त्याची जमीन नाही जमिनीची मालकी निराळ्याच हातात आहे. ह्या सर्व बाबतीत अगोदरचे सरकार अगदी बेपर्वा राहिले.

बंगालमध्ये मुख्यत. शिक्षण आणि नोकरी ह्या दोन्ही क्षेत्रात फार गोंधळ माजलेला आहे. शिक्षणातील गोंधळाकरिता विद्यार्थ्यांना जबाबदार धरता येणार नाही. त्या क्षेत्रातील अधिकारीवर्गाबरोबर चर्चा करून कुठे चुकते याचा अंदाज घेता येईल तसेच Employment Exchange अगदी निरुपयोगी ठरले आहे तिथे नाव नोंदविल्याने नोकरी मिळण्याची शक्यताच दिसत नाही.

महत्त्वाचा व अत्यंत गंभीर प्रश्न म्हणजे गेल्या ३० वर्षांत वाढावलेली लाचखाऊ प्रवृत्ती. अगदी वरच्या थरापासून तो खालच्या पातळीपर्यंत जिथे तिथे ही प्रवृत्ती (corruption) आढळून येते. तिच्याविरुद्ध झगडणे हे आजच्या काळात फार महत्त्वाचे आहे. तिला जरी थोडाफार आळा आम्ही घालू शकलो तरी आपण काही तरी केल्याचे समाधान आम्हाला नक्कीच मिळेल. वरच्या थरात–अगदी उद्योगपतीमध्येही ह्या corruption चे इतके व्यवस्थित संचलन चालते, की ते सरळ सरळ विचारतात–आम्ही जर प्रामाणिकपणे वागलो तर आमचा बिझिनेस चालणार कसा? राजकारणातही हा गोंधळ माजलेला दिसून येतो. गेल्या ३० वर्षांत ह्या घाणेरड्या प्रवृत्तीचे चांगलेच भरणपोषण झाले आहे; आता तिचे मुळासकट उच्चाटण करण्याचा आमचा संकल्प आहे. त्यासाठी सर्वसामान्य लोकांची मदत आम्हाला हवी आहे. यापूर्वी कोणाही सरकारने सामान्य जनतेला विश्वासात घेतलेले नाही; पण आम्ही ते करणार आहोत. एकदा निवडून आल्यानंतर हे नेते लोकांच्या दृष्टीसही पडत नसत मग एकदम पाच वर्षांनी पुढच्या निवडणुकीच्या वेळीच त्यांना जनतेची आठवण येई व ते हात पसरून जनतेच्या मताची भीक मागत आणि एकदा निवडून आले की मग कसली जनता नि कसले काय! आम्ही मात्र जनतेशी सतत संपर्क साधणार आहोत, जेणेकरून आमच्या यशापयशाचा हिशोब त्यांच्यासमोर उघडा राहील, आमच्या चुका दाखविण्याची जनतेला मुभा राहील व त्यायोगे आम्हाला आमच्या धोरणात सुधारणा करणे शक्य होईल

आमच्या समस्या अनेक आहेत हे खरे; पण आजच्या परिस्थितीत आम्ही फार थोड्या योजना आखू शकतो. आम्हाला एकच वाटते भांडवलशाहीचा मार्ग अवलंबिल्याने भारताची कधीही प्रगती होणे शक्य नाही. भांडवलशाहीमुळे अनेक मक्तेदारांचा (monopolies) सुळसुळाट झाला. गरीब गरीबच राहिले. श्रीमंत अधिक श्रीमंत झाले. मालक आणि मजूर यांच्यात नेहमीच बेबनाव होत आले. आम्हाला हे नको आहे. उलट छोटेछोटे उद्योगधंदे मोठाल्या कारखानदारीशी संलग्न करायचे आहेत. आज आम्ही साध्या साध्या गोष्टींसाठी–गरजेच्या वस्तूसाठी एका विवक्षित व्यापारीवर्गावर अवलंबून आहोत. तसे होऊ नये म्हणून वितरणपद्धतीतच बदल घडवून आणणे महत्त्वाचे आहे.

एकूण, आमच्यासमोर समस्या अनेक असल्या तरी आम्ही निराशावादी नाही हे आवर्जून सांगू इच्छितो.

जनतेचे लक्ष वेधून घ्यावे असा एक मुद्दा म्हणजे आम्हाला केवळ आर्थिक साहाय्यच हवे आहे असे नाही' तर ज्या काय सोयी घडवून आणल्या जातात त्यांची देखभाल करणेही तितकेच महत्त्वाचे वाटते. उदा. एखाद्या ठिकाणी ट्यूबवेलची गरज आहे. ती गरज पूर्ण करून दिली तरी नंतर तिची देखभाल होणे आवश्यक आहे नुसती योजना अमलात आणून चालणार नाही. ती बरोबर राबविली जाते किंवा नाही हे पाहणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे आणि ह्याच ठिकाणी जनतेचे सहाय्य हवे आहे थोडक्यात, जनतेचे सहाय्य मिळाले तर उन्नती नक्कीच होईल. म्हणून एकजुटीने भारताची लोकशाही टिकविणे हे सर्वांचेच प्रथम कर्तव्य होय, त्यासाठी झटले पाहिजे.

– भाषण संपताच टाळ्यांच्या कडकडाटात मुख्य मंत्री पुन्हा आसनस्थ झाले. त्यानंतर त्यांना काही प्रश्न विचारण्यात आले. त्यांचीही त्यांनी अगदी समर्पक उत्तरे दिली. एकूण दीड तास वेळ देऊन त्यांनी श्रोत्यांना भरपूर समाधान दिले. मार्क्सवादी विचारसरणीचा हा पहिलावहिला मुख्य मंत्री आणि तोही निवडून आलेला म्हणून सारेजण कुतूहलाने त्यांचेकडे पाहात होते. मतदानातून यश मिळवून मार्क्सवादी सत्ता प्रस्थापित झालेले प. बंगाल हे पहिले राज्य होय.

– सर्वसामान्य लोकांना मुख्य मं[illegible] बर वैचारिक देवाणघेवाण करण्याचा लाभ प्राप्त झाला तो येथील 'योगक्षेम' नावाच्या एका संस्थेमुळे ही संस्था १९७० मध्ये स्थापन झाली त्या वेळी कलकत्यात तंग वातावरण होते. अशा विचित्र परिस्थितीत काही मंडळी एकत्र आली व त्यांनी समाजकार्यासाठी झटावे असे ठरविले. भगवद्गीतेतील आध्यात्मिक सुगंध असलेला 'योगक्षेम' हा शब्द अचूक निवडून संस्थेचे नामकरण केले सभासदांनी आपली जास्तीची शक्ती व वेळ ह्या महानगरीच्या कल्याणार्थ खर्च करावा असे ठरले आणि १९७० मधील रामनवमीच्या शुभमुहूर्तावर कार्यारंभ केला. त्यांनी दरमहा उत्कृष्ट भाषणांची एक योजना आखली. त्या दृष्टीने विविध विषयावर बोलण्यासाठी विद्वान् मंडळींना ही संस्था आवाहन करीत असते. ह्या भाषणांचा लाभ जास्तीत जास्त लोकांनी घ्यावा असा त्यांचा आग्रह असतो आजवर ह्या monthly-lecture-meet तर्फे हमीद दलवाई, एकनाथजी रानडे, सौमेंद्रनाथ टागोर, प्रो समर गुहा, स्वामी बुधानंद, प्रो हरिपद भारती आदि अनेक मान्यवर व्यक्तींचा संस्थेला व पर्यायाने समाजाला लाभ झाला.

ह्या संस्थेतर्फे एक दवाखाना–प्रसूतिगृह चालते. रक्तदानमोहिमेतील संस्थेचे यश वाखाणण्यासारखे आहे सेंट्रल ब्लड बँकेचे डायरेक्टर श्री पी. सी मित्र यांनी त्याबद्दल गौरवपूर्ण प्रशस्तिपत्र संस्थेला पाठविले आहे. याखेरीज शाळांना, मंदिरांना देणग्या देण्याचे काम संस्था करीत असते. संशोधनकार्य करणाऱ्या विद्यार्थ्याला–आर्थिक अडचण असेल तर–त्याच्या बुद्धीचे चीज व्हावे ह्या दृष्टीने merit Promotion ची योजना योगक्षेम संस्थेने आखली आहे व आजवर अनेकांना त्यांनी असे साहाय्यही केले आहे.

अशा तऱ्हेचे समाजकार्य करणाऱ्या इतर संस्थांशी संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न योगक्षेमने नुकताच सुरू केला आहे.

योगक्षेमचे संस्थापकमंडळ सुमारे पंचवीस जणांचे आहे बहुतेक सभासद उद्योगपती किंवा मोठमोठ्या अधिकारपदावर आहेत. काही तरी चांगले व आदर्श कार्य करण्याच्या सदिच्छेने ही मंडळी एकत्र आली आहेत. आपल्या गरजू बांधवांचा योगक्षेम नीट चालण्यासाठी मदतीचा हात पुढे सरसावीत आहेत. त्या दृष्टीने योगक्षेम संस्थेचे कार्य कौतुकास्पदच आहे. □

# बद्दयाबोळ

## परभणी कृषिविद्यापीठाचा

### श्री साळुंके यांच्याशी बातचीत

महाराष्ट्राचे माजी मुख्य मंत्री श्री. शंकरराव चव्हाण यानी आणीबाणीच्या काळात जी अनेक पापे केली त्यापैकी एक पाप म्हणजे परभणीच्या मराठवाडा कृषिविद्यापीठाचे त्या वेळचे उपकुलगुरु श्री डी. के. साळुंके याना एका वर्षाच्या अल्पशा सेवेनंतर सेवा-मुक्त केले गेल्या वर्षी भर आणीबाणीत श्री. साळुंके अचानक विद्यापीठाच्या सेवेतून मुक्त झाले व लगोलग त्यानी अमेरिकेत जाण्याचा निर्णय घेतला. हे वृत्त तसे खळ-बळजनक होते. श्री. साळुंके कोणासही तशी फारसी कल्पना न देता अचानक अमेरिकेस निघून गेले. तशाही स्थितीत काही पत्र-कारानी त्याच्या अचानक जाण्याचे रहस्य उलगडून काढले, पण ते रहस्य सेन्सॉर-शिपच्या दडपणामुळे रहस्यच राहिले त्या-नतर तब्बल वर्ष-दीड वर्षाने श्री साळुंके आता एक महिन्याच्या सुट्टीवर भारतात परत आले असून परवाच त्यानी त्याच्या या अचानक जाण्याचा उलगडा मुबईत पत्र-काराशी बोलताना केला.

श्री साळुंके यानी अचानक अमेरिकेत जाण्याचा निर्णय घेण्यामागचे कारण म्हणजे त्याचे श्री शकरराव चव्हाणाशी झालेले मतभेद व परभणी कृषिविद्यापीठात काही राजकारणी मंडळीनी सुरू केलेली दादागिरी होय.

परभणी कृषिविद्यापीठातील या राज-कारण्याच्या दादागिरीचे उदाहरण देताना श्री. साळुंके यानी एक मजेदार पण चिंता-जनक माहिती पत्रकारांना सागितली विद्या-पीठाच्या कार्यकारिणीचा सदस्य असलेल्या एका माजी उपमंत्र्याने एका हुषार विद्या-र्थ्याला नापास करण्यासाठी एका सामान्य प्राध्यापकाला डीन केले होते व शेवटी त्या फर्स्टक्लास करियरच्या विद्यार्थ्यास त्या वर्षी नापास केले. कार्यकारिणीचे दुसरे एक सदस्य, ज्याना आपले नाव मराठीत-देखील बरोबर लिहिता येत नसे, ते पी. एच. डी.च्या विद्यार्थ्यांचे इटरव्ह्यू घेत असत.

श्री. साळुंके यानी विद्यापीठाच्या सुधा-रणेबाबत श्री चव्हाण याना वेळोवेळी वैय-क्तिकरीत्या सूचना केल्या होत्या ; पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. परभणी शह-राचे सारे मलमूत्र वाहून नेणारा एक नाला या विद्यापीठ परिसरातून जातो. त्या नाल्याचा मार्ग बदलावा अशी सूचना श्री साळुंके यानी केली होती; पण शंकर-रावानी ही सूचना केराच्या टोपलीत टाकली. हा नाला अजूनही विद्यापीठ-परिसरातून सुखनैवपणे वाहत आहे. या साऱ्या प्रकर-णाला एकदा जाहीर स्वरूप देण्यासाठी श्री. साळुंके यानी उपकुलगुरु असताना एका पदवीदानसमारभात श्री.शकरराव चव्हाणाना प्रमुख पाहुणे म्हणून बोलावले व आपल्या भाषणात श्री. चव्हाणाना बरेच चिमटे घेतले; पण त्याचा उपयोग काय झाला तर आणीबाणीची नशा चढलेल्या शकररावानी, 'हे भाषण या हॉलच्या बाहेर जाता कामा नये' असे जिल्हाधिकाऱ्याना बजावले.

श्री साळुंके याची मराठवाडा कृषि-विद्यापीठाचे उपकुलगुरु म्हणून त्या वेळेचे राज्यपाल श्री. अलीयावर जग यानी जेव्हा नियुक्ती केली तेव्हा श्री. साळुंके याना मराठवाडा कुठे आहे आणि परभणी कुठे आहे हेही माहीत नव्हते; पण केवळ देशा-साठी काही तरी करून दाखवायचे या ईर्षेने ते परभणीस आले. परभणीस येण्यापूर्वी त्यानी आपण केवळ आपल्या चेंबरमध्ये बसून न राहता जास्तीत जास्त वेळ मराठवाड्या-तील खेड्यापाड्यातील शेतीच्या प्रत्यक्ष पाहणीस देणार आहोत असे कुलपतीना स्पष्टपणे सागितले होते.

मराठवाडा. कृषिविद्यापीठात विद्यार्थ्यां-पेक्षा कुत्रीच जास्त आहेत त्याना मारायची व्यवस्था करा अशी विनतीही साळुंके यानी केली होती; पण तीही मान्य झाली नाही.

माणूस पुरला तर अख्ख्या माणसाचे पीक यावे अशी मराठवाड्याची जमीन आहे; पण या कृषिविद्यापीठाच्या ताब्यात प्रचड जमीन असूनही हे लोक त्या प्रमाणात पीक काढीत नाहीत अशी तक्रार श्री. साळुंके यानी केली.

महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठे गरजेऐवजी राजकारणातून निर्माण झाली आहेत असा आरोप त्यानी केला सरकारचा चार कृषिविद्यापीठे काढण्याचा निर्णय म्हणजे प्रचड अशी चूक होती. या चार विद्यापीठाचा पाढरा हत्ती पोसण्यासाठी दरवर्षी सुमारे वीस कोटी रुपये खर्च कर-ण्यात येतात आणि त्याचा फायदा मात्र सामान्य शेतकऱ्यापर्यंत पोहचतच नाही अशी व्यथा श्री. साळुंके यानी व्यक्त केली. ही विद्यापीठे केवळ मध्याची शेती प्रगत कर-ण्यात गुतली आहेत असा त्यानी कडवट अभिप्राय दिला.

श्री. साळुंके यानी या विद्यापीठाच्या कामात सुसूत्रता आणून तेच ते सशोधन व त्यावर होणारा खर्च टाळला पाहिजे असे आग्रहाने सागितले. त्यानी यासाठी चार विद्यापीठावर एकच कृषिआयुक्त नियुक्त करण्याची सूचना त्या वेळचे राज्यपाल श्री. अलीयावर जग याना केली होती; पण विद्यापीठाचे 'प्रो चॅन्सलर श्रीयुत शकरराव चव्हाण यानी (का कोण जाणे) या सूचनेसही गटाराचे पाणी दाखविले.

भारतातल्या सध्याच्या एकदर शिक्षण-पद्धतीवरच खरे तर श्री साळुंके नाराज आहेत त्याची ही नाराजी केवळ अमेरिके-सारख्या धनाढ्य देशात राहिल्यामुळे निर्माण झालेल्या अहगडामुळे (Superiority Complex) मुळे निर्माण झाली आहे असे समजण चुकीचे ठरेल. वास्तविक अमेरिकेत शिक्षणासबधी जो जागरूकता दाखविली जाते त्यापासून प्रभावित होऊन, त्या तुलनेत भारतीय शिक्षणाचा खालावलेला दर्जा पाहून त्याना दुःख होते हे स्पष्ट आहे.

भारतीय शिक्षणात सुसगती व गरज याना कुठे प्राधान्य दिसतच नाही असे त्याचे स्पष्ट मत आहे आणि त्यानी असे मत करून घेतले तर त्यात काही गैर नाही मुळात भारतात शैक्षणिक क्षेत्रात असाव तेवढे किमान पावित्र्यदेखील पाळले जात नाही, तेव्हा त्यात सुसगती व गरजा याना

प्राधान्य मिळेल की नाही अशीच शंका वाटते.

परभणी कृषिविद्यापीठातील काही प्राध्यापकाविषयी बोलताना साळुंके यानी सागितले की, स्थानिक प्राध्यापक स्पर्धेत टिकू शकत नाहीत. त्यामुळे त्याचा बाहेरचे प्राध्यापक घेण्यास सतत विरोध असे.

श्री. साळुंके यांनी जातपात व प्रातभेद न पाहता काही प्राध्यापक विद्यापीठात आणण्याचा प्रयत्न केला; पण त्यांस विद्यापीठात दादागिरी करणाऱ्या राजकारण्यानी व प्राध्यापकानी दोघानीही विरोध केला. त्याना मराठवाड्यातीलच प्राध्यापक हवे होते. हा दृष्टिकोण यापुढेही चालला गेला तर का बरे मराठवाडा मागास राहणार नाही ?

देशात प्रगतीसाठी नवे ज्ञानवत निर्माण करावयाचे असतील तर एका स्वच्छ आणि सुसगत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची आवश्यकता आहे असे मत श्री. साळुंके यानी पत्रकाराजवळ व्यक्त केले.

यासाठी त्यानी काही शिफारसीही केल्या आहेत. त्याच्या मते बरीच वर्षे धूळ खात पडलेला कोठारी कमिशनचा अहवाल प्राधान्य निर्धारित करून समयबद्धरीत्या अमलात आणला पाहिजे. शिकविण्याची पद्धती अधिक विकसित केली पाहिजे. यासाठी श्री. साळुंके यांनी एक ३० कलमी कार्यक्रमही तयार केला आहे. विद्यापीठ अनुदानमंडळाने विद्यापीठाच्या कार्यक्रमाची पूर्ण पाहणी व तपासणी करून मगच रकमा मजूर केल्या पाहिजेत असे त्याचे मत आहे; पण भारतात घडते ते वेगळेच. येथे प्रत्येक विद्यापीठासाठी रकमाचा कोठा साठवून ठेवला जातो व तो खर्च करण्यासाठी निरनिराळ्या निरर्थक योजना तयार केल्या जातात.

असो. भारतातील शिक्षणक्षेत्राच्या गलथानपणावर लिहावे तितके अपुरेच ठरेल; पण एवढे खरे की, दैवाने मिळालेले श्री. साळुंके मराठवाडा कृषिविद्यापीठाने, शकररावाचे कर्म आडवे आल्यामुळे गमावले आहेत हे खरे. या पापाला एकट्या शकररावानाच जबाबदार धरता येणार नाही तर विद्यापीठाचे काही प्राध्यापक व विद्यार्थी यानीही शकररावाच्या हाताला हात लावून 'मम' म्हटले आहे.

—एक पत्रकार

---

आर्थिक टिपणे

# आम्ही भगीरथाचे पुत्र !

नारायण वैद्य

फार प्राचीन काळची गोष्ट. अयोध्येच्या इक्ष्वाकू वशात भगीरथराजा होऊन गेला तो अशुमानाचा नातू व दिलीप राजाचा मुलगा अशुमानाचा पितामह सगर याचे ६० हजार पुत्र कपिलमुनीच्या शापाने (हिमालयात) दग्ध झाले होते. त्यामुळे त्याना सद्‌गती मिळाली नव्हती; परतु कपिलमुनींनी उःशाप दिला आणि 'दग्ध झालेल्या पुत्राच्या रक्षेवरून गगा वाहील तेव्हाच ते उद्धरतील' असे सागितले. अशुमान आणि दिलीप यानी स्वर्गातल्या गगेला पृथ्वीवर आणण्यासाठी तप केले; परतु त्याच्या प्रयत्नास यश आले नाही. भगीरथाच्या उग्र तपश्चर्येने गंगा त्याच्यावर प्रसन्न झाली आणि तिने दर्शन देऊन भगीरथाला सागितले की, 'मी तुझ्यासाठी पृथ्वीवर येते, परंतु स्वर्गातून खाली पडणारा माझा प्रवाह धारण करण्यासाठी तू शकराला प्रसन्न करून घे !' तेव्हा भगीरथाने शकराची आराधना केली शकर प्रसन्न झाला. त्याने स्वर्गातून कोसळणारा गगेचा प्रवाह आपल्या जटासभारात धारण केला व आपला एक केस तोडून गगेच्या प्रवाहाला वाट करून दिली गगेच्या या प्रवाहाला अलकनदा हे नाव पडले. त्यानतर भगीरथाने गगेला आपल्या मागून येण्यास सागितले आणि ज्या ठिकाणी सगरपुत्राची रक्षा पडली होती, त्यावरून गगेचा प्रवाह नेऊन भगीरथाने सगरपुत्राचा उद्धार केला.

ही पौराणिक कथा आधुनिक जगाला पुष्कळ काही सागून जाते. हिमालयाच्या दक्षिणेला हल्लीच्या पजाब, हरियाना, उत्तर प्रदेश इत्यादी प्रातातून वारवार पडणारा दुष्काळ कायमचा दूर करण्यासाठी राजा सगर आणि त्याचे ६० हजार प्रजाजन यानी हिमालयात पडणारे प्रचड पाणी उत्तरेकडे वाहून जाण्याऐवजी दक्षिणेकडे वळविण्याचा प्रयत्न केला. सगरापासून भगीरथापर्यंत इक्ष्वाकु वशातले चार राजे, त्याचे असख्य प्रजाजन, हजारो श्रमिक, तत्रविशारद यानी हिमालयातील हिमवर्षाव, बर्फाची जोरदार वादळे, पाऊस, जगले, हिंस्र पशू याना तोड देऊन आणि हिमालयातले प्रचड पहाड फोडून गगानदी आणि इतर अनेक लहानमोठे जलप्रवाह दक्षिणेकडे वळविले. कैलासचा राजा शकर याचेही त्याना सहाय्य झाले अशा तऱ्हेने हिमालयाच्या दक्षिणेकडील हजारो चौरस मैल प्रदेश सुजलाम् सुफलाम् झाला असा वरील पौराणिक कथेचा आधुनिक अर्थ लावण्यात सहाय्यभूत होणारी भगीरथ प्रयत्नाच्या मालिकेतील एक घटना रविवार तारीख १० जुलै १९७७ या दिवशी पजाबात घडली बियास–सतलज जोडकालवा या दिवशी सुरू झाला.

बियास प्रकल्पाचा एक भाग म्हणजे बियास–सतलज जोडकालवा १० जुलै १९७७ रोजी ४७१६ दशलक्ष घनमीटर पाणी बियासनदीतून सतलज खोऱ्यात आले व तेथून पुढे भाकरा प्रकल्पातील गोविंदसागर तलावात दाखल झाले. कामगार आणि तत्रज्ञ मिळून ४०,००० जणाचे एक तपाचे भगीरथ-प्रयत्न या कालव्याच्या रूपाने साकार झाले. या तपश्चर्येत काहींना प्राणाचा त्यागही करावा लागला

या सर्व कामाची आखणी, रचना आणि कार्यवाही भारतीय इजिनिअर व तत्रज्ञ यानीच केली आहे अगदी आधुनिक तत्ररचना वापरून व नव्या साधनाची निर्मिती करून पूर्णत्वास गेलेल्या या कार्याला एकूण ३८० कोटी रु खर्च आला. अशासारख्या कठीण कामाला यशस्वीपणे तोड देण्यास आपल्या देशातली बुद्धी, तत्र व परिश्रम सिद्ध आहेत असे या उदाहरणाने दाखवून दिले आहे. हे काम पूर्ण झाल्यानतर हजारो माणसाचे प्रचड मनुष्यबळ वाया न दवडता त्याचा उपयोग अशाच तऱ्हेच्या दुसऱ्या प्रकल्पासाठी करून घेण्याची योजना सरकारने त्वरित आखणे जरुरीचे आहे. १२ वर्षांच्या या कालखडात या कामी जे कोणी धारातीर्थी

पडले त्याचे केवळ स्मारक उभारून ही जबाबदारी संपणार नाही.

या योजनेसाठी इंटरनॅशनल डेव्हलपमेंट एजन्सी व युनायटेड स्टेट्स् एजन्सी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट यांनी ५१ ८५ दशलक्ष डॉलरची मदत केली आहे यामुळे उत्तरेकडील पंजाब, हरियाना, हिमाचलप्रदेश, राजस्थान या प्रांतांना नवजीवन मिळणार आहे. जादा १३ लक्ष एकर जमीन पाण्याखाली येईल व सुमारे १५०० मेगॅवॅट वीज निर्माण होईल. यातली पहिली दोन जलविद्युतकेंद्रे येत्या ऑक्टोबरमध्ये सुरू होतील. उपकेंद्रे व विद्युतवहनव्यवस्था पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत. भाक्रानानगलच्या प्रकल्पावर आजपर्यंत अवाढव्य खर्च करूनसुद्धा पाण्याअभावी हजारो चौरस मैल प्रदेश ओसाड व दुर्लक्षित राहिला होता. आता या प्रदेशाच्या शेवटच्या गावापर्यंत वीज व पाणी पोचेल.

बियास–सतलज जोडकालवा हे आंतरप्रांतीय सहकार्याचे उत्तम उदाहरण म्हणता येईल. समृद्ध अशा कुलु. कांगडा व सुरवेत खोऱ्यातली जमीन हिमाचलप्रदेशाने दिली. राजस्थान, पंजाब व हरियाना यांच्या वतीने केंद्रसरकारने पैशाची व्यवस्था केली. या योजनेचा लाभ वरील चारही राज्यांना प्रमाणात मिळणार आहे. आंतरप्रांतीय नद्यांच्या पाणीवाटपाच्या प्रश्नावर अनेक ठिकाणी इतके मतभेद आहेत की, देशातले पाटबंधाऱ्याचे १८ मोठे प्रकल्प आणि १४ मध्यम दर्जाच्या योजना गेली अनेक वर्षे अडकून पडल्या आहेत. प्रतिवर्षी बांधकामाचे व निर्मितीचे खर्च मोठ्या प्रमाणावर वाढत आहेत. ज्या योजना पंधरा–वीस वर्षांपूर्वी सुरू झाल्या असत्या त्या यापुढे सुरू होण्याने खर्च दुप्पट लागेल हे गणित शासनकर्त्यांना समजले नाही असे म्हणणे धाडसाचे ठरेल. याबाबतीत जनतासरकारने संबंधित प्रांतांना आपापले नद्यांच्या पाणीवाटपाचे वाद मिटविण्याची अखेरची संधी द्यावी व तसे न झाल्यास राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने एकतर्फी निर्णय घेऊन मोकळे व्हावे.

कृषिउत्पादन वाढविण्यासाठी जे अनेक उपाय आपण योजतो त्यात मान्सूनवर अवलंबून न राहता देशभर कालवे, पाटबंधारे यांचे जाळे निर्माण करणे महत्त्वाचे आहे. पाणीपुरवठा व विद्युत्‌निर्मिती यासाठी मोठ्या प्रमाणावर धरणयोजना आखल्या जात आहेत. विजेचा उपयोग शेतीला होतोच. अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी देशभर जे प्रयत्न चालू आहेत त्यात नद्यांच्या पाणीवाटपाच्या भांडणामुळे फार मोठा अडथळा येतो हे संबंधितांना समजले पाहिजे. □

## इलेक्ट्रॉनिक्स...

१९७६–७७ च्या इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या वार्षिक अहवालात वरवर पाहणाराला प्रगतीच्या काही खुणा दिसत असल्या तरी या क्षेत्रात प्रगतीला खूप वाव असूनसुद्धा त्याचा योग्य तो फायदा आपण घेतला नाही असे आढळून येते.

१९७६–७७ मध्ये इलेक्ट्रॉनिक्स मालाचे उत्पादन ४१० कोटी रुपयांचे झाले. त्या मागील वर्षीचे उत्पादन ३६४ कोटी रुपयांचे गृहीत धरले असता ही वाढ १३ टक्के झाली असे म्हणता येईल या मालाच्या किंमतीत दर वर्षी काही प्रमाणात वाढ होतच असते. त्यातला काही भाग अधिक नफा मिळविण्याच्या दृष्टीने असल्यास ही वाढीची टक्केवारी स्थिर किंमती धरून आणखी कमी होण्याचा संभव आहे या इलेक्ट्रॉनिक्स मालामध्ये सामान्य माणूस रोजच्या व्यवहारात रेडिओ, टी व्ही इत्यादी ज्या वस्तू वापरतो त्यांचा समावेश आहे, तसाच औद्योगिक कारखान्यात लागणाऱ्या वस्तू व इतर व्यापारी माल यांचाही समावेश आहे रेडिओ, टी व्ही आदी रोजच्या व्यवहारातील मालाचे उत्पादन १९७६–७७ मध्ये मागील वर्षापेक्षा २५ टक्क्यांनी वाढले. या उलट व्यापारी मालाचे उत्पादन मात्र १० टक्क्यांनी वाढले, ही बाब विचार करण्यासारखी आहे. रेडिओ, टी व्ही. सारख्या करमणुकीच्या साधनांचे उत्पादन एकूण उत्पादनाच्या ८० टक्के आहे म्हणजे त्याव्यतिरिक्त फारच थोड्या वस्तू इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात उत्पादित होतात. ही वस्तुस्थिती ठीक नाही

१९७५ मध्ये टी. व्ही. चे ९६ हजार ८शे सेट्स् तयार झाले आणि १९७६ मध्ये १लक्ष ५३ हजार ५ शे सेट्स् तयार झाले. रेडिओ सेट्स् १९७५ मध्ये २६ लक्ष २० हजार तर १९७६ मध्ये २९ लक्ष ८० हजार तयार झाले सदर अहवालात एक चांगली गोष्ट नमूद आहे की, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, कॅल्क्युलेटर्स इत्यादी माल तयार करण्यात आपल्या देशात लघुउद्योगांनी आघाडी मारली आहे. टी. व्ही. सेट्स्, कॅसेट् टेपरेकॉर्डर यांच्या एकूण उत्पादनापैकी ७० टक्के उत्पादन लघुउद्योगाद्वारे होते आणि एकूण इलेक्ट्रॉनिक्स मालापैकी ४० टक्के वाटा लघुउद्योगाच्या उत्पादनाचा आहे

इतके असूनसुद्धा रोजच्या वापरात येणाऱ्या या प्रकारच्या वस्तू परदेशातून मोठ्या प्रमाणावर आयात होतच आहेत. चोरट्या मार्गानेही ही आयात चालू असते. असे का व्हावे यावर विचार झाला पाहिजे. एक तर देशात मालाचा दर्जा म्हणावा तितका चांगला नाही. या मालाच्या निर्मितीला लागणारे सुटे भाग दर्जेदार नसतात. दुसरी गोष्ट म्हणजे तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीच्या अशा तऱ्हेच्या वस्तूंची दुरुस्ती व देखभाल करण्याची सेवायोजना चांगल्या पद्धतीची देशभर उपलब्ध नाही विकसित देशातील टीव्हीसेट चांगली सेवा ६००० तास देतो आपल्या देशात निर्माण झालेला सेट सरासरी २०० तास चांगली सेवा देतो हे लक्षात घेतले म्हणजे मालाचा दर्जा सुधारण्यासाठी किती प्रयत्न करावयास हवेत ते कळेल अधिक उत्पादनवाढीसाठी अधिक कारखाने काढा हेही म्हणणे येथे बरोबर नाही कारण सध्या अस्तित्वात असलेल्या कारखान्यांच्या एकूण उत्पादनक्षमतेपैकी फक्त एकतृतियांश क्षमताच सध्या वापरली जाते.

देशाच्या गरजेच्या मानाने उत्पादनाची दिशा असावी. आपले उत्पादन केवळ शहरी भाग डोळ्यासमोर ठेवूनच केले जाते ग्रामीण भागात नेण्यास, वापरण्यास व दुरुस्त करण्यास सोपे जातील असे रेडिओ, टीव्ही सेट्स जोपर्यंत मोठ्या प्रमाणावर उत्पादित होणार नाहीत तोपर्यंत या वस्तूंच्या उपयोग करण्याचा वेग मर्यादितच राहील.

परदेशी बाजारपेठ या मालासाठी मिळवावयाची असेल तर दर्जेदार उत्पादनाशिवाय दुसरा मार्ग नाही. म्हणून दर्जेदार उत्पादनासाठी जशी आधुनिक यंत्रसामुग्री, उत्तम तंत्रज्ञान आवश्यक आहे तसे खरेदीनंतरची सेवाही समाधानकारक देण्याची व्यवस्था अत्यावश्यक आहे.

इंडियन अग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिट्यूटचे डॉ. जगदीश बहादूर यांचे म्हणण्यानुसार हिमालयातील वितळणाऱ्या बर्फामुळे तेथून वाहाणाऱ्या नद्यांना उन्हाळ्यात जेव्हा पूर येतात तेव्हा ते वरदान ठरते, परंतु पावसाळ्यात तो शाप ठरतो हिमालयात उगम पावणाऱ्या आणि उत्तर व पूर्व भारत समृद्ध करणाऱ्या गंगा, यमुना, सतलज, गोमती, रामगंगा, घोगरा, राप्ती, गंडक, कोसी, ब्रह्मपुत्रा या नद्यांना पावसाळ्यात जे महापूर येतात त्यामुळे जीवित व वित्तहानीचे वार्षिक नुकसान २०० कोटी रुपयांचे होतेच; पण त्याबरोबर पूरग्रस्तांच्या सहाय्यार्थ केंद्र व प्रांतिक सरकारांना वर्षाला १० कोट रु. खर्च येतो. □

( न्यूज रिपोर्ट सप्टें. १५, १९७६ )

# जेपी : सुधारक, बंडखोर की क्रांतिकारक ?

## एका मार्क्सवादी अभ्यासाचे परीक्षण

शरद पाटील, धुळे

सुरतेच्या ' सेंटर फॉर रीजनल डेव्हलपमेंट स्टडीज 'चे डॉ. घनश्याम शहा यांचा– ' रेव्होल्यूशन, रिफॉर्म ऑर प्रोटेस्ट ? ए स्टडी ऑफ बिहार मुव्हमेंट ' – नावाचा उत्कृष्ट प्रबंध ' एकॉनॉमिक अॅन्ड पोलिटिकल वीकलीत ' क्रमशः प्रसिद्ध झाला. त्याची अन्वेषण-पद्धती मार्क्सवादी असल्याचे एकूण विवेचनावरून दिसते. उजव्या कम्युनिस्ट पक्षानेही अनेक पुस्तिका प्रसिद्ध करून जीपीप्रणीत आंदोलनाचे ' मार्क्सवादी ' विवेचन केले; पण क्रांतीची जबाबदारी या पक्षाने कॉंग्रेस पक्षावर व सरकारवर टाकलेली असल्याने त्याने जेपींना व त्यांच्या आंदोलनाला प्रतिक्रांतिकारी, फॅसिस्ट लेखणे स्वाभाविक होते. आणीबाणी पुकारली गेल्यानंतरच्या प्रत्यक्ष परिस्थितीने कॉंग्रेसचा या देशाला फॅसिस्ट हुकुमशाहीत कायम जखडायचा बेत होता हे सिद्ध झाले आहे. उजव्या कम्युनिस्ट पक्षाने अशा प्रकारे मार्क्सवादी अन्वेषणपद्धतीचा उपयोग घातकाला मुक्तिदाता भासविण्यासाठी केला. मार्क्स आपल्या विचारसरणीबद्दल म्हणतो–' आजपर्यंतच्या तत्त्वज्ञानी हे जग कसे आहे ते सांगितले; मी हे जग बदलावे कसे हे सांगतो. ' मार्क्सवादी अन्वेषणपद्धतीने म्हणून आपले विवेचन समाजपरिवर्तनकारी शक्तींना मार्गदर्शक होईल अशा प्रकारे केले पाहिजे. या कसोटीवर शहांच्या अभ्यासाचे परीक्षण करायचा हा प्रयत्न आहे.

### बिहार

शहांनी बिहारची व्युत्पत्ती दिली असती तर बरे झाले असते. बिहार शब्द ' विहार ' वरून बनला. भिक्षुसंघाच्या विहाराचा देश, बुद्धाचा देश. बुद्धाची जन्मभूमी नेपाळ, पण कर्मभूमी व महापरिनिर्वाणतीर्थ बिहार. वज्जी, मल्ल, इ० महासंघगणाचे अभिजन–वतन असलेला हा बिहार. विहारचा अर्थ केवळ भिक्षुसंघाचा मठ नाही, तर मूलतः संघगणराज्याची भव्य राजकीय वास्तु. तिच्या चैत्यात वा सस्थागारात संघगणाच्या लोकनियुक्त सभासदांच्या ( बहुधा ५०० ) नियमितपणे सभा–सन्निपात होत आणि प्रत्येक प्रश्नावर मतांची ( छंदांची ) – वेळ पडल्यास शलाकामतदानाने–गणना करून निर्णय घेतले जात. या संघगणाच्या उच्छेदाला कोसल–मगधासारख्या सामंती हुकुमशाह्यांनी वृद्ध बुद्धाच्या शाक्य गणापासून सुरुवात केली. तीनशे वर्षांपूर्वी भारताचा आद्य अराजक संघगण –यादवाचा–उत्तर प्रदेशातील मथुराभागात जन्मला. उत्तर प्रदेश व बिहारच्या सरहद्दीवरील एका गावात जेपींचा जन्म व्हावा हा भारतीय इतिहासाचा अनन्य योगायोगच म्हणायचा !

विशेषेकरून ज्या बिहारला उद्देशून बुद्ध अंतिम क्षणी उद्गारला, " रम्य आहे जंबुद्वीप, मनोरम आहे मानवी जीवन! " त्या बिहारला ' दरिद्री लोकांचा समृद्ध देश ' असे म्हटले जात असल्याचे शहा सांगतात. भारतात सर्वांत दरिद्री ! पण बिहारची वसुंधरा भारताचा ४६ टक्के टक्के कोळसा, ४३ टक्के बॉक्साइट, ८२ टक्के तांबे व ८८ टक्के कायनाइट पोटात घेऊन उभी आहे. जमीन अशी की रवींद्रनाथाच्या शब्दांत प्रेयसीच्या नासिकाग्रावर मारायला खडाही सापडायची मुष्किल ! पण शेतीउत्पादनाचे प्रमाण भारताच्या सरासरीच्याही खाली. दर वर्षी हजारो लोक दुष्काळ, महापूर व रोगराईने मरतात. ७४ साली देवीच्या साथीत २२,००० लोक मेले. ( ' देवीचा रोगी कळवा व १००० रु. चे बक्षीस मिळवा ! ' ) आणि डॉक्टर ग्रामीण जनतेच्या दर २४,००० लोकसंख्येला १ आहे (भारताची सरासरी १७,००० ला एक).

बिहारची ८२% जनता खेड्यात रहाते. लागवडीखालील जमिनीपैकी ३३% जमीन लोकसंख्येच्या ५.४ % असलेल्या जमीनदारांच्या ताब्यात आहे. ७१.६ % शेतकऱ्यांपाशी ५ एकरांपेक्षा कमी जमीन आहे. या गरीब शेतकऱ्यांपैकी ४% लोक दरवर्षी आपली जमीन विकतात. स्वातंत्र्याच्या गेल्या २५ वर्षांत हे जमीनविक्रीचे प्रमाण तिप्पट वाढले आहे. शेतमजुरांची संख्या ६१ मध्ये २३% होती, ती ७१ साली ३९% झाली. हरिजन एकूण लोकसंख्येच्या १४.१% आहेत तर आदिवासी ८.८% शेतमजुरांचा सरासरी रोज १ ते १॥ रु. आहे व रोजगार वर्षातून २०० दिवसावर मिळत नाही. यामुळे लाखो शेतमजूर, विशेषत. हरिजन व आदिवासी, वरिष्ठ जातीय जमीनदार–सावकाराचे कर्जापोटी निमगुलाम, बद्ध श्रमिक ( bonded labour ) बनतात. बिहारी बद्ध श्रमिकांना खास नाव आहे. ' सौंकिया ' फादर सौपिन त्याचे वर्णन करतात–

'...एखाद्या माणसाला केवढे का कर्ज असेना, ते फिटेपर्यंत त्याला सावकाराकडे काम करावे लागते. सकाळची न्याहारी, दुपारचे जेवण व २ कच्चे शेर साळ, मका वा डाळ मिळते. या एका शेरात त्याने आपल्या कुटुंबाचे पोटही भरले पाहिजे व कर्जाची फेडही केली पाहिजे. या गरीब लोकांवर आणखी दहशत बसवण्यासाठी ते गैरहजर राहिले की–मग कारण आजारपण असो की लग्नकार्य–दर खाड्याच्या रोजामागे २ रु. चे कर्ज लावले जाते...'

खास्त्या भांडवलदारांच्या बिहार चेंबर ऑफ कॉमर्सचा एक अधि-

कारी म्हणाला, 'आपण सर्वांना फंड दिला पाहिजे, कॉंग्रेसला व विरोधी पक्षानाही. म्हणजे जो सत्तेवर येईल तो आपले हितसंबंध सांभाळील!' कॉंग्रेस पक्ष तर जमीनदाराचा आहेच; पण स्वतंत्र व जनसघासारखे कॉंग्रेसेतर पक्ष ६७ साली सत्तेवर असता एकूण आमदारापैकी ⅔ जमीनदारवर्गापैकी होते. या सर्वांनी सीलिंगसारखे जमीनसुधारणा कायदे अमलात येऊ दिलेले नाहीत. जमीनदार–सावकाराच्या अन्यायाविरुद्ध रयतेसाठी सनदशीर मार्गाने झगडणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना खोटया केसेसमध्ये गुतवून जेलमध्ये घातले जाते. पदरीच्या लढाइताकडून मारठोक केली जाते वा जीवे मारले जाते. सच्चिदानद प्रसाद या बकाच्या समाजसेवकाने बेदखल आदिवासीची बाजू घेतली म्हणून त्याला मारठोक करून बलात्काराच्या खोटया खटल्यात गोवले गेले. थिओडोर कुजूर या हमिया गावातील एकमेव सुशिक्षिताने सावकाराविरुद्ध कुळाना झगडायला उद्युक्त केले म्हणून त्याचा खून केला गेला व खबरीमधील वहिमीची नावे चार्जशीटमध्ये गाळली जाऊन केस ( १९७१ ची नं. १८९ ) दाबली गेली.

बेकारीचा प्रश्न एवढा वाढलेला आहे की केवळ ग्रॅज्युएट बेकारांची सख्या ६७ मध्ये १४,०७९ होती ती ७२ त ६६,००० वर गेली. निमसरंजामी अर्थव्यवस्थेच्या या वाढत्या आर्थिक अरिष्टामुळे मध्यमवर्ग व बुद्धिजीवी मुख्यत वरिष्ठ जातिवर्गाचे असले तरी त्यानाही लढायला लावले.

औद्योगिक कामगार एकूण २,७१,६१९. बहुसंख्य इटकसंघटित; काही कम्युनिस्टाकडून व समाजवाद्याकडून थोडे.

गेल ऑमवेट सागतात की, दुसऱ्या महायुद्धापूर्वी बिहारची किसानसभा भारतात सर्वात मोठी होती. ३८ मध्ये अखिल भारतीय किसानसभेची सभासदसख्या ५,४६,००० होती, त्यात बिहारची २,५०,००० होती; पण स्वातत्र्यकाळात केरळ व बगाल पुढे गेले, बिहार मागे पडला ६४ मध्ये दोन कम्युनिस्ट पक्ष झाल्यानंतर बिहारमध्ये वर्चस्व उजव्या कम्युनिस्ट पक्षाचे राहिले कॉंग्रेसच्या भाडवलदारी–जमीनदारी धोरणामुळे जेव्हा देशातील वाढत्या असतोषाबरोबर खुद्द कॉंग्रेसमधले अरिष्ट तीव्र होऊन ती दुभगली, तेव्हा बिहारचा उजवा कम्युनिस्ट पक्ष जनतेची कॉंग्रेसविरोधी फळी उभारायला असमर्थ ठरला. सघटनात्मक दौर्बल्यामुळे नाही तर कॉंग्रेस–सहकारवादी धोरणामुळे. नक्सलवादी ग्रामीण गोरगरिबात जरी गेले, तरी अतिरेकी धोरणामुळे जनतेपासून अलग पाडले जाऊन विरडले जाऊ शकले.

कॉंग्रेसविरोधी लढाऊ धोरणामुळे जनसघाच्या विद्यार्थिपरिषदेने ७२ नतर उजव्या कम्युनिस्ट पक्षाच्या विद्यार्थी फेडरेशनऐवजी स्वत:चे वर्चस्व स्थापन केले. पाटणा युनिव्हर्सिटी स्टुडट्स युनियनने १७ व १८ फेब्रुवारी ७४ ला बोलाविलेल्या परिषदेतून विद्यार्थी फेडरेशनने सभात्याग केला. विद्यार्थी परिषदा, समाजवादी युवजन सभा, सर्वोदयी तरुण शातिसेना इ. सघटनाची कम्युनिस्टेतर आघाडी बनली. कम्युनिस्ट व कम्युनिस्टेतर विद्यार्थीसघटनाचे महागाईविरोधी लढे मग परस्परविरोधात वाटचाल करीत गेले. २१-३-७४ पर्यंत ११ शहरात कर्फ्यू पुकारली गेली, अनेक ठिकाणी सैन्य बोलावले गेले. गोळीबारात २२ लोक मारले गेले व शेकडो पकडले गेले. ६ एप्रिल ७४ ला कम्युनिस्टेतर विद्यार्थीसघटनानी आदोलनाची सूत्रे जेपीच्या हवाली केली.

## जेपी कम्युनिस्टविरोधी ?

पण येथपर्यंत वस्तुनिष्ठपणे चाललेले शहाचे विवेचन जेपीप्रवेशाबरोबर काहीसे आत्मनिष्ठ बनते. ते म्हणतात की विद्यार्थीपरिषदेने म्हणजे जनसघाने, या आदोलनाची सूत्रे जेपीच्या हवाली याकरिता केली, की ते कम्युनिस्टविरोधी होते बिहारबदच्या सुमारास जेपीनी– "मार्क्सवाद या भूमीत रुजणारा नाही"–असे विधान केले त्याचा ते दाखला देतात. गाधीवादी समाजवादाचे समर्थक म्हणून जेपी मार्क्सवादाचे विरोधक आहेत हे खरे; पण याचा अर्थ ते कम्युनिस्टविरोधी होते व आहेत असे जे समीकरण केले जाते ते वस्तुस्थितीला धरून आहे का ?

बिहारच्या आदोलनावर गफूर सरकारने केलेल्या अनन्वित दडपशाहीने देश संतप्त झाला असता देशाचे लक्ष जेपीनी प. बगालमध्ये ७२ पासून मार्क्सवादी कम्युनिस्टपक्षावर व त्याअगोदरपासून नक्सलवाद्यावर चालू असलेल्या फॅसिस्ट दडपशाहीकडे वेधले. कॉंग्रेसी एकाधिकारशाहीविरोधी बिहारी वा भारतीय आघाडीत मार्क्सवादी कम्युनिस्टपक्षाचा सहभाग आवश्यक असल्याची त्यांनी अनेकदा वक्तव्ये केली एवढेच नाही तर त्यासाठी त्यानी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या अग्रगण्य नेत्याशी वाटाघाटी केल्या. मार्क्सवादी कम्युनिस्टपक्षाच्या डाव्या व लोकशाहीवादी आघाडीच्या त्या वेळच्या ताठर धोरणावर शहानी टीका न करायचे कारण हे की ते स्वत त्याचे पुरस्कर्ते आहेत या ताठर धोरणाला नतर मुरड घालण्यात मात्र मार्क्सवादी कम्युनिस्टपक्षाने तत्त्वच्युति केलेली आहे असे त्याना वाटते! महाकवी गटेचे एक वचन मार्क्स नेहमी उद्धृत करीत असे– 'तत्त्वज्ञान वठते, पण जीवन सदाबहार असते!' बदलत्या राजकीय परिस्थितीनुसार डावपेचात्मक धोरणही बदलले पाहिजे हेच खरे मार्क्सवादी तत्त्व आहे अनित्य राजकीय परिस्थितीला नित्य डावपेचात्मक धोरणच लागू केले पाहिजे हे वठलेले तत्त्व आहे!

महात्मा गाधीचे नेतृत्व, कॉंग्रेस व कॉंग्रेसातर्गत डाव्याची एकजूट याबद्दल कम्युनिस्टानी घेतलेल्या भूमिकेवा जेपीना दुसऱ्या महायुद्धापूर्वीच्या काळात जो अनुभव आला त्यामुळे ते कम्युनिस्टविरोधी झाले, असे शहा म्हणतात. यामुळे जेपी कम्युनिस्टविरोधी बनणे स्वाभाविक असले तरी ते कम्युनिस्टविरोधी नव्हते याचा नि:सदिग्ध निर्वाळा मार्क्सवादी कम्युनिस्टपक्षाचे नवे सरचिटणीस ई एम. एस. नबुद्रिपाद यानी त्याच्या –'हाउ आय बिकेम ए कम्युनिस्ट' या आत्मचरित्रात दिलेला आहे. १९३४ साली जेपीनी स्थापन केलेल्या 'कॉंग्रेस सोशॅलिस्ट पार्टीच्या' राष्ट्रीय कार्यकारिणीचे नबुद्रिपाद हे ३४ पासून ३७ साली कम्युनिस्ट बनेपर्यंत सभासद राहिलेले असल्याने त्यानी उभी केलेली जेपीची प्रतिमा अभ्यसनीय आहे. ही प्रतिमा आहे एका थोर देशभक्ताची–जो सुमगत साम्राज्यशाहीविरोधी होता व एका मार्क्सवादी मानवतावाद्याची–जो कम्युनिस्टाचा मित्र होता. स्वातत्र्यचळवळीला भाडवलदारी–जमीनदारी चौकटीत ठेवू इच्छिणाऱ्या कॉंग्रेसमधील उजव्या नेतृत्वाविरुद्ध कॉंग्रेसमधील डाव्यांची समाजवादी–कम्युनिस्ट ऐक्याभोवती एकजूट करण्यात ते

महायुद्धाला तोंड लागेतो प्रयत्नशील होते; पण नंबुद्रिपादनी जेपीच्या सर्वांत महत्त्वाच्या पैलूवर, शेतकरीक्रांतीबद्दलच्या त्याच्या धोरणावर, जो प्रकाश टाकलेला आहे तो विशेष उल्लेखनीय आहे. स्वातंत्र्य-क्रांतीची परिणति साम्राज्यशाहीचा सर्वांत भरवशाचा दोस्त असलेल्या जमीनदारवर्गविरोधी सशस्त्र शेतकरीक्रांतीने व्हावी यासाठी ते दुसऱ्या महायुद्धाला तोंड लागायच्या वेळी तयारी करीत होते, ज्याचे पर्यवसान मग ४२ च्या उठावात झाले. चिनी क्रांतीला समांतर असणारा हा विचार होता. (पहा माझा दैनिक 'स्वतंत्र भारत 'मध्ये प्रसिद्ध झालेला लेख – 'ब्राह्मणवाद ते साम्यवाद'). म्हणून आज स्वातंत्र्याच्या क्रांतीला जेपी 'अपूर्ण क्रांती' म्हणत आहेत.

## सर्वोदयातील संघर्ष

तेलंगणमधील जमीनदारशाहीविरोधी कम्युनिस्टप्रणीत सशस्त्र शेतकरी उठावावर उतारा म्हणून विनोबांनी भूदान-आंदोलन उभारले, तरी जेपी जीवनदानी बनण्यामागील प्रेरणा मुख्यतः कम्युनिस्टविरोधाची नसून तीच अपूर्ण क्रांती पूर्ण करायची होती. घडलेल्या घटनांचे विश्लेषण घटकांच्या स्वतःच्या प्रेरणा-जाणिवांच्या आधारे करायचे नसते हा मार्क्सवादी सिद्धान्त योग्य असला, तरी प्रेरक व्यक्ती हयात असल्यास त्यांच्या प्रेरणा-जाणिवांना केवळ वर्गीय सदरात टाकून मोकळे होणे सोपे असते, पण योग्य नसते. शहांना हा मोह आवरत नाही–

'जरी सर्वोदयी विचारसरणी क्रांतीची समर्थक असली, तरी प्रत्यक्ष व्यवहारात तिने आजतागायत 'जैसे थे' लाच मदत केली आहे. वर्गसमन्वय व साधनशुद्धीच्या आग्रहाने जमीनदारवर्गाला, श्रीमंतांच्या भांडवलदार व इतर विभागांना आजपर्यंत मदत झाली आणि गरिबांचा शोषकांविरुद्धचा संघर्ष शमवायला सहाय्य झाले ..'

या वर्गीय विश्लेषणात जेपी व सर्वोदय चळवळ दोन्ही बसतात. या विश्लेषणाने सर्वोदयाच्या चौकटीत विनोबा व जेपी यांच्यामधील मतभेद मार्गभिन्नता होण्यापर्यंत का गेले याचे उत्तर मिळत नाही. खुद्द विनोबा व कॉंग्रेस राज्यकर्ते यांच्यात ६४ नंतर कसा दुरावा येत गेला व ६९ च्या कॉंग्रेसमधील दुफळीतून तो कसा वाढला याचा मागोवा शहा घेतात, पण या दुराव्यातून विनोबा 'नैष्कर्म्यसिद्धी-कडे' गेले तर जेपी 'कर्मयोगाकडे' हे कसे? शहा म्हणतात त्याप्रमाणे सर्वोदयी 'अशासनसंस्थावादी' आहेत हे खरे, पण त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर जेपी विनोबांप्रमाणे शासनसंस्था व संसाराबद्दल उदासीन न रहाता जनतेच्या बाजूने हस्तक्षेप करायला उद्युक्त झाले.

'याउलट जयप्रकाश नारायणनी राजशक्तीवर नियंत्रण ठेवण्या साठी जनतेच्या शांततापूर्ण संघर्षाचा प्रभावी पुरस्कार केला. (बिहार) राज्य विधानसभा बरखास्त करायच्या मागणीचे समर्थन करताना जेपींनी खुलासा केला, 'माझ्याबद्दल सांगायचे तर मला असे वाटते की अशा मंत्रिमंडळाच्या राजीनाम्याची व अशा विधानसभेच्या बरखा-स्तीची मागणी सर्वथैव उचलून धरली नसती तर नागरिक म्हणून माझ्यावरील जबाबदारीशी मी द्रोह केला असता. माझ्या अशा प्रकारे वागण्यात सर्वोदय तत्त्वज्ञान आडवे येत असेल तर त्याच्या अशा आकलनाचा मी किमानपथी अव्हेर करतो. खरे पहाता सर्वोदय-कार्यकर्ता म्हणून माझ्यावरील जबाबदारीची माझी जाणीव अशी आहे की लोकशाही सत्तेच्या व संस्थांच्या अशा गैरवापराचा निषेध करण्यासाठी व त्याविरुद्ध लढण्यासाठी माझा आवाज मी शक्य तितक्या जोरदारपणे उठविला पाहिजे व शक्य तितक्या प्रभावीपणे क्रियाशील झाले पाहिजे.'

सर्वोदय संघाची आधारभूत तत्त्वे म्हणजे सत्य व अहिंसा, पण कॉंग्रेसी हुकुमशाहीविरुद्ध लढण्यासाठी त्यांना मुरड घालावी लागेल याची जाणीव जेपींना झाली होती. म्हणून 'अहिंसक' व 'शांति-पूर्ण' मार्गांमध्ये भेद केला. शांतिपूर्ण मार्गाला गुप्तता विहित आहे असे त्यांनी प्रतिपादिले. हरिद्वार पांडे नावाचे उत्तर भारतीय सर्वो-दयी कार्यकर्ते त्यांच्या 'संपूर्ण क्रांति की अनिवार्यता, उद्देश्य, सिद्धान्त और कार्यक्रम' या पुस्तकात म्हणतात–

'वास्तवात हिंसा व अहिंसा परस्परविरोधी नाहीत, परस्परांचे भाग आहेत, एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, कोणत्याही समा-जाची व राष्ट्राची अंगे आहेत कोणताही विचार वा कार्यक्रम केवळ हिंसात्मक वा अहिंसात्मक असू शकत नाही सर्वत्र हिंसा व अहिंसेची सरमिसळ आहे फरक आहे केवळ अंशाचा. कमी हिंसा किंवा जास्त हिंसा......हिंसा कमी होऊ शकते पण नष्ट होऊ शकत नाही.'

कॉंग्रेसी हुकुमशाहीविरोधी लढ्याला जेपींनी फेब्रुवारी ७४ मध्ये ४२ ची पुनरावृत्ती म्हटले व देश क्रांतीकडे जात आहे असा भविष्य-सूचक इशारा दिला ऑक्टोबर ७४ मधील तीन दिवसांचा बिहार बंद झाल्यानंतर जेपींनी बिहार विधानसभा बरखास्त न केली गेल्यास प्रतिसरकार स्थापायची हाक दिली जानेवारी ७५ मध्ये त्यांनी जनता-सरकारचा कार्यक्रम जाहीर केला. ग्रामस्तरापासून एकमताने समित्या निवडायची कल्पना वर्गीय नसून सर्वोदयी असली, तरी या समित्यांनी करायच्या समाजसुधारक कामाबरोबर भूदान व सरकारी जमिनीच्या वाटपाचाही कार्यक्रम अमलात आणायचा होता. भूदान-ग्रामदानाचा कार्यक्रम जरी अयशस्वी झालेला असला, तरी तो 'कम्युनिस्ट क्रांतीला' पर्याय म्हणून सर्वोदय व सरकारतर्फे राबविला गेला होता हे त्याचे खरे कारण होते. तेलंगणचा शेतकरीक्रांतीचा लढा चिरडला गेलेला होता आणि भारतात सनदशीर 'भूक्रांतीचे' कायदे व भूदान-ग्रामदान यांनी ग्रामीण असंतोषाला शामक वळण दिले गेले होते. यातून झालेल्या भ्रमनिरासाचे प्रतिबिंब खुद्द सर्वोदयसंघटनेत उमटू लागले होते शहा सांगतात –

'काही सर्वोदयी कार्यकर्ते मन वळवायच्या व हृदयपरिवर्तनाच्या पद्धतीबद्दल साशंक होऊ लागले. १९६७ मधील एका पाहणीत सर्व-सामान्य सर्वोदय कार्यकर्त्याला विनोबांची 'मृदु, मृदुतर, मृदुतम' पद्धतीची 'विधायक' सत्याग्रहाची कल्पना पूर्णपणे पटलेली नव्हती. त्याला असे वाटे की लगेच नाही तरी केव्हा तरी 'नकारात्मक' सत्याग्रह आवश्यक होईल. सत्तरीच्या प्रारंभिक वर्षांत सर्वोदयी कार्यकर्त्यांचा एक विभाग 'जातीय व राजकीय शक्तींचा' कोंडमोड करण्यासाठी अहिंसक सत्याग्रहाच्या आवश्यकतेचा पुरस्कार करू लागला होता. त्यापैकी काहींनी तामिळनाडूमधील काही खेड्यात जमीनवाटपासाठी सत्याग्रह संघटित केले...'

७१/७२ साली अंबरसिंगमहाराज, दामोदरदास मूंदडा व गोविंद-राव शिंदे या सर्वोदयी कार्यकर्त्यांनी व 'माणूस 'चे संपादक श्री. ग.

माजगावकर यांनी पुढाकार घेऊन शहादे भागात आदिवासी शेतमजुरावर होणाऱ्या जमीनदारी जुलमाविरुद्ध संघटित आवाज उठवण्यासाठी सर्वपक्षीय परिषद घेतली. सर्वोदय मंडळाने श्रमिक संघटनेच्या मार्क्सवादी विचारसरणीच्या तरुण कार्यकर्त्यांना शहाद्याला आणून सजविण्यात पुढाकार घेतला, आदिवासी शेतमजुराचे 'मालदारी' शोषणाविरुद्ध व निमलष्करी पीकसंरक्षणदलाच्या कटाविरुद्ध संघटित वर्गलढे उभारायला या कार्यकर्त्यांना सर्वतोपरी सहकार्य दिले व भूसत्याग्रहात त्यांच्याबरोबर कारावास स्वीकारला. मे २८ ला मी शहादे तालुक्यातील आमोद्याला ग्रामस्वराज्य समितीने घेतलेल्या 'धरणपरिषदेला' गेलो असता मालदार शेतकरी या सर्वोदयी मंडळीवर वर्गलढ्याना उत्तेजन देऊन गावोगाव दुफळी माजवायचे आरोप करताना ऐकले (आणि आता श्रमिकसंघटनेचे 'मार्क्सवादी' कार्यकर्ते या सर्वोदयी मंडळीवर वर्गसमन्वयाचा आरोप करून ग्रामस्वराज्यसमितीपासून वेगळे व्हायच्या आपल्या कृतीचे समर्थन करीत आहेत!)

## जनसंघवर्चस्वाचा बागुलबोवा

बिहार आंदोलन उजव्या प्रतिगाम्यानी, म्हणजे मुख्यतः जनसंघाने, सत्तेसाठी कॉंग्रेसद्वेषाने प्रेरित होऊन केलेली मूठभर मध्यमवर्गीयांची चळवळ होती, जेपी म्हणजे जनसंघादिकांच्या हातातील बाहुले होते, या आंदोलनाचा उद्देश इतिहासाचे चक्र मागे फिरवायचा होता, इ. प्रचाराचा पाठपुरावा उजवा कम्युनिस्ट पक्ष, लाल निशाण पक्ष, श्रमिक संघटना इत्यादींनी केलेला असल्यामुळे त्याचा काही ना काही परिणाम जनमनावर झालेला आहे. बिहार आंदोलन हे खरोखरच मूठभराचे आंदोलन होते का? शहा एका संशोधनातर्फे या आंदोलनाचा अभ्यास करायला बिहारला गेले होते. ते कडवटपणे म्हणतात—

'सर्वोदयी कार्यकर्त्यांनी व त्यांच्या पुरस्कर्त्यांनी क्रांती घडवून आणण्यासाठी जनतेवर मदार ठेवली. त्यानी जनसंघर्षसमित्या, जनतासरकार व जनतामोर्चे बनवले, पण ही जनता कोण होती? त्यानी या प्रश्नाकडे डोळेझाक केली; कारण तो प्रश्न त्यांच्या गांधीवादी तत्त्वज्ञानाविरुद्ध होता त्यांच्या मते जनतेत सर्व, प्रत्येकजण समाविष्ट आहे, पण वास्तवात त्यांची जनता शहरी वरिष्ठ व मध्यमवर्ग, जमीनदार व नवश्रीमंत शेतकरी यांच्यापुरती मर्यादित होती, जो एकूण जनतेचा एक छोटा हिस्सा होता हीच ती जनता होती की जिने आंदोलनाला पाठिंबा दिला व त्यात भाग घेतला. हीच ती जनता आहे की जिचा प्रचलित समाजव्यवस्थेत काही ना काही प्रमाणात फायदा झाला. तिला या व्यवस्थेत थोडे बदल घडवून आणून आणखी फायदे उपटायचे आहेत या व्यवस्थेच्या मूलभूत अंगामध्ये बदल घडविण्यावर तिचा विश्वास नाही. तिचे हितसंबंध याच व्यवस्थेत आहेत. तिच्या मते क्रांती ही एक घोषणा आहे. जेव्हा जेव्हा जेपींनी कामगाराच्या व 'नाही रें'च्या बाजूने किंचितशीही पुरोगामी भूमिका घेतली तेव्हा जेपीना डोक्यावर घेणाऱ्या याच जनतेने काढता पाय घेऊन समाजात वर्गसंघर्ष पेटवणारा गोंधळलेला माणूस म्हणून त्यांची संभावना करायला मागेपुढे पाहिले नाही या जनतेला कोणतीही क्रांती नको होती आणि ती दुसरी जनता दिङ्मूढ होऊन उभी होती, ती आंदोलनाबाहेर होती.'

## जनता

आंदोलनाबाहेर असलेली दुसरी, खरी जनता कोण होती? औद्योगिक कामगार, जो मुख्यतः इंटकच्या प्रभावाखाली होता, तरीही ज्याने जानेवारी ७४ च्या आंदोलनात डाव्यांच्या नेतृत्वाखाली मध्यमवर्गाशी हातमिळवणी केली होती. शेतमजूर व गरीब शेतकरी, जे अजून असंघटित होते, पण असंघटित असल्यामुळेच वरिष्ठ जातिवर्गांच्या प्रभावाखाली होते. मध्यम शेतकरी? १८ मार्च ७४ नंतर व्यापारी व श्रीमंतेतर शेतकरी (म्हणजे मध्यम शेतकरी) या आंदोलनात आले असे शहा सांगतात. यावरून हे आंदोलन खऱ्या जनतेचे नसल्याने ते व्यापक नव्हते. एवढेच नाही तर ते कोणतीही क्रांती नको असलेल्या जनतेचे होते असे ते सांगतात!

येथे जनता या शब्दाच्या अर्थाबद्दल गोंधळ आहे हा शब्द क्रांतीची अवस्था लक्षात न घेता केवळ शहरी व ग्रामीण श्रमिक व शोषित वर्गांसाठी वापरणे मार्क्सवादाला धरून नाही फ्रेंच क्रांतीत जनता कोण होती? सामंत व पुरोहितवर्ग सोडून बाकी सर्व. त्यात औद्योगिक भांडवलदार, व्यापारी, श्रीमंत व मध्यम शेतकरीही होते. भारतीय स्वातंत्र्यक्रांतीत जनता कोण होती? ब्रिटिश साम्राज्यशाहीचे भारतीय आधारस्तंभ राजेरजवाडे व जमीनदारवर्ग सोडून बाकी सर्व त्यात औद्योगिक भांडवलदार, व्यापारी, श्रीमंत व मध्यम शेतकरीही होते जेपींच्या शब्दात ही स्वातंत्र्यक्रांती अपूर्ण राहिलेली आहे तिला रूढ समाजशास्त्रीय परिभाषेत भांडवलदारी लोकशाही क्रांती म्हणतात. उजवा कम्युनिस्टपक्ष तिला राष्ट्रीय लोकशाही क्रांती म्हणतो, तर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष तिला जनतेची लोकशाही क्रांती म्हणतो. लाल निशाणपक्षाला एकदम समाजवादी क्रांती पाहिजे श्रमिक संघटनेने किमान व कमाल कार्यक्रम अजून आखलेला नसला, तरी मालदार व मजूर यांच्या वर्गलढ्यावर त्यांची अतिशयोक्त मदार, कॉंग्रेस व जनतापक्ष याना सारखेच प्रतिगामी लेखून कॉंग्रेसी एकाधिकारशाहीविरोधी आघाडी व लोकसभा निवडणुका यापासून 'अलिप्तता' इत्यादीवरून तीही लाल निशाणपक्षाच्याच मताची आहे असे मानायला हरकत नाही ज्या देशात निमसरंजामी जातिव्यवस्था व निमगुलामीबद्ध श्रम निरंकुशपणे नांदतात, ज्या ज्या देशात बहुसंख्य जमीन हडपून बसलेले जमीनदार–सावकार बड्या भांडवलदाराच्या गवादीत अघोरी राज्य करतात त्या देशात एकदम समाजवादी क्रांती कशी होणार? क्रांतीच्या आत्मनिष्ठकल्पनेपोटी ही मंडळी या लोकशाही क्रांतीतील मित्राना 'मालदार' वा शत्रू लेखून दोन्ही क्रांत्यांचे शत्रू एकदम अंगावर घ्यायची क्रांतियुद्धनीती त्यांच्या श्रमिक जनतेला शिकवीत आहेत! मार्क्सवादी क्रांतियुद्धनीती सांगते की लोकशाही क्रांतीचा जो मुख्य शत्रू आहे (बडे भांडवलदार–जमीनदार) त्याच्याविरुद्ध कामगारवर्गाने ते वर्गलढ्यातले शत्रू असले तरी क्रांतिलढ्यातले मित्र आहेत (बिगर बडे भांडवलदार, व्यापारी व श्रीमंत शेतकरी) व जे या दोन्ही लढ्यात मित्र आहेत (शहरी मध्यमवर्ग, मध्यम व गरीब शेतकरी, शेतमजूर) त्यांची क्रांतिकारी एकजूट उभारली पाहिजे. म्हणून अपूर्ण क्रांती पूर्ण करण्याच्या लढ्यात हे सर्व वर्ग मिळून जनता बनते.

या जनतेचे विशिष्ट विभाग जरी बिहारच्या आंदोलनात सामील झाले होते तरी ते मोठे जनआंदोलन होते, कॉंग्रेसी सत्तेविरुद्ध जनतेचे

बंद होते, हे शहा प्रांजलपणे नमूद करतात. या आंदोलनावर सर्वस्वी वर्चस्व जनसंघाचे होते व जेपी केवळ बाहुले होते हे खरे का ?

कम्युनिस्टेतर विद्यार्थीआंदोलनाची मध्यवर्ती संघटना बिहार छात्र संघर्ष समिती ही होती. तिचे कार्यालय तरुण शांतिसेना या सर्वोदयी विद्यार्थीसंघटनेच्या पाटणा कार्यालयात होते. छात्र संघर्ष समित्या सर्व शहरात, अनेक गावात व खेड्यात, कॉलेजात व शाळात स्थापन झाल्या होत्या. जिल्हा समित्यांची कार्यालये बहुधा गांधी पीस फाउंडेशनच्या इमारतीत, सर्वोदय कार्यालयात वा खादीभांडारात होती. जेथे कार्यालये नव्हती तेथे एखाद्या राजकीय पुढाऱ्याच्या घरी–बहुधा जनसंघाच्या समितीच्या बैठकी भरत. बिहार छात्र संघर्ष समिती व स्थानिक छात्र संघर्ष समित्या यांच्यामधला दुवा सर्वोदय कार्यकर्ते होते. शहा तरुण शांतिसेनेच्या कार्यकर्त्यांनी विशेष प्रभावित झाले. तरुण शांतिसेनेचे मुखपत्र 'तरुण क्रांति' हेच बिहार छात्र संघर्ष समितीचे मुखपत्र होते. अयशस्वी झाली तरी भूदानाची सर्वात मोठी चळवळ बिहारमध्ये झालेली असल्याने तेथील सर्वोदयी संघटना बिहार आंदोलनावर जनसंघाचे सर्वस्वी वर्चस्व स्थापन होऊ देण्याइतकी दुबळी खास नव्हती व जेपींची जनमान्यता जनसंघाचे बाहुले बनण्याइतकी निष्प्रभ निश्चितच नव्हती आणि म्हणूनच बिहार आंदोलनच्या चरम अवस्थेत एका बाजूला विद्यार्थी परिषद व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि दुसऱ्या बाजूला तरुण शांतिसेना व समाजवादी युवजन सभा यांच्यात परिषद-संघाच्या प्रभुत्वप्रयत्नाविरुद्ध तीव्र संघर्ष उद्‌भवून समांतर छात्र संघर्ष समित्या स्थापन झाल्या.

## जेपी कोण ?

बिहार-आंदोलनाला शहा बंड म्हणतात. त्यावरून जेपी बंडखोर असल्याचे त्यांना मान्य आहे. जेपींच्या कार्यक्रमात जातिभेद नष्ट करणे, दारूबंदी करणे इ. समाजसुधारक कार्यक्रम असल्याने ते सुधारकही आहेत; पण ते क्रांतिकारक आहेत का ? स्वातंत्र्यचळवळीत त्यांनी जी भूमिका पार पाडली त्यावरून स्वातंत्र्यक्रांतीच्या संदर्भात तरी ते क्रांतिकारक निश्चितच होते. काँग्रेसी हुकुमशाहीविरोधी सर्व शक्तींची राष्ट्रव्यापी एकजूट उभारून लोकशाही पुनरुज्जीवनाचा लढा यशस्वी करण्यात त्यांनी जी अनन्य भूमिका पार पाडली त्यावरून त्यांनी आपला क्रांतिकारी बाणा तेवत ठेवलेला आहे हे दिसते. सर्वोदयी मार्गाने समाजवादी क्रांती होणार नाही हे निःसंशय असले तरी, अपूर्ण क्रांती पूर्ण करण्यात त्यांची भूमिका काय राहणार आहे यावर त्यांचे या काळातले क्रांतिकारकत्व ठरणार आहे.

सर्वोदयी तत्त्वज्ञान जेवढे साम्यवादविरोधी आहे तेवढेच भांडवलशाहीविरोधी आहे असे शहा सांगतात. जेपींचे मार्क्सवादाशी मतभेद आहेत; पण ते कम्युनिस्टविरोधी नाहीत हे मागील विवेचनात स्पष्ट झालेले आहे. आता ते कितपत भांडवलशाहीविरोधी आहेत हे पाहण्यासाठी संपूर्ण क्रांत्युत्तर सर्वोदयी समाजाची कल्पना काय आहे ते पाहू या. शहा साररूपात सांगतात–

'जेपी व सर्वोदयी कार्यकर्ते ज्या समाजाची कल्पना करतात तो सर्वोदयी समाज आहे...शोषणविहीन, जातिविहीन व वर्गविहीन अशा समाजाची सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक चौकट गांधीवादी वा सर्वोदयी राहील...

'जेपींनी त्या समाजाचा ना आराखडा दिलेला आहे ना क्रांतीचे टप्पे. त्याऐवजी त्यांनी सूचनांची लांबलचक यादी दिलेली आहे. कृषिविकास, समान जमीनधारणा, श्रमबचतीची सुधारित अवजारे व यंत्रे यासारख्या समर्पक तंत्रज्ञानाचा वापर; घरगुती व ग्रामीण उद्योगांचा विकास आणि छोटे उद्योगधंदे, प्रादेशिक नियोजन व विकास यांचा कमाल विस्तार; राजकीय व कारभारात्मक विकेंद्रीकरण; शिक्षणाचे वरिष्ठवर्गीय स्वरूप नष्ट करण्यासाठी त्यात मूलग्राही सुधारणा; हिंदुसमाजाच्या सोपानसदृश जातिव्यवस्थेचा बीमोड; उत्पादनाला बाधा येणार नाही आणि राजकीय व शासकीय यंत्रणेशी निगडित असलेल्या व्यवस्थापकीय नोकरशाहीचा विशेषाधिकारप्राप्त वर्ग निर्माण होणार नाही अशा तऱ्हेने आर्थिक सोपानव्यवस्थेचा अंत. जमिनीचे फेरवाटप कसे करायचे आणि सामाजिक व आर्थिक सोपानव्यवस्था कशी नष्ट करायची याचा मात्र त्यांनी खुलासा केलेला नाही.'

समाजवादी देशही शोषणविहीन समाजातील सामाजिक व आर्थिक विषमता नष्ट करायचा संघर्ष करीत आहेत तो दीर्घकालीन आहे व प्रयोगांनी भरलेला आहे. यावाबतीत आणि शासकीय व आर्थिक विकेंद्रीकरणबाबतीत गांधीवादाचे माओवादाशी साधर्म्य दाखविले जाते. गांधीवादाविरुद्ध कम्युनिस्टांनी केलेला वैचारिक संघर्ष नकारात्मकच जास्त आहे. मार्क्सवादी तत्त्वज्ञानात विधायक नकाराच्या (Sublation) नियमाला फार महत्त्व आहे. जुन्यानव्याच्या संघर्षात जुन्याचा नकार वा निरोध निःशेषतेच्या वा निर्वाणाच्या स्वरूपात होत नाही. या द्वंद्वात विजयी झालेले नवे हे विधायक नकारक्रियेचे अपत्य असते, त्यात जुन्यातल्या विधायक गोष्टींचा समन्वय झालेला असतो. मार्क्स म्हणून बजावतो की, मानवजातीने आपल्या विकासक्रमात जे जे काही चांगले निर्माण केले त्याचा वारसा कामगारवर्गाने घेतला पाहिजे.

जमिनीच्या फेरवाटपाचा जो प्रश्न आहे त्याबाबत भूदानग्रामदानाचे वैफल्य अनुभवून बरेच सर्वोदयी कार्यकर्ते सत्याग्रहापर्यंत गेलेले आहेत. बिहार आंदोलनाच्या काळात त्यात सामील न होता बाहेरून काँग्रेसविरोधाची व वर्गलढ्याची भूमिका घेणाऱ्या बिहारच्या मार्क्सवादी कम्युनिस्टांनी जेव्हा शेतमजूर व गरीब शेतकऱ्यांची परिषद घेतली तेव्हा तिला जेपींनी समर्थनपर संदेश पाठविला. गांधीजी व जेपी यांच्यात हा मूलभूत फरक आहे. गांधीजींचा जमीनदारविरोधी वर्गलढ्याला विरोध होता. अखिल भारतीय किसानसभेच्या ता ११-४-३६ ला झालेल्या स्थापनेत सहभागी होताना जेपी व लोहिया यांनी गांधीजींच्या या धोरणाला विरोध केला आणि लोहियांनी किसानांच्या वर्गीय संघटनेचा सूत्रपात जमीनदारीअंतासाठीच झाल्याचे बजावले.

जमिनीच्या फेरवाटपाचा लढा हा अपूर्ण क्रांती पूर्ण करायचा लढा आहे. जमीनदारी नष्ट होऊन कोट्यवधी ग्रामीण गरीब, आदिवासी व हरिजन, भूमियुक्त व अस्मितायुक्त झाल्याशिवाय त्यांचे राहणीमान उंचावणार नाही व हीनभाव जाणार नाही. त्यांची क्रयशक्ती वाढल्याशिवाय औद्योगिक विकासाला आवश्यक अशी स्वदेशी बाजारपेठ तयार होणार नाही. काँग्रेसने हे न करता भांडवली विकासाचा मार्ग अनुसरला, म्हणून तज्जन्य आर्थिक व राजकीय अरिष्टात ती सत्ताभ्रष्ट झाली. म्हणून लोकशाहीचे पुनरुत्थान लोकशाही क्रांतीत परिणत झाले पाहिजे. भूक्रांतीचे विमोचक आंदोलन खेडोपाडी उभारण्यासाठी जनतापक्षातील व बाहेरील डाव्या व लोकशाहीवादी शक्तींनी नवी एकजूट उभारली पाहिजे. अशा एकजुटीच्या संघर्षात सच्चे सर्वोदयी लोकसेवक सहभागी होतील, जेपींच्या आशीर्वादाने.

**म्हणून जेपींच्या तात्त्विक व राजकीय मर्यादा जमेला धरूनही ते लोकशाही क्रांतीच्या संदर्भात क्रांतिकारक राहतील !** □

पुस्तके

# मानसी

## वसंत बापटांची तरल प्रेमकविता

अनुभव नेहमीच नवे नसतात. त्याची सामान्यता अपरिहार्य असते प्रीती हाही एक सनातन अनुभव आहे, पण तरी त्याच्या उद्गारावाचून त्याला पूर्णता नाही. मात्र जुन्या अनुभवाला नव्याने अर्थपूर्ण करण्याची व्यक्तिमत्त्वाची श्रीमंती आणि तरल सौदर्य-ग्राही वृत्ती हवी असते जिवत अनुभवाला सर्वांगांनी छद देऊन एकेका पैलूसकट ह्या प्रेमानुभवाचं परिपूर्ण रूप न्याहाळण्याची क्षमता हवी असते. प्रेम हे जीवनाच मूल्य मानण्याइतकी त्याला सर्वस्वान भिडण्याची तयारी हवी असते.

वसंत बापटाची 'मानसी' म्हणजे तिच्यामागच्या व्यक्तित्वाच्या श्रीमतीचं, तरल, सौदर्यग्राही वृत्तीचं आणि अनुभवाचं सर्वांगी रूप न्याहाळण्याच्या क्षमतेचं एक लोभस दर्शन आहे. कल्पना–अलकाराचं फारस अवडबर न माजविता वेदनेची आणि प्रेमाची आत्यतिक उत्कटता व्यक्त करणारी 'मानसी' ही एक मालिकाकविता आहे. बापटाच नातं अतूटपणे त्याच्या ज्वलत, उदात्त आणि वादळी कविताशी जितकं जाणवतं तितकंच, किंबहुना त्याहीपेक्षा अधिक ते त्याच्या 'मानसी'तील प्रेम-कवितेशी जाणवत

स्वतः बापटानीच सागितल्याप्रमाणे सविधानक नसलेली पण आपल्या परीने स्वतत्र असलेल्या छत्तीस कवितानी सफळ सपूर्ण केलेली ही एक मालिकाकविता आहे. ह्या सर्व कविताच स्फुरण अविछिन्न आणि एकबीज आहे हे तर 'मानसी' अनुभविताना क्षणोक्षणी जाणवतं.

अगदी बालपणापासून बरोबर खेळलेली, तारुण्याचे सारे दिमाख कवीवर उधळणारी, त्याच्यावर जीव लावणारी एक पोर! तिच्याशी कवी विवाह करू शकत नाही मात्र ती पुन्हा एकदा त्याला भेटते. त्या भेटीचे अर्थ समाजनीतीच आधळं मन फार वेगळं लावतं अन् सारे दोष स्वतःच्या माथी घेत तो तिच्यासाठी तिच्यापासून दूर होतो–असं हे अगदी म्हणजे फारच ढोबळ कथानक

खर तर ही 'मानसी' कवीच्या मनात खोलवर रुजली आहे, फुलली–फळली आहे. त्याचं संपूर्ण अंतर्विश्व भरून ती पसरली आहे आपल्या मनात कशी ती आणि तीच भरून राहिली आहे हे जाणवतं तेव्हा मग आपल्या सगळ्या कविताही तिच्याच आहेत हेही त्याला कळून चुकतं.

> 'अस्तित्वच जर तू भारलेले
> तर काय नवल
> सगळेच शब्द तू गर्भारलेले.'

असा उलगडा होतो म्हणून तर ह्या कविता म्हणजे तिच्या कानात गुणगुणण्यासाठीची गाणी आहेत, केवळ तिलाच उमगणाऱ्या ह्या हाका आहेत, वैराणात विरणारे टाहो आहेत अन् बहुधा ह्या शेवटच्या कैफियतीही आहेत.

स्वतःच्या आयुष्यातले सारे सुदर आणि विखारी क्षण, जे त्याच्या सवेदनाच्या धूळ-पाटीवर कायमचे रेखले गेले ते सारे इथे त्याच्या प्रत्येक लखलखत्या पैलूसह साकार होतात. अर्थात ते क्षण जितके त्याचे, तितकेच तिचेही खर तर तिचेच; कारण त्याच्या सगळ्या सवेदना, जाणिवा आणि त्याच्या आयुष्याचे रूपबंधही तिच्यात मिसळून गेले आहेत म्हणून तर त्याने जगलेला प्रत्येक क्षण तिचा आहे.

ह्या क्षणाक्षणाच्या गुफणीतून ही 'मानसी' किती विलक्षण रूपात कवीनं सगुण साकार केली आहे! कधी ती आधळ्या कोशि-बिरीचा खेळ खेळताना मोकळ्या अगणातून त्याला साद घालीत येते तर कधी पेरूवर चिमण्या दातांच्या खुणा उठवून जाते. कधी अस्तित्वाच्या झिरझिरीत ओढणीमागची मूर्तिमंत अमूर्तता होऊन येते तर कधी जिना उतरताना पैजण वाजवेत तशी इथून तिथे हसत जाते.

कधी माहेर भेटावे तशी पावसात हरख-णारी 'मानसी' तर कधी गुलामाच्या अद-बीन त्याला बोट धरायला लावून नतर टाळी वाजवून सागणारी– 'न धरलेल्या बोटावर तुझ नाव होतं!'

कवीला तिचे अधिकार, तिचं सामर्थ्य, तिचे मनोभाव ह्याची नेमकी कल्पना आहे. दशोपनिषदाच्या दशा लावलेलं चक्री पागोटं घालून, गीतेच गध लावून, काव्यशास्त्राचा कमडलू हाती घेतलेल्या त्याला फक्त तीच विचारू शकते, 'सिनेमातल्या गाण्याच्या भेंड्या लावू या का?' म्हणून.

कधी ती येते उबराच्या फुलासारखी अचानक दारात कधी 'क्षमा कर' म्हणते अन् त्याचा शब्द वेळेवर फुटला नाही की 'आगभर कोसळते वीज होऊन' कधी त्याला समजावत शिकवते 'विसरायलाही शिकले पाहिजे मोठेपणाचे एक लक्षण विसरणे. दुसरे अनुसरणे'

हिवाळ्याच्या दीर्घ रात्री...' आणि वर्मी घायाळ झालेल्या फुलचिमणीसारखी ..' ह्या दोन्ही कविता किंवा 'ज्या गावाला जायचच नव्हत...' आणि 'वणवा लागला तेव्हा...' ह्या कवितामधली भावनेची कातरता, रच-नेची नाट्यमयता आणि वातावरणाची भावाशयाशी झालेली विलक्षण साधेजोड फार वेधक आहे.

शरीरप्रणयाच्या वर्णनातही केवढा सयम आणि किती सूचकता आणता येते ह्याच सुदर प्रात्यक्षिक म्हणजे मानसीतली 'आधीच समुद्राचे वेड ...' ही कविता. 'त्या रात्री समुद्र आणि चादण्याची वादळमिठी पडली. आपले देह असतात किती विसराळू. मना-वरती एकएक खूण. वज्रलेप'– ह्या चारच ओळी इथे फार बोलक्या होतात.

कवितेतल्या ओळी, कवितेची भाषा गद्य-प्राय आहे अशी मतं काही जण ह्या सग्रहा-बाबत व्यक्तही करतात; पण ज्यातून रस-प्रतीती होते, ज्या रचनेला भावाशयाच पाठबळ असतं, ज्या रचनेतून अनुभवाची लय सापडते अन् ज्या रचनाबधातून अस्सल अनुभवाकृतीचा रसरशता प्रत्यय येतो ती रचना काव्यात्म अन् अस जिथं घडत नाही ती गद्यप्राय, हे जर खर असेल तर मानसीची भाषा गद्यप्राय नाहीच नाही. आधुनिक कवितेच लक्षण यमकानुप्रासादि अलकारानी युक्त असणं हे नव्हे; छदोबद्ध असण हे नव्हे तर ज्या भावानुभवाला ती व्यक्त करू पहाते त्या अनुभवाची भाषा बोलण हे आहे. ज्या अनुभवाला ती भिडू पहाते त्याचा जिवतपणा सर्वांगी लेवून येणारी कविताच अस्सल ठरते. अस जर आहे तर 'मानसी'ची भाषा ही तिच्या भावानुभवाची भाषा आहे.

ती त्या अनुभवातूनच सिद्ध झाली आहे. तिनं स्वतःच आपली प्रतिमान शोधली आहेत. आपला साज निवडला आहे.

'पहिल्यावहिल्या चादण्यान चकवा दिला
आणि आता अवेळ झड शिळधार–'

किंवा

'रानभरी झालेल्या टिटवीचा आकात
आकाशाचे टवके काढतो.
काळ्या सरोवरात बुडी घेताना
राजहंसी जराही कळकळत नाही.'

अशा कितीतरी झपाटणाऱ्या प्रतिमानांतून अनुभव विलक्षण टोकदार बनत जातो. म्हणूनच ह्या अनुभवसिद्ध भाषेला कृत्रिमतेचा स्पर्शही नाही. 'सत्य आपले आणि दुबळे असते, न्याय त्याचा आणि समर्थ असतो.' ह्या जीवनसत्याचा नकळत वेध घेणाऱ्या ओळी, किंवा 'एका राजकन्येने भाळावरचा डाग जन्मभर मिरवला– सौभाग्यतिलका-सारखा' अशा ओळीओळीतून त्यातल्या अर्थ-सघनतेची अनंत वलय जेव्हा डोळ्यापुढे विस्तारत जातात तेव्हा ह्या भाषेच्या प्रत्यय-कारितेची ताकद केवढी मोठी आहे हे जाणवून जात.

ह्या 'मानसी'च्या आणि तिच्यात गुंतलेल्या त्याच्या भावबंधाचे लावण्यही इतके वेधक आहे की मानसीचे शारीररूप पार विसरले जाते. लक्षात राहते ती तिच्या मनाची कमालीची देखणी घडण. तिच्या ह्या मानसरूपाला कविमनाचा आरसा आहे. ती ह्या आरशातूनच दिसते; पण तिच्या प्रति-बिंबाचे हे दर्शन मात्र सजीव, रसरसते आहे.

ही किमया कवीच्या सयत भावनाची आहे, त्याच्या मोजक्या पण गभीर शब्दाची आहे, त्याच्या रेखीव, सुबक रचनेची आहे आणि त्याच्या तरल मनोवृत्तीची आहे. ह्या कवितांची रचना आवेगी नाही. इथे धुंद करणारे बेहोष शब्दविश्व नाही. कवितेला शारीरप्रणयाचा उन्मादक स्पर्श नाही, की प्रेमात स्वतःला बेभानपणे झोकून देऊन ती अल्पकालीन धुंदी उतरल्यावर आलेली विकलताही नाही आणि तरीही ही कविता कमालीची मर्मस्पर्शी आहे.

अगदी सरळ साध्या पण प्रवाही अशा शब्दबंधातून एक सुजाण अनुभवबंध इथे अगदी पारदर्शी होऊन उभा राहतो. डोहा-सारखा शांत, खोलखोल पण तरीही तळा-पर्यंत निर्मळ असा हा अनुभवबंध जेव्हा भावनांची सारी ओळख घेऊन येतो तेव्हा रसरशीत, अभिरुचिसपन्न असे एक अतर्जीवन त्यातून प्रत्ययाला येत. ह्या प्रत्ययानच 'मानसी'ला फार उचावर नेल आहे.

–अरुणा ढेरे

# आमचे ग्रंथालय

## Good People, Bad People-

By Khushwant Singh
( Edited by Rahul Singh,
Orient Paperbacks,
Pages 191, Rs 6/- )

भारतात जी इंग्रजी पुस्तके छापतात त्यांच्या छपाईची गुणवत्ता फारशी नसते. अगदी अलीकडे कमला दासचे 'माय स्टोरी' व निक्सनवरचे 'फायनल डेज' ही भारतात छापलेली इंग्रजी पुस्तके बरीच गाजली; पण या दोन पुस्तकाचा टाइप इतका बारीक आहे की ती वाचणे म्हणजे एक प्रकारची शिक्षाच होऊन बसते.

एकदा श्री. ह. मो. मराठे आमच्या वाचनालयात आले असता त्यानी ही दोन पुस्तके पाहिली. ते म्हणाले की या पुस्तकासोबत प्रकाशकानी भिंगे पुरविली असती तर बरे झाले असते! कमला दासचे My Story स्टर्लिंग पब्लिशर्स यानी छापले आहे तर निक्सनवरचे Final Days इंडिया बुक हाउसने छापले आहे.

इतर पुस्तकाच्या मानाने खुशवंतसिंगाने हे पुस्तक चागले छापले आहे जॅकेट छपाई-पण छान आहे. मुख्य म्हणजे टाइप थोडा मोठा व दोन ओळीमधील अंतर पण सुट-सुटीत आहे. काही पानावर (उदाहरणार्थ पान न. ११ व ४३) मात्र सबध छपाईच तिरकी आली आहे. पुस्तकाच्या सबध पाना-वर जर अशी छपाई तिरकी व खालीवर झाली व डावीकडचा मार्जिन जर कमी असला तर पुस्तक बाइंड करण फार अवघड जाते. विशेषत. आयर्विंग वॅलेसच्या 'द प्राइज्' सारखे पेपरबॅक ठोकळे कसे बाइंड करायचे ही एक डोकेदुखीच होऊन बसते.

खुशवंतसिंग इंग्रजी छान लिहितात हे अर्थात सर्वांना माहिती आहे. त्याच्या कार-कीर्दीत वीकलीचा खप पुष्कळच वाढला. इतका खप असूनही आणीबाणीच्या काळात वीकलीची 'उपद्रवक्षमता' सेन्सॉरना अजिबात वाटली नाही याचे आश्चर्य वाटते! सुंदर राजनचे डेबोनेरमध्ये 'हाऊ द टाइम्स ऑफ इंडिया सोल्ड आऊट' हे आर्टिकल आले आहे. ते मला आमच्याकडील श्री. रानडे वकिलानी वाचावयास सांगितले लेख फारच चागला वाटला

श्री. खुशवंतसिंग याना एका वाचकाने एकदा ब्रेस्टॉमनीएक' म्हटले होते. त्याचे कारण मध्यतरी वीकलीमध्ये बरेच टॉपलेस फोटोग्राफ्स येत असत. अर्थात खुशवंत-सिंगनी वीकलीमध्ये त्याना 'ब्रेस्टॉमनीएक' म्हणणारे पत्र छापले! श्री. खुशवंतसिंगा-जवळ सहिष्णुता फार आहे. एकदा वीक-लीच्या एका वाचकाने श्री. खुशवंतसिंगाना फार मजेदार पत्र लिहिले होते. बरेच दिवस गेले तरी ते पत्र माझ्या स्मरणात राहून गेले आहे. ते पत्र असे होते, 'अलीकडे वीकली वाचवत नाही इतका ट्रॅश झाला आहे. असाच एक वीकलीचा अक मी वाचता वाचता कटाळून वेस्ट बास्केटमध्ये भिरकावला. आणि काय आश्चर्य! वीकलीची कपनी सहन होत नाही म्हणून इतर कचरा वेस्ट बास्केटमधून उठून पळून गेला!' अर्थात खुशवंतसिंगने हेही पत्र छापले! हो त्याच्या परिपक्वतेचो ग्वाही का त्याच्या सरदारजि-त्वाची ग्वाही हे मला अजून कळले नाही!

ते काहीही असो, पण श्री. खुशवंतसिंग जेव्हा नामांकित व्यक्तीबद्दल लिहितात त्या वेळेला त्याची भाषा फार संवेदनशील असते. श्री. खुशवंतसिंग हे एक उत्तम पत्रकार आहेत याबद्दल वाद नाही. या क्षेत्रात त्याचा अनुभवही दाडगा आहे. खुशवंतसिंगाचा फोटो पाहिला की, ते एक मोटार स्पेअर पार्ट विकणारे सरदारजी आहेत असे वाटते. प्रत्येक सरदारजीचा ६५ ते ७० टक्के चेहरा दाढीमिश्यानी व फेट्याने झाकलेला असतो त्यामळे त्याच्या चेहऱ्यावरचे भावच दिसत

नाहीत. आता या कारणामुळे खुशवंतसिगांचा चेहरा संवेदनाक्षम दिसत नाही की काय ते ठरविणे अवघड आहे सदर पुस्तकात निराद चौधरी, दत्ता बाळ, मोरारजी देसाई, सजय गांधी, रुना लैला, आंद्रे मालरो, रामन राघवन, सत्यजित रे, डॅनियल वॉलकॉट, बाळासाहेब ठाकरे व इतर कैक व्यक्तींची शब्दचित्रे आहेत. या पुस्तकातले चार लेख मात्र खुशवंतसिंगाचे चिरंजीव राहूल सिंग याचे आहेत.

खुशवंतसिंग ताजमहाल हॉटेलमध्ये जेवढ्या आटोपशीरपणे मुलाखती घेतात तेवढ्याच आटोपशीरपणे रामन राघवन-सारख्या लोकांच्या मुलाखती घेतात.

भुट्टोची मुलाखत खुशवंतसिंगानी अर्धा तास घेतली. ते म्हणतात भुट्टोचे व्यक्तिमत्त्व तिहेरी आहे. एक तर तो साधा जमीनदार आहे. दुसरे म्हणजे तो Oxonian (इथे खुशवंतसिंगानी Oxford शब्द वापरला असता तरी चालण्यासारखे होते) तिसरे म्हणजे तो अगदी पॉलिश्ड राज्यकर्ता आहे. (आता 'होता' असे म्हणायचे का?) असे खुशवंतसिंग म्हणतात त्या तिहेरी भूमिकेत त्यांच्या इच्छेप्रमाणे बटन दाबून त्या त्या पात्रात भुट्टो अगदी सहजतेने वावरतात! ऑक्सफर्ड स्कॉलरच्या बाबतीत बोलायचे झाले तर जेव्हा खुशवंतसिंग भुट्टोच्या खोलीत प्रवेश करतात तेव्हा 'कौमार्यभग न झालेले' ( in the state of virgin preservation ) एनसायक्लोपिडिआ ब्रिटानिकाचे ग्रंथ खुशवंतसिंगाचे स्वागत करतात!

उपमा देण्याबाबत या सरदारजीचा दुसरा कुणी सरदारजी निश्चित हात धरू शकणार नाही! डी. के बारुआंबद्दल सुरुवातीसच तो असे लिहितो, 'He reminds yon of the porcelain figure of Chinese laughing Buddha.' माझ्या सुप्त मनात बारुआंविषयी हीच उपमा बरेच दिवसापासून घोळत होती; पण राजकारणात मला अजिबात रस नसल्याकारणाने ती उपमा मनातच सुप्त राहिली. मुलाखती घेताना खुशवंतसिंग सूक्ष्म अवलोकन करीत असतात व बारुआ गप्पा मारताना शेंगदाणे कसे फस्त करतात व सारखे विषयांतर कसे करतात तेही सांगतात.

सस्ती ब्राटा हा भारतीय लेखक त्याच्या Confessions ofi An Indian Woman Eater या पुस्तकासाठी प्रसिद्ध आहे. खुशवंतसिंगांनी या पुस्तकात त्याची घेतलेली मुलाखत चांगली रंगली आहे. या सस्ती ब्राटाला स्त्रियांबद्दल जबरदस्त आकर्षण आहे. ब्राटाने त्याचे वरील पुस्तक ( अल्फाबेटिक्ली ) ज्या स्त्रियानी त्याच्याबरोबर रतिक्रीडा केल्या त्या अनेक स्त्रियाना अर्पण केले आहे. अर्थात् एका नामांकित भारतीय समीक्षकाने हे पुस्तक अत्यत अश्लील आहे असा शेरा मारला होता खुशवंतसिंग तर असे म्हणतात की या पुस्तकातले काही भाग Portnoy's Complaint या गाजलेल्या ( अश्लील? ) पुस्तकाइतकेच erotic आहेत व त्या कारणामुळे कदाचित् त्यावर बदी येईल

कस्टममधील लोकांचा बंदी घालण्याबाबतचा विषय निघाला आहे त्यावरून एक गमतीदार आठवण येते. हेन्री मिलर या प्रसिद्ध लेखकाने Tropic of Cancer व Tropic of Capricorn ही दोन (अश्लील?) पुस्तके लिहिली आहेत. या दोन्ही पुस्तकांचा भूगोलाशी काही संबंध नाही. कस्टमने दोन्ही पुस्तकांची नावे बंदी असलेल्यात टाकली आहेत. एका पुस्तकविक्रेत्याने या पुस्तकाच्या काही प्रती मागविल्या. कस्टममध्ये जेव्हा त्या प्रती आल्या तेव्हा तेथील लोकानी ही भूगोलविषयक पुस्तके आहेत असा शेरा मारून त्या प्रती 'पास' केल्या!

परवा तर अगदी कहरच झाला कस्टमच्या नियमात अशी नोंद आहे की, कोणतीही वस्तू पोटात टाकण्यासारखी असेल की ती edible ( खाण्यालायक ) होय. तर त्रिवेंद्रम येथून एका मेडिकल कॉलेजने पोटात घालण्याचे एक अत्याधुनिक उपकरण ( gastroscopic endoscope ) मागविले होते. या उपकरणामुळे पोटातील आतील भाग डॉक्टराला दिसू शकतो आता लागलीच कस्टम अधिकाऱ्यानी कोणतीही पोटात जाणारी वस्तू म्हणजे ती edible असा नियम बसविला व त्या उपकरणावर रु. ६०,००० ड्यूटी लावली! Tropic of Cancer या नावावरून आणखी एका पुस्तकाची आठवण येते. ती म्हणजे गुन्नर मर्डल यांच्या प्रख्यात पुस्तकाची त्याचे नाव आहे 'Asian Drama' हे पुस्तक आशियामधील राजकीय, आर्थिक व सामाजिक घडामोडी यात मोडण्यासारखे आहे, पण एका ग्रंथपालाने Asian Drama मधील Drama हा शब्द वाचून लागलीच त्या पुस्तकाचे वर्गीकरण 'नाटक' या सदरात केले!

असो. खुशवंतसिंग म्हणतात हा सस्थी ब्राटा फारच सुंदर इंग्रजी लिहितो ब्राटा हे ३३/३४ वर्षांचे असावेत; पण या वयात त्यानी इंग्लंडमधील समीक्षकांनासुद्धा बरेच खाद्य दिले आहे

–जे. एन्. पोंडा

–फिनिक्स लायब्ररी


**नवीन दाखल झालेली काही पुस्तके.**

१ ए स्पेशल इंडिया– ( स्वातंत्र्यपूर्व राजकीय घडामोडींचे चित्रण ) जेम्स हॅलिडे, अनुवादक– गो वि रानडे — रु. २५/–
२. काळे दिवस– ( आणीबाणीतील घटना )– यशवंत कानिटकर — रु १०/–
३. केशरपुष्प– ( देशी व विदेशी लोककथा )– मालती दांडेकर — रु. १८/–
४ सापशिडी– ( कादंबरी )– राजा राजवाडे — रु. १२/–

**ENGLISH**

1. **Miami Golden Boy**– ( Bestsellers – A fast moving novel of intrigue ) Herbert Kastle — Rs 10.15
2. **Order Of Assassins**– (The psychology of 'motiveless' murder)– Colin Wilson — Rs 10 15
3. **The Boys Form Brazil**– ( Bestseller–A Nazi Scientist has a plan to clone many Hitlers! – Novel) — Rs 18 35
4. **The Chinese Ultimatum**– Bestseller–Political thriller ) – Robin Moore– & Edward Meghee — Rs. 18.35

★ आमची दीर्घ मुदतीची वर्गणी भरल्यास इतर लायब्ऱ्याइतक्याच कमी दरात उत्तमोत्तम पुस्तके वाचावयास मिळतील.

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०

# टेक इट लाइटली

संजीव मंगरूळकर

## □ मोफत करमणूक

नाही म्हटलं तरी जनतापक्षाला सत्तेवर येऊन आता चार-एक महिने तरी झाले. म्हणजे तसा हा पक्षही सत्तेला पुरेसा रुळला असे मानायला हरकत नाही. कारण इतके दिवस जनतापक्षातली बरीच मंडळी विरोधी पक्षीय नेत्यांच्या भूमिकेत वावरायला रुळलेली आणि त्यातून कुठल्याही लोकशाहीत (विशेषत: भारतीय लोकशाहीत) विरोधकाचे एकमेव आणि अंतिम कार्य म्हणजे फक्त भरपूर तोंड वाजविणे आणि ऊठ-सूट सत्तारूढ पक्षावर मनसोक्त तोंडसुख घेणे होय असा प्रवाद रूढ झालेला. त्यामुळे साहजिकच बरीचशी ही विरोधी पक्षीय मंडळी 'पट्टीचे बोलणारे' म्हणून ख्यातनाम बनून राहिली होती आणि हे असे सारखे सारखे बोलून केवळ अयशस्वी जनजागृती करण्यातच या मंडळीचे तमाम आयुष्य खर्ची पडत असतानाच, एका रात्री अचानक अघटित चमत्कार घडावा तसा प्रकार घडून, या विरोधी मंडळीनाही सत्ता मिळून गेली. तेव्हा आता अचानक आलेल्या सत्तेपायी या विरोधी नेत्याचे आणि त्यांच्या पट्टीच्या वक्तृत्वाचे काय होते याची चिंता साहजिकच तमाम उत्सुक मंडळींना लागून राहिली होती आता हे सत्तारूढ विरोधक बोलणे सोडून कामाला लागणार की फक्त बोलतच राहणार असा प्रश्न साहजिकच आमच्यापुढे पडला होता. तशी या मंडळीना वाजवीपेक्षा थोडे अधिक बोलण्याची आणि जबर आत्मविश्वास बाळगण्याची सवय अगदी लहानपणापासून लागली असावी असे दिसते. कारण गेल्या निवडणुकीच्या महिनाभर आधीच माझे मित्र-जनतापक्षाचे उत्साही, धडाडीचे तरुण कार्यकर्ते—मला भेटले होते आणि तेव्हा त्याच्या अंदाजानुसार जनतापक्षाला लोकसभेच्या सर्वच जागा मिळतील किंवा फार तर एखाद-दुसरी जागा कॉंग्रेस जिंकील असे दिसत होते. योगायोगाने त्यांचा हा धाडसी युक्तिवाद आणि आत्मविश्वास थोडाफार खरा ठरावा असे वाटण्यासारखा निवडणुकाचा निकाल लागला असला तरी दुर्दैवाची गोष्ट फक्त अशी की, आमच्या या धाडसी मित्राचा हा अदाज केवळ पुण्यातील सदाशिव, नारायण-पेठेच्या परिस्थितीच्या अवलोकनावर आणि 'तरुण भारत'च्या वाचनावर आधारलेला होता, तर अशी जबरदस्त बोलण्याची सवय अगदी तळाच्या कार्यकर्त्यांपासून सर्वांना लागलेली. ती अशी एकदमच नाहीशी होणे म्हणजे काही सोपी गोष्ट नव्हे. अधूनमधून ही सवय डोके वर काढणार हे साहजिकच आहे. अगदी वरच्या पातळीपर्यंत जनतापक्षात असे पट्टीचे वक्ते अजूनही आहेतच.

या वक्तृत्वपटूमध्ये सध्या आघाडीवर दिसतात ते आपले आरोग्यमंत्री राजनारायण. तसा प्रारंभापासून त्याचा विनोदाकडे थोडा जास्तच कल असावा; पण या लोकसभा-निवडणुकीत त्यानी सरळ इंदिराजीचाच पराजय करून आपल्या विनोदास लोकमान्यता मिळवून दिली आणि ते चक्क आरोग्यमंत्रीसुद्धा झाले आता मंत्री झाल्यामुळे त्याच्या विनोदात खंड पडतो की काय अशी शंका आम्हाला वाटत होती; पण त्यानी आपले कार्यक्षेत्र उलट या निमित्ताने विस्तारलेले दिसले. 'कुटुंबनियोजन' खात्याला 'कुटुंबकल्याण' खाते असे वेगळे नाव देऊन त्यानी या खात्यात आमूलाग्र बदलच घडवून आणला त्यानतर ॲलोपाथी, होमिओपाथी, आयुर्वेद, युनानी अशासारख्या सर्व वैद्यकशास्त्रामध्ये पारंगत असणाऱ्या डॉक्टरांची निर्मिती करण्याची एक योजना माडली. वैद्यकीय विद्यार्थ्यांना सक्तीची तीन वर्षांची 'इंटर्नशिप' देऊन त्याचा अनुभव वाढविण्याचे ठरविले. अशा धाडसी कल्पना पुढे रेटीत असताना, इकडे लोकसभेतही त्याचे फुटकळ विनोद चालूच होते. 'सभागृहात आपण हिंदीतूनच बोलणार, इंग्लिशमधून नाही' हा आपला निर्धार व्यक्त करताना, केलेल्या एका विधानामुळे लोकसभेत प्रचंड वादळ उठले, हे विधान नेमके काय होते याचा खुलासा कुठेच आला नसल्याने यावर फारसे लिहिणे शक्य नाही. तरीही त्यांच्या या विधानाबद्दल पंतप्रधान मोरारजीभाईंनी स्वत: माफी मागितली त्या अर्थी हे विधान बरेच विनोदी आणि आक्रमक असले पाहिजे असे दिसते मध्यतरी महाराष्ट्रात वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या जागा वाढविण्यावरून लोकसभेत झालेल्या चर्चेतही त्यानी असेच एक धाडसी वक्तव्य करून मेडिकल कौन्सिलच्या मंडळीना दुखावल्याचे ऐकून आहोत. किंबहुना त्याच्या या विधानामुळेच वैद्यकीय विद्यार्थ्यांचा प्रश्न फार चिघळला असेही काही मंडळीचे मत आहे. तर अशा रीतीने राजनारायण आणि त्याचे मत्रिपद ही दोन्ही प्रकरणे जनतापक्षाला थोडी जड जाणार आणि त्यामुळेच राजनारायणांची मत्रिपदावरून उचलबांगडी होणार असे राजकीय भविष्य काही निरीक्षक आताशा उघडपणे सांगू लागले आहेत.

असेच एक दुसरे वक्ते सुब्रह्मण्यस्वामी. आणीबाणीत भूमिगत राहून, परदेशात त्यानी केलेल्या विलक्षण कार्यामुळे स्वामीजी लोकाच्या नजरेसमोर आले आणि मुबईकरानी मोठ्या हौसेने त्याना खासदार केले निवडणुकीपूर्वीपासूनच त्याचा आत्मविश्वास मोठा जबर होता. आर्थिक क्षेत्रात त्यानी माडलेल्या योजना आणि भविष्यातील त्याची कार्यपद्धती ऐकून तर आम्ही त्याना मनोमन भारताचे अर्थमत्रिपद बहालच करून टाकले होते; पण तसे काही झाले नाही आणि आपला राजकीय अंदाज चुकल्याचे दु:ख आमच्या कित्येक मित्राना सोसावे लागले; पण असे झाले तरी, स्वामीजींच्या वक्तृत्वात फारसा फरक पडला नाही. काश्मीर निवडणुकीच्या काही थोडेच दिवस आधी ३०७ व्या कलमाबाबत आणि त्यानुसार काश्मीरला मिळणाऱ्या स्वायत्ततेबाबत आपला तीव्र व्यक्तिगत विरोध त्यानी जाहीरपणे नोंद-

विला आणि त्यामुळे पुन्हा एकदा स्वामीजींचे नाव सर्वांच्या तोंडी झाले शेख अब्दुल्लाजींनी त्याच्या या विधानाचे भांडवल करून काश्मीरच्या निवडणुकांचे स्वरूपच मुळी ' ३०७व्या कलमासाठी लढा ' असे करून टाकले. त्यामुळे साहजिकच वरिष्ठ जनतानेत्यांचे धावे दणाणले. स्वामीजींचे हे विधान म्हणजे त्यांचे व्यक्तिगत मत असून, जनतापक्षाशी त्याचा काही संबंध नाही, असा खुलासा जनताश्रेष्ठींना वारंवार करावा लागला. तरीही शेवटपर्यंत काश्मीरच्या अडाणी जनतेवर या खुलाशाचा काही फारसा प्रभाव पडला नाही आणि अखेर शेख अब्दुल्ला या भांडवलावर निवडूनही येते झाले. खरे तर अशा स्पष्टवक्तेपणाबद्दल, धडाडीबद्दल आणि प्रचलित विचारप्रवाहाहून एक वेगळा प्रवाह लोकमताची तमा न बाळगता मांडल्याबद्दल सुब्रह्मण्यमस्वामींचे कौतुक होणे अगत्याचे आहे. अगदी ऐन निवडणुकांच्या वेळीही मतदारांना अप्रिय असे मत व्यक्त करून आत्मनाश करण्याचे धैर्य फार थोड्यांच्या अंगी असते; पण असा अकारण आत्मनाश राजकारणात पचविणे बऱ्याच मंडळींना जड जाते. जनताप्रेमी मंडळी त्यामुळे स्वामीजींवर उगीचच नाराज आहेत. खरं तर कुठल्याच नेत्याचे बोलणे इतके मनाला लावून घेण्याइतकी आणि ते खरेच आहे असे मानण्याइतकी दुधखुळी आपली भारतीय जनता असेल असे वाटत नाही; पण स्वामीजींच्या वक्तृत्वावरही त्यामुळे आताशा बऱ्याच मंडळींचा डोळा आहे.

परवाचीच गोष्ट चौधरी चरणसिंगांची. तसे पाहू जाता, स्वत: चरणसिंग हे अतिशय कर्तबगार आणि ध्येयवादी नेते आहेत याबद्दल कुणाच्याच मनात संदेह नाही. किंबहुना गृहमंत्री म्हणून ते सत्तेवर आल्यापासून, प्रत्येक भारतीयाच्या तोंडावर दररोज त्यांचे नाव येत आहे. निवडून आल्याबरोबर त्यांनी जगजीवनरामांविषयी व्यक्त केलेला विरोध, उत्तरेतील राज्यांच्या विधानसभा–निवडणुका घेण्यात त्यांनी दाखविलेली तत्परता, त्या निमित्ताने लोकशाही कॉंग्रेसचे जनतापक्षात झालेले अकल्पित विलिनीकरण, आणीबाणीतील अत्याचाराबाबत चौकशी करण्यासाठी त्यांनी नेमलेली कमिशने यासारख्या घटनांतूनच त्यांची करारी प्रतिमा उजळून दिसते; पण परवाच आणीबाणीच्या संदर्भात बोलताना त्यांनी लोकसभेत एक धाडसी विधान केले. आणीबाणीत देशातील विरोधकांना ठार मारण्याचा सरकारचा विचार होता असे मत त्यांनी लोकसभेत व्यक्त केले आणि यावर सभागृहात कॉंग्रेसनेत्यांनी अर्थातच खूप गोंधळ घालून पुराव्याची मागणी केली पुरावा देण्यास चरणसिंगांनी मात्र नकार दिला. अखेरीस पंतप्रधान मोरारजी देसाईंना मध्यस्थी करावी लागून त्यांनी निरेन डे यांचेच मत सभागृहाला ऐकवून चरणसिंगांची बाजू थोडीफार उचलून धरली. यात भर म्हणून दुसऱ्या दिवशी माजी पंतप्रधान श्रीमती गांधी यांनी हे विधान हास्यास्पद असल्याचा दावा केला आणि अशा रीतीने उलटसुलट हक्कभंगाचे आरोप होऊन हे प्रकरण अजूनही लोकसभेत गाजतच आहे हे विधान करताना चरणसिंग बरेच भावविवश झाले होते आणि भावनेच्या पोटी त्यांनी असे विधान केले असे काही मंडळी म्हणतात; पण अशी भावनाविवशता ही नाकर्त्यांच्या नशिबी असते चरणसिंगासारख्या कर्तबगार गृहमंत्र्याच्याबाबतीत ती योग्य वाटत नाही. त्यातून आणीबाणीच्या अत्याचाराची चौकशी करण्यासाठी स्वतंत्र कमिशन नेमले असतानाही त्याचा निर्णय येण्याच्या आतच असे भावनाविवश होणे थोडे आगतुक वाटते. सरकारदरबारी असे आरोप पुराव्यासह करावे लागतात. बाकी लोकांच्या मनोरंजनासाठी आणीबाणीतल्या अत्याचाराचे चविष्ट आणि रसभरित वर्णन करणारी इतर अनेक पुस्तके आज बाजारात अल्प किंमतीत उपलब्ध आहेतच. सरकारने हा मक्ता घेण्याची तितकीशी जरुरी नाही.

तर अशा रीतीने जनतापक्षीय नेत्यांचे वक्तृत्व हा अजूनही एक गाजणारा भाग आहे. सत्ता हाती येताच स्वत: मोरारजीभाई; मधू दंडवते, मोहन धारिया यासारखे काही नेते जबाबदारीच्या जाणिवेने अबोल झाले असले तरी बाकी सर्व मंडळींना मात्र आता बोलायला अगदी मोकळे रान मिळाले आहे. पक्षाच्या ध्येयधोरणाशी आणि हितसंबंधाशी विरोधी असणारी विधाने अगदी बिनबोभाटपणे जाहीर करणे हे जनतापक्षाच्या लोकशाही निष्ठेचे प्रमुख निदर्शक आहे असा बऱ्याच मंडळींचा ग्रह झालेला दिसतो आणि म्हणूनच तर जुन्या संघटनाकॉंग्रेसचे कार्यकर्ते जनसंघाच्या नावाने उघड बोटे मोडतात. कुणी स. का. पाटील, पी सी सेनसारख्यांशी चर्चा करून संघटनाकॉंग्रेसचे पुनरुज्जीवन करण्याचा बेत आखतात. राज्याराज्यांच्या मुख्य मंत्र्यांच्या निवडणुकांतही असेच वादविवाद सार्वजनिक व्यासपीठावर चालतात कुणा नंदिनी सत्पथींच्या उमेदवारीला स्वत पंतप्रधान पाठिंबा देतात तर कुणी बिजू पटनाईक मात्र त्यांना उघड विरोध करतात. जनतापक्षीयांच्या अंतर्गत लढाया अशा रीतीने अगदी जाहीरपणे तुमच्याआमच्या मनोरंजनासाठी मोफत आणि उघड्यावर खेळल्या जातात.

आणि अशा या वक्तृत्वपटूंच्या लहरी सांभाळतच जनतापक्षाला लोकशाहीची खरी वाट आक्रमायची आहे जनतापक्षासमोरची ही जबाबदारी मात्र विलक्षण आणि अभूतपूर्व आहे ! ☐

---

## कर्नाटक

पृष्ठ ८ वरून

जाचणारा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न भाववाढीचा आहे. तो आटोक्यात आणण्यास जनतासरकारला अजून यश आलेले नाही. आम्ही काही उपाय योजले असून त्यांचे परिणाम दिसण्यास काही महिने जावे लागतील असे पंतप्रधान मोरारजीभाई देसाईंनी नुकतेच सांगितले. जनतासरकारच्या दृष्टीने हा कसोटीचा प्रश्न आहे. त्यात त्याला यश आले तर सध्या कॉंग्रेसचे बालेकिल्ले असलेल्या कर्नाटक व इतर राज्यांतही कॉंग्रेसकडून जनतापक्षाकडे पक्षांतराची लाट सुरू होईल. कॉंग्रेसमधील गटबाजी आणि अंतर्गत झगडे थांबले नाहीत तर ही लाट कॉंग्रेसनेते थोपवू शकणार नाहीत. उलट तिचा जोर वाढतच जाईल.

लोकसभा व विधानसभा–निवडणुकांत जनतापक्षाने उत्तर–दिग्विजय मिळविला. दक्षिण–दिग्विजय मिळविणे तितके सोपे नसले तरी भाववाढ आटोक्यात ठेवण्यास यश आल्यास ते अवघड नाही. येते काही महिने त्या दृष्टीने कसोटीचे आहेत.

☐

## नक्षलवादाच्या शोधात : पृष्ठ ५ वरून

श्रीवास्तवचं रोखठोक उत्तर. 'आमच्या प्रातात शोषणच इतकं आहे, की जमीनदाराच्या जुलमाला विटलेले लोक नक्षलवाद्यांना आनदान मदत करतात. हरिजन–गिरिजनाचा असा फुल सपोर्ट नसता तर सरकारन चळवळ कधीच गुडाळली असती ना साहेब! शिवाय नक्षलवादी सरकारच्या किंवा पोलिसाच्या विरुद्ध नाहीतच; पण सरकारचे पोलिस जमीनदाराच्या संरक्षणाला धावून जात असल्यामुळे नक्षलवाद्यांना पोलिसांवरही गोळी चालवावी लागते; पण एक खरं की नक्षलवाद्यानी सुद्धा रक्तपात काही कमी केला नाही.' शामकरण श्रीवास्तवच्या पधरा–वीस मिनिटाच्या वक्तृत्वातलं सार हे एवढच. त्याच हे मत अर्थातच हैदराबादेत बसूनच बनविलेल आहे; पण बऱ्यापैकी balanced वाटल. गडी सध्याच्या नेतृत्वावर मात्र जाम खवळलेला दिसत होता.

श्रीवास्तव आम्हाला ए. पी. सी. सी. चेअरमन श्री. टी मुसलैय्या याच्याकडे घेऊन गेला; पण या महाशयांना 'या–बसा' पलीकडे फारस इग्रजी येत नव्हत अर्थात आम्हाला तेवढही तेलगू येत नव्हत तेव्हा शास्त्रीजी नावाच्या त्याच्या सेक्रेटरीला धावाधाव करून बोलाविण्यात आल. हा मुसलैय्याचा ब्रेन ट्रस्ट. शास्त्रीजी बोले आणि मुसलैय्याची मान हाले असा एकूण प्रकार एवढचा लाबून महाराष्ट्रातून येऊन आम्ही नक्षलवादासारख्या फालतू गोष्टीच्या चौकशा करतो आहोत, त्याचा शास्त्रीसाहेबाना परम खेद होत होता आणि 'व्हाई डु यू अॅट्रॅच सो मच इपॉर्टन्स टू नक्षलाइट प्रॉब्लेम?' अशी आश्चर्य'व तुच्छतापूर्ण विचारणा ते वारंवार करीत होते. त्याच्या म्हणण्याप्रमाणे, 'नक्षलवादी चळवळ किंवा नक्षलवाद अस काही आता शिल्लकच उरलेल नाही. उगीच इकडेतिकडे एखादी किरकोळ मारामारी होते तेवढीच; बाकी सर्वत्र आबादीआबाद आहे आध्रप्रदेशातल्या गरीबगुरिबाच भल व्हाव म्हणून पचवीस कलमी कार्यक्रमाची अमलबजावणी (अजूनही!) जोमान सुरू आहे. तेव्हा काळजी करण्यासारखं नक्षलवादात आता काहीच शिल्लक उरलेलं नाही,' अस शास्त्रीजी जीव तोडून सागत होते, तरीही आमचा विश्वास बसेना. आता अगदीच आम्ही पिच्छा सोडीत नाही अस पाहिल्यावर शास्त्रीजीनी आम्हाला आणखी एक खो देऊन टाकला आणि श्री. पी. रामचद्र रेड्डी, जनरल सेक्रेटरी, ए. पी. सी. सी. याच्याकडे आमची रवानगी केली.

शास्त्रीजी हे धोतर–झब्ब्यातले, पुरे पिकलेले साठीचे म्हातारबुवा. पी. रामचद्र रेड्डी त्यामानान उमदे, पचेचाळिशीचे. सौम्य पण तल्लख चेहरा, केस कपाळ वाढवून मागे हटलेले. गृहस्थ बऱ्यापैकी धूर्त असावा असे एक सुरुवातीलाच वाटले. मुलाखत सपवून निघताना आणखी एक लक्षात आले की, शास्त्री हे टी. मुसलैय्याचे तसे पी. रामचद्र रेड्डी हे सगळ्या एपीसीसीचेच ब्रेन ट्रस्ट असायला हरकत नाही! रेड्डीसाहेबानी नक्षलवादी चळवळ अगदीच सोपी, सरळ करून टाकली. 'हे सगळे माथेफिरू आणि रक्तपिपासू लोकाचे दहशतवादी उद्योग आहेत!' असे त्याचे म्हणणे. 'डाकूपेक्षाही हे लोक वाईट! डाकूचे पैशाअडक्यावरच भागते; पण हे प्राणही हमखास घेतात! एका नक्षलवाद्याने अलीकडेच एका सरकारी साक्षीदाराचा, त्याला हॉस्पिटलमध्ये आणलेले असतानाच खून पाडला. दुसऱ्या एका मेडिकल स्टुडटने आपल्याच वर्गातल्या चौघाजणाना निष्कारण ठार मारले. असा हा collective madness आहे!' रेड्डी म्हणाले, नक्षलवादी हे मनोविकृतीने पछाडलेले रुग्ण आहेत, हा मुद्दा त्यानी ठासून माडला आणि विनोद म्हणजे पाठोपाठच बरेच नक्षलवादी सुशिक्षित आहेत, कित्येक पदवीधर आहेत आणि हैदराबाद व वरगळच्या गाधी मेडिकल–रीजनल इजिनियरिंग कॉलेजेसचे विद्यार्थी आहेत, त्याच्यामागे त्याना नक्षलवादाची दीक्षा देणारा प्राध्यापक–डाव्या विचारवंताचा एक गट आहे, अशीही माहिती पुरविली. त्यानीच माडलेल्या या दोन पाठोपाठच्या मुद्द्यामध्ये काही विसगती आहे हे त्यांना जाणवून द्यायचा आमचा प्रयत्नही, आपल्या अनुभवीपणाचा हवाला देत त्यानी हाणून पाडला. (त्याच्या या परस्परविसंगत दाव्याची सविस्तर चर्चा, दुसऱ्या लेखाकाच्या सुरुवातीसच केलेली आहे, तेव्हा पुनरावृत्ती टाळण्यासाठी येथे ती न करणेच योग्य होईल!) नक्षलवादी हे मनोरुग्ण आहेत या आपल्या विधानाच्या पुष्ट्यर्थ त्यानी दिलेला आणखी एक आधार म्हणजे या मडळीमधले अतर्गत मतभेद व ते प्रकट केले जाण्याचे मार्ग. आमच्या माहितीनुसार, नक्षलवादी असे सरसकट एकच लेबल आपण सर्वांना लावीत असलो तरी त्याच्यात चौदा वेगवेगळे गट आहेत. अर्थात हे सगळेच गट आध्रमध्ये सक्रीय नाहीत; पण जे तीन–चार प्रमुख गट क्रियाशील आहेत, त्याच्यात परस्परामध्ये भयकर वैर आहे. रेड्डीसाहेबानी सागितले (आणि डी आय. जी. विजय रामा राव यानी त्या माहितीला नतर दुजोराही दिला) की, 'या विविध गटाच्या कार्यकर्त्यांना साभाळणे ही आध्रच्या तुरुगाधिकाऱ्याची एक डोकेदुखीच असते. त्याना कोर्टात जरी चुकून एकत्र आणले गेले तरी तिथेही ते घोषणा–प्रतिघोषणाचे युद्ध खेळूनच थाबत नाहीत, तर एकमेकावर चपला फेकणे, थुकणे, अर्वाच्य शिव्या देणे आणि शक्य तर मारामारीच करणे असेही मनोरजक उद्योग करतात, असा अनुभव आलेला आहे. काही वेळा तर याचे खरे शत्रू जमीनदार किंवा पोलिस नसून ते एकमेक आहेत असा भास होतो. अशा लोकाना माथेफिरू म्हणायचे नाही तर काय म्हणायचे?'

या रेड्डीसाहेबाच एक वैशिष्ट्य म्हणजे पक्ष, सरकार या सर्वांसाठी ते 'आम्ही' हेच एक सर्वनाम वापरून राहिले होते. हे एक ठीक, पण पोलिसाच्या कृतीबद्दल बोलतानाही 'आम्ही त्याना चकमकीतच गोळ्या घातल्या,' अशासारखे उल्लेख; याची गमत वाटली. आपली बाजू कणखरपणे माडण्याचा त्याचा प्रयत्न कौतुकास्पद असला तरी *नक्षलवादाला बदनाम करण्याच्या नादात त्याचा* एरवीचा सावधपणा किंचित सुटला होता. नक्षलवाद्याकडे राजकीय तत्त्वज्ञान वगैरे काही नाही,' असा मुद्दा माडून त्यानी त्याचा पुरावा काय द्यावा, तर या चळवळीचे प्रवर्तक चारु मुजुमदार व कनू सन्याल हे दोघेही सामान्य मजूर–कामगारांपैकीच असून अल्पशिक्षित होते! पदवीशिक्षण ही राजकीय चळवळी करण्यासाठी आवश्यक पात्रता होऊ शकत नाही;

असं सांगून विरोध करण्याचा आमचा प्रयत्न त्यांना मान्य होत नव्हता. राजकारण ही उच्चशिक्षित व उच्चवर्गीय अल्पसंख्यांकाची मिरासदारी करण्याचा प्रयत्न म्हणजे नोकरशाहीकडून सरजामशाही-कडे वाटचाल नव्हे काय ? लोकसभानिवडणुकीच्या काळात प्रचार करताना 'श्रीमती इंदिरा गांधी व चिरंजीव संजय हे अर्धशिक्षित आहेत' असं त्यांच्या अपात्रतेचं एक कारण श्रीमती दुर्गाबाई भागवत यांनी सांगितल्याचं धक्कादायक वृत्त प्रसिद्ध झालं होतं, त्याची आठवण त्या वेळी – रामचंद्र रेड्डींशी बोलताना – आम्हाला झाली.

अर्थात नक्षलवाद ही अडाण्याची ( वा मागे म्हटल्याप्रमाणे मनोविकृतांची ) चळवळ असेल तर आंध्रमधला बुद्धिमंतांचा वर्गही मोठ्या संख्येने तिच्याकडे आकृष्ट का झाला, तिचं समर्थन करणारे साहित्यिक–कलाकार पुढे का आले आणि ( रेड्डींनीच सांगितल्याप्रमाणे ) इंजिनिअर्स–डॉक्टर्स वा विद्यार्थी त्यात का सामील झाले, या आमच्या प्रश्नाची उत्तरे–समर्पक उत्तरे–श्री. पी. रामचंद्र रेड्डी यांच्याकडे नव्हती !

श्री. जे. वेंगल राव, आंध्रप्रदेशचे मुख्य मंत्री, हे इतक्या सहजपणे भेटतील आणि मुलाखत देतील हे आम्हाला थोडसं अनपेक्षित होतं. दुसरी काहीशी अनपेक्षित गोष्ट म्हणजे ते केंद्र–राज्यसंबंधाविषयी काही बोलायला नाराज दिसले आणि नक्षलवाद्याबद्दल मात्र अगदी मोकळेपणाने व पोटतिडकीने बोलले. आम्ही त्यांना भेटलो त्या वेळी आंध्र विधानसभेचं अधिवेशन चालू होतं आणि आंध्र मंत्रिमंडळा-विरुद्धच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी केंद्राने व आयोग नेमावा अशा मागण्यांचे साद–पडसाद राजकीय वातावरणात उमटत होते. नक्षलवाद्यांची चकमकीतून केलेली कत्तल हा या आरोपांपैकी एक होताच. त्यामुळे केंद्र–राज्यसंबंधाचा विषय आम्ही प्रस्तावनेदाखल काढला, पण 'आमचे संबंध सहकार्याचे आहेत व राहतील,' यापलीकडे त्याबद्दल काही बोलायला मुख्य मंत्री राजी नव्हते.

श्री वेंगल राव हे श्री पी व्ही नरसिंह राव यांचे मुख्य मंत्रिपदाचे वारसदार. मुख्य मंत्रिपद त्यांच्याकडे अलीकडेच, म्हणजे १९७५ ला आले असले तरी १९६७ पासून आजतागायत, म्हणजे सलग दहा वर्षे आंध्रप्रदेशचे गृहखाते त्यांनीच सांभाळले आहे. हा तपशील पुरवायचे कारण म्हणजे पोलिसखात्याशी असलेले त्यांचे घनिष्ठ संबंध हे आंध्रच्या राजकारणाचे आणि राज्यकारभाराचे एक वैशिष्ट्य होऊन बसलेले आहे. इंडियन एक्सप्रेसच्या हैदराबाद आवृत्तीच्या एका ज्येष्ठ वार्ताहराने आमच्याजवळ बोलताना वेंगल रावांचा उल्लेख 'पोलिस चीफ मिनिस्टर ऑफ आंध्र' असाच केला. पोलिसखाते आणि वेंगल राव यांचा गेली दहा वर्षे एकमेकांना मिळत असलेला आधार हा चर्चेचा मोठा विषय असल्याचे सामान्य माणसाशी बोलतानाही जाणवल्याशिवाय राहिले नाही याची उदाहरणेही बरीच दिली गेली. सध्या गृहखात्याचे फर्स्ट सेक्रेटरी असलेले श्री. एम् व्ही. नारायण राव हे प्रथेप्रमाणे आय ए एस्. अधिकारी नसून आय् पी. एस्. आहेत आणि ही आंध्रच्याच नव्हे तर भारताच्याच शासकीय क्षेत्रातील एक दुर्मिळ घटना आहे या रावांचे थोरल्या 'रावां'शी बरेच घनिष्ठ संबंध आहेत आणि त्यामुळे होमसेक्रेटरींच्या हातात बरीच सत्ता केंद्रित झालेली आहे अशी बोलवा आहे. याखेरीज

## रामचंद्र उवाच....

रामचंद्र रेड्डींची आम्ही घेतलेली मुलाखत बरीच प्रदीर्घ होती त्यातला विस्ताराने देण्याजोगा भाग दुसऱ्या व चालू लेखांकात दिलेला आहेच त्याशिवाय महत्त्वाचे जे मुद्दे त्यांच्या बोलण्यात आले किंवा तोडून निसटले, तेवढेच त्रोटक स्वरूपात :

⁂ नक्षलवादी कायद्याच्या राज्याच्या प्रस्थापनेत अडथळा ठरले आणि कायद्याचे राज्य प्रस्थापित करण्याची जबाबदारी सरकारवर असल्याने त्यांच्याविरुद्ध कडक इलाज करणे आमच्या सरकारला भाग होते सद्हेतूने केलेल्या सगळ्याच सरकारी कर्तव्यांची पुढे येणारे प्रत्येक सरकार चौकशी करू लागले तर अनर्थच ओढवेल.

⁂ समजा, आमचे सरकार दोषी ठरून सत्ता जनतापक्षाच्या हातात गेली तर नक्षलवाद्यांचा उपद्रव अजिबात थांबणार आहे का ? अहो, उद्या मोरारजीभाईंनासुद्धा ही समस्या भेडसावणार आहेच. लक्षात ठेवा, तेव्हा त्यानाही आमच्याच मार्गाने जावे लागेल

⁂ थोडे थांबा प बंगालमध्ये लवकरच हा प्रॉब्लेम उभा राहणार आहे बंगालमध्ये नक्षलबारीत ही चळवळ सुरू झाली ती तत्कालीन गृहमंत्री ज्योती बसूंच्याच अमदानीत, कांग्रेसच्या नव्हे. त्याच ज्योती बसूंनी आज अटकेतल्या नक्षलवाद्यांना सोडून द्यायचा निश्चय बोलून दाखवलाय.

⁂ हल्ला करून पळून जाणाऱ्या नक्षलवाद्यांना ( पाठलाग करून जिवंत पकडण्याऐवजी. ) गोळ्या घालून मारणं अन्यायाचं नाही. कारण त्यांना खटला भरून शिक्षा देणं अतिशय अवघड जात पुरावा साक्षीदार कसे मिळविणार ? त्यामुळे गुन्हा करूनही ते मोकळे सुटण्याचा धोका असतो.

⁂ भार्गव चौकशी आयोगाच्या निःपक्षपातीपणाबद्दल शंका घेणं योग्य नाही. हे श्री भार्गव कोण, कुठले वगैरे काहीही आम्हाला ठाऊक नाही. उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीशही चालतील असं आम्हाला दिल्लीहून सांगण्यात आलं होतं, पण शंकेला जागा राहू नये, म्हणून आम्ही सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश स्वीकारण्याची तयारी दाखविली न्या. श्री. भार्गव यांचं नाव सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधिशांनीच आमच्या मुख्य मंत्र्यांना सुचविलं व त्यांनी ते मान्य केलं. त्यात आमचे कोणतेही हितसंबंध गुंतलेले नाहीत

⁂ न्यायाधिशांच्या निःपक्षपातीपणाबद्दल तुम्ही बोललात म्हणूनच सांगतो किश्ता गौड व भूमय्याच्या फाशीला ज्या हायकोर्टजज्जने अगदी आयत्या वेळी स्टे दिला – राष्ट्रपतींनी त्यांना दया दाखविण्याचा अर्ज फेटाळल्यानंतरही – ते जज्ज इंजिनियरिंग व मेडिकल कॉलेजच्या डाव्या विचारसरणीच्या विद्यार्थिगटांच्या स्नेहातले होते त्यांच्या एका शैक्षणिक समारंभाला हे न्यायाधीश प्रमुख पाहुणे होते. त्यांनी दिलेली स्टे ऑर्डर 'न्याय्य' नसूनही आम्ही ती पाळली व प्रकरण निकालात निघेपर्यंत सहा महिने थांबलो ! ◻

आध्रमध्ये आय्. पी. एस्. अधिकाऱ्यांची व डी. आय्. जी. च्या हुद्द्यावरील अधिकाऱ्याची संख्याही इतर राज्याच्या तुलनेने वाजवीपेक्षा अधिक असल्याची तक्रार आहे. अर्थात शासकीय बाजू अशी भक्कम पाठिंबा देऊन असली तरी प्रदेश काँग्रेसअतर्गत जातीय तणाव; मतभेद, गटबाजी लक्षात घेता वेंगल रावाची खुर्ची काही फारशी स्थिर म्हणता येणार नाही. ब्रह्मानद रेड्डी गटाचे व त्यांचे मतभेद जगजाहीर आहेतच आणि आम्ही हैदराबादेत असताना तर अधिवेशनकाळ चालू असल्याने हे मतभेद विकोपाला जाऊन काँग्रेसअंतर्गत बडखोरी होण्याचीच बातमी जोरदार होती. अर्थात ही फूट न पडताच सर्व शांत झाल्याचे दृश्य सध्या तरी दिसत आहे. एवढे असले तरी या मुरलेल्या राजकारण्याचा आब ( खरं बोलायच तर घमेंड ) यत्किंचित कमी झाल्याचं चिन्ह दिसल नाही. विशेषतः नक्षलवाद्याबद्दल व काँग्रेसअतर्गत तणावाबद्दलच्या आमच्या प्रश्नाना उत्तरे देताना 'असल्या छप्पन विरोधांना व विरोधकाना पचवूनच इथपर्यंत पोचलोय, खूप पाहालेत असले,' असा एक पवित्रा त्याच्या शब्दाआडून डोकावत होताच. रावसाहेबाशी झालेले काही सवालजवाब असे.

प्रश्न : तारकुंडे कमिशन रिपोर्टबद्दल प्रतिक्रिया ?

उत्तर : असा काही रिपोर्ट आम्ही जाणत नाही. तारकुंडे कमिशनच आम्ही ओळखत नाही. कुणी नेमणूक केली त्याची ? ते अधिकृत आहे का ? खोट्या बातम्यावर आधारलेला चुकीचा अहवाल आहे तो. राजकीय पूर्वग्रहातून, आम्हाला अडचणीत आणण्याच्या उद्देशाने तो तयार केलेला आहे. शिवाय कमिशनचे अध्यक्ष न्या. तारकुडे यांनी आध्रमध्ये एकदाही येण्याची तसदी घेतली नाही. कमिशनवर आध्रचे जे सदस्य होते, त्यांनी पाठविलेल्या अहवालावर इतरानी दिल्लीत बसून सह्या केल्या डोळे मिटून. ही काय अहवाल तयार करायची रीत आहे ?

प्रश्न : तसं नव्हे; पण आणीबाणीचा फायदा घेऊन आध्र पोलिसानी नक्षलवाद्याची बेगुमान कत्तल केली असा जो समज...

उत्तर : गैरसमज आहे तो ! नक्षलवाद्याच उच्चाटन हे आमच्या रूटिन ड्यूटीजूपैकी एक आहे. त्याचा आणीबाणीशी काहीही सबध नाही आणि आणीबाणीत जिथे काहीही अतिरेक झाले नाहीत अशा राज्यामध्ये आध्र प्रमुख आहे. आम्ही अत्याचार न केल्यामुळेच इतर राज्यात काँग्रेसविरुद्ध उसळलेला असतोष आध्रात नव्हता. आमच्या सरकारनं अत्याचार केले आणि तरीही जनतेने आध्रमधल्या ४२ पैकी ४१ लोकसभामतदारसघात काँग्रेसचे उमेदवार निवडून दिले असं तुम्हाला म्हणायचंय् का ? आणीबाणीत अटक केलेल्याची संख्याही आमच्या प्रातात कमीत कमी होती. खर सागायच तर अनेक विरोधकांना मोकळं ठेवल्याच्या प्रश्नावरून आमच्याच पक्षाच्या केंद्रसरकारशी आमचा थोडासा वादही झाला होता; पण आम्ही तो पत्करला. कारण स्थानबद्धांची संख्या न वाढविताही आम्ही कायदा व सुव्यवस्था राखू शकत होतोच. ज्याना मिसा लावला त्याच्यापैकी बहुसख्याकाबद्दल केंद्राचाच तसा आदेश होता. आम्ही फक्त दोनच आमदाराना अटक केली. त्यातल्याही एकाने सत्याग्रहातच भाग घेतला होता. दुसरा तर दीर्घ काळ पॅरोलवर बधमुक्त होता.

प्रश्न : नक्षलवाद्यांचं उच्चाटन हे रूटिन व्हायचं कारण काय ? काही स्पष्टीकरण दिल्यास......

उत्तर : अहो, कायदा हातात घेणारे लोक आहेत ते. देशद्रोही आहेत. They worship Mao, you know ! हे लोक क्रूर अत्याचार करतात. बायकोसमोर नवऱ्याला ठार मारून त्याच मुडकं गावभर मिरवीत नेल्याची उदाहरणं अलीकडेपर्यंत घडली आहेत. अशा वेळी आम्ही काय स्वस्थपणे बघत बसाव अशी तुमची अपेक्षा आहे ? कायद्याच राज्य निर्माण करणं, हे आमच कर्तव्य आहे आणि हे लोक त्यात अडथळे आणतात. आजच नव्हे, त्याच्या हिंसक कारवाया गेली दहा वर्षं चालू आहेत. त्याचा बदोबस्त करायला आम्हाला अतिशय त्रास घ्यावा लागलेला आहे. आमचे कित्येक अधिकारी आणि पोलिस जखमी किंवा ठार झालेले आहेत. ही हानी आम्ही किती दिवस चालू द्यावी ?

प्रश्न : पण आम्ही असं ऐकलय की नक्षलवाद्याचं शत्रुत्व सरकारशी वा पोलिसाशी नसून बड्या जमीनदाराशी आहे आणि जमीनदाराकडून होणाऱ्या शोषणाची समस्या तुमच्या प्रातात मोठी आहे .....

उत्तर : साफ खोटं आहे हे. चुकीची माहिती. कुठे आहे जमीनदारी, तुम्ही दाखवू शकाल मला ? अहो, आमच्याकडे सीलिंगच्या कायद्याचा अंमल होऊन खूप वर्षं झालीत. तुम्ही म्हणता ते बडे शोषक जमीनदार आता शिल्लकच नाहीत आणि जमीनदारी हा नक्षलवाद्याचा एक बंडखोरीचा बहाणा आहे. त्याना ज्याला गोळी घालायची असते त्याला ते जमीनदार म्हणतात. या रीतीने कुणीही कुणालाही बूर्ज्वा किंवा वर्गशत्रू, जमीनदार ठरवून गोळी घालू शकेल. मी आत्ता तुम्हाला भाडवलदार ठरवून तुमची रिस्टवॉचेस हिसकावून घेतली तर चालेल काय ? शिवाय एखाद्यान कष्ट करून सपत्ती मिळविली तर त्याबद्दल त्याला गोळी घालायची सधी आपण इतराना देणार आहोत का ?

प्रश्न तारकुडे कमिशनच्या अहवालाला मिळालेल्या प्रसिद्धीमुळे, आध्र पोलिसानी बनावट चकमकी घडवून नागरिकाना ठार मारल अशी समजूत आध्राबाहेर होणं स्वाभाविक आहे. तिच निराकरण आपण कस करणार ?

उत्तर : हे पहा, तारकुंडे अहवालाला आम्ही महत्त्व देऊ शकत नाही, हे मी तुम्हाला सांगितलंच आहे ठार झालेले सर्व नक्षलवादी हे चकमकीतच मारले गेले याबद्दल माझी स्वतःची पूर्ण खात्री आहे. याचीच चौकशी करण्यासाठी मी आजच भार्गव कमिशनच्या नेमणुकीची घोषणा केलेली आहे

मुख्य मत्र्यांनी अनवधानानं मारलेला हा एक उत्तुग षटकार. या शेवटच्या प्रश्नाला त्यानी दिलेल्या उत्तरातल्या शेवटच्या दोन वाक्याची संगती कशी लावायची ? नक्षलवादी चकमकीतच मेल्याबद्दल वेंगल रावाची जर एवढी खात्री आहे, तर मग भार्गव कमिशनची नेमणूकच कशासाठी केली ? केंद्रशासनाच्या समाधानाखातर ? की विरोधकाची तोडे तात्पुरती गप्प करण्यासाठी ? मुख्य मंत्र्यानी व्यक्त केलेली खात्री हाच भार्गव कमिशनचा आगामी निष्कर्ष समजायचा की काय ? हा सगळाच प्रकार विलक्षण आहे. मुळात असे काही अत्याचार घडले असलेच तर त्याची जबाबदारी

मुख्य मंत्री व गृहमंत्री या नात्याने अंतिमत व मुख्यतः वेंगल राव याच्यावरच येते आरोपीनेच आपल्यावरील आरोपाची चौकशी करण्यासाठी न्यायाधीश नेमायचा व तो नेमतानाच ते आरोप खोटे असल्याची ग्वाही स्वतःच द्यायची, याला लोकशाहीतली अटळ विटबना म्हणावी की गाढव कायद्याचा आधळा विनोद म्हणावा हे आम्हाला अद्यापही उमगलेले नाही. [ अर्थात याच आशयाची पण आणखी चमत्कारिक विधाने 'गाधीभवन' मध्ये श्री. पी. रामचद्र रेड्डी व श्री शास्त्री याच्या तोडून ऐकली. तेव्हा तर ही सहज घडलेली चूक (tongue-slip) नसून, सत्ताधाऱ्याचा अधिकृत पवित्राच आहे की काय अशीच शका आम्हाला येऊ लागली. हे दोघेही सद्गृहस्थ चक्क, "अत्याचार झालेले नाहीत अशी आमची खात्री आहे म्हणून तर आम्ही भार्गव कमिशन नेमतोय" अशाच शब्दात बोलले. म्हणून तर ? का ही 'कर नाही त्याला डर नाही' अशा थाटाची प्रामाणिक भूमिका मानायची ? ] श्री वेगल राव ( व त्यानतर भेटलेले श्री. विजय रामा राव ) यानी नक्षलवाद्याच्या एकदर समस्येविषयीची शासनाची बाजू निदान तर्कदृष्टया तरी, बऱ्याच भक्कमपणे माडली अस आमच मत झालं व लोकनियुक्त शासनप्रमुख हे वेगल रावाचे पद लक्षात घेता, त्याची बाजू-त्याचे युक्तिवाद, अन्याय्य व असमर्थनीय होते असं आम्ही म्हणू शकणार नाही; पण तरीही त्याच्या त्या शेवटच्या विधानाचा कोणताच समर्थनीय अन्वय आम्हाला आजपर्यंत लावता आलेला नाही.

मुलाखतीत जाणवलेली आणखी एक गोष्ट म्हणजे (बहुधा तारकुडे अहवालानंतरच) नक्षलवादी चळवळ व तिचे उच्चाटन हा वेगल राव सरकारचा दुखरा, नाजूक भाग झालेला असावा. धरल तर चावत, सोडल तर पळतं अशी काहीशी अवघड अवस्था. त्यामुळे रावसाहेब त्यावर बोलताना बरेच उग्र, आक्रमक होत होते. विरुद्ध जाणारे मुद्दे ऐकून न घेताच आपल आग्रही उत्तर ठासून देण्याकडे कल होता. 'मी सागतो तेच सत्य' असा एक आविर्भाव, कदाचित तो प्रदीर्घकालीन अधिकारपदाचा गुणधर्म असावा. जमीनदार हा त्याचा 'वीक पॉइंट' दिसला, पण त्यात तस नवल नाही. कारण ते स्वतः त्याच वर्गाच प्रतिनिधित्व करतात. त्यानी त्याबद्दल पोटतिडकीन बोलण स्वाभाविक आहे श्री वेगल राव व आम्हाला भेटलेल्या इतर सर्व सत्ताधाऱ्याच्या प्रतिनिधीचा सर्वाधिक स्ट्रॉग पॉइट आध्रप्रदेशमधील कॉग्रेसची लोकप्रियता हा होता. श्री. वेंगल राव व श्री. रामचंद्र रेड्डी यानी त्याबद्दलची आकडेवारीही मांडली. 'ताज्या लोकसभा निवडणुकीने तर जनता आमच्याच मागे असल्याचं सिद्ध केल आहेच, पण त्या पूर्वीही ग्रामपचायतीपासून विधानसभेपर्यंतच्या सर्व निवडणुका कॉग्रेसन प्रचड सख्याधिक्यासह जिकल्या आहेत', असं त्याच म्हणण. दहा वर्षांपूर्वी जिथे नक्षलवादी चळवळ प्रकर्षानं पेटून उठली त्या श्रीकाकुलम भागातही अलीकडच्या विधानसभा-निवडणुकीत बारा पैकी अकरा जागा कॉग्रेसनच जिकल्या आहेत, इतरत्रही हेच प्रमाण आहे, हा दिला गेलेला आधार. हरिजन-गिरिजनाची बहुसख्या/निर्णायक सख्या असलेल्या विभागातूनही कॉग्रेसचेच उमेदवार विविध पातळ्यांवर बहुसख्येनं निवडून गेले आहेत आणि मार्च १९७७ मध्ये कॉग्रेसचे इतर बालेकिल्ले पत्त्याच्या बगल्यासारखे कोसळत असतानाही आंध्र भक्कमपणे कॉग्रेसच्या बाजूला राहिला आहे, हा मुद्दा खरोखरीच विचार करण्यासारखा वाटतो मात्र प्रत्यक्ष नक्षलवादी चळवळीतली मडळी या मुद्द्याला महत्त्व द्यायला तयार नाहीत. त्याचा खुलासा असा की, 'आमचा ससदीय लोकशाहीवर विश्वासच नाही त्यामुळे ज्या निवडणुकामध्ये आम्ही कोणत्याही प्रकारे सहभागी होतच नाही, त्याचे निकाल ही कॉग्रेसची व आमची तुलना करण्याची वा लोकप्रियता ठरविण्याची कसोटी होऊच शकत नाही' वरकरणी व तात्त्विक दृष्टया हे स्पष्टीकरण निर्दोष वाटते तथापि त्रयस्थपणे विचार करताना आम्हालाही असा प्रश्न पडला की, नक्षलवादी निवडणुकीत नाहीत म्हणून जनतेने एकदम कॉग्रेस हाच पर्याय का स्वीकारावा ? आणि तोही एवढ्या सख्येने ? नक्षलवाद्यानी डावी विचारसरणी तळापर्यंत रुजविण्याचा प्रयत्न एक दशकभर चालविल्यानतरही लोकानी मार्क्सवादी (डावे) किंवा भारतीय (उजवे) कम्युनिस्टासारख्या पक्षाना जवळ का करू नये ? निदान दलित, हरिजन, आदिवासीवर्गाने-ज्याच्यात नक्षलवाद्याचे कार्य चालते त्यानी तरी-तसे का करू नये ? किंवा डावे पक्ष पुरेसे प्रबळ नसल्यास अपक्षाची किंवा इतर विरोधी पक्षाची ( उदाहरणार्थ मार्च ७७ मध्ये जनतापक्ष ) निवड का करू नये ? श्री. वेगल राव यानी या प्रश्नाचे उत्तर अर्थातच 'आमच्या पक्षाने राबविलेले विकास-कार्यक्रम खरोखरच लोककल्याण साधीत आहेत', असेच दिले व ते अपेक्षितच होते.

नक्षलवादाच्या प्रतिकारात निर्माण होणाऱ्या समस्या जाणून घेण्यासाठी आम्ही एखाद्या वरिष्ठ पोलिसअधिकाऱ्यास भेटावे अशी शिफारस श्री. वेगल राव यानी मुलाखत सापवताना केली होती व व आमचीही तशी इच्छा होतीच कारण आंध्रप्रदेशच्या पोलिसखात्यात नक्षलवादाचे ( की नक्षलवाद्याचे ? ) उच्चाटन करण्यासाठी एक खास विभाग गेली अनेक वर्षे अस्तित्वात आहे आणीबाणीतली या विभागाची सशयास्पद कर्तबगारी एव्हाना वाचकाच्या परिचयाची झाली आहेच तथापि पोलिसअधिकाऱ्याची मुलाखत मिळविण मुख्य मत्र्याच्या मुलाखतीपेक्षा बरच अवघड गेलं. शेवटी आध्रपत्रिका या स्थानिक तेलगू दैनिकाचे प्रमुख वार्ताहर व ज्येष्ठ पत्रकार श्री. पी. व्ही. आर. शर्मा याच्या मध्यस्थीमुळे आध्रातील सपूर्ण नक्षलवादविरोधी मोहिमेचे सूत्रधार गणले जाणारे डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस (डी आय जी.-इन्टेलिजन्स) श्री. विजय रामा राव याची भेट मिळाली. मध्यस्थ पी. व्ही. आर. शर्मा हे भलतेच गमतीदार गृहस्थ निघाले. त्यानी नक्षलवादाचा उगम हा आजच्या बहकलेल्या तरुण पिढीच्या बेतालपणातून व सस्कारहीनतेतून झाला असल्याच आपल अनुभवजन्य मत आम्हाला सुमारे सव्वा तासाच एक व्याख्यान देऊन जाहीर करून टाकल. शर्माजी साठी उलटलेले, पक्के कडवे कर्मठ ब्राह्मण दिसतच होते. भारतीय सस्कृती व सस्कार

**नक्षलवादी चळवळ व तिचे उच्चाटन हा वेंगळराव सरकारचा दुखरा, नाजूक भाग असावा.**

हे key-words आपल्या चमत्कारिक मताला आधार म्हणून त्यानी गीतेतले काही श्लोकही म्हणून दाखविले, त्यामुळे हसून सहमतिदर्शक मान डोलाविण्यापलीकडे आम्हाला करण्यासारख काही नव्हतंच. ' नक्षलवाद वाईट का ? तर तो परदेशातून आयात केलेला आहे. त्या वाट चुकलेल्या तरुणावर लहानपणीच कुणी भारतीय सस्कार केले असते तर ते हिंसक- दहशतवादी कधीच झाले नसते ', अशी शर्माजीची पक्की खात्री होती. नक्षलवादाच्या परिसरात तीस पस्तीस वर्षे पत्रकारितेत काढलेला कुणीही त्याबद्दल असा एखादा दृष्टिकोन बाळगून असू शकेल, हा खर तर आम्हालाही धक्काच होता.

श्री. विजय रामा राव याची भेट मिळायला दोन-तीन दिवस लागल्याने मधल्या काळात त्याच्याबद्दल बरीच माहिती–अर्थात अनधिकृत–मिळू शकली. या पदावर येण्यापूर्वी हा गृहस्थ वरंगळला डी. एस. पी होता. श्री. वेंगल राव मुख्य मत्री झाल्यानतरच, म्हणजे दोन एक वर्षापूर्वी, वयाने/अनुभवाने कनिष्ठ असूनही त्याला डी. आय. जी. म्हणून बढती मिळाली. कारण ? ते वेंगल रावाचे जातवाले पडले ! अर्थात आपल्या जातीतल्या या ज्युनियर पण कर्तबगार अधिकाऱ्याला अशी अचानक बढती देणं वेंगल रावाना सोप नव्हत. शेवटी ज्येष्ठतेत विजय रामा रावच्या वर क्रमांक असलेल्या सात-आठ वरिष्ठ पोलिसअधिकाऱ्याना डी. आय. जी. ची श्रेणी देऊनही काहीना मुलकी सेवामध्ये (Civil Services) अधिकारपदे देण्यात आली. त्यामुळे आध्रप्रदेशात फूड अँड कॉर्निग कॉर्पोरेशन, स्टेट ट्रान्स्पोर्ट अशा क्षेत्रातही आय. पी. एस. झालेले अधिकारी उच्च पदावर दिसले तर आश्चर्य मानलं जात नाही. श्री. वेगल राव व पोलिसखात्याच्या प्रगाढ ऋणानुबधाच एक उदाहरण म्हणूनही या प्रकाराचा उल्लेख होतो.

नक्षलवादी अर्थातच विजय रामारावला आपला दुष्मन नंबर एक मानतात व ते साहजिक आहेही. आम्हाला भेटलेल्या एका नक्षलवाद्यानं 'that bloody sly fox' अशा शब्दात त्याचा उल्लेख केला. इतरांच्या प्रतिक्रियातही, विशेषणे वेगळी होती एवढेच. त्यामुळे या इसमाची भेट घेण्याबद्दल बरीच उत्सुकता होती. आध्र विधानसभाभवन व त्या समोरचे 'रवींद्र भारती' हे कला–सास्कृतिक केंद्र याच्या मधून जाणाऱ्या मोठ्या रस्त्यावर आध्रच्या आय्. जी. पी. व चार–सहा डी. आय्. जी. च्या कचेऱ्या ओळीन लागतात. सर्वांत शेवटी असलेल्या विजय रामा रावच्या कचेरीचं वातावरण, दारातल्या सेंट्रीपासूनच काहीसं वेगळं, कोदट, दहशतीच वाटलं. नक्कीच. आय्. जी. पी. हे त्याचेही वरिष्ठ; पण त्याच्या कार्यालयीन वातावरणात व सेवकवर्गातही खूप मोकळेपणा होता. विजय रामा रावच्या ऑफिसात केवळ दबलेल्या आवाजातली कुजबूज. त्याच्याकडे आलेले गृहखात्याचे मुलकी अधिकारी व पोलिसऑफिसर्ससुद्धा त्याच्याशी भलत्या अदबीन बोलतात आणि त्याचे खाजगी साहाय्यक व कनिष्ठ सेवक तर त्याच्यापुढे उभ राहतानाही थरकापतात, ह्या दोन गोष्टी तर आमच्या दोन–तीन तासाच्या प्रतीक्षाकालात व दीड–दोन तासाच्या मुलाखतीत आम्ही प्रत्यक्षच पाहिलेल्या आहेत.

या सगळ्या पार्श्वभूमीवर विजय रामा रावच दर्शन अपेक्षाभग करणारंच होत. पाहताच दहशत वाटावी असा अक्राळविक्राळ मनुष्य दिसेलसं वाटलं होतं, पण प्रत्यक्षात हा तिशी–पस्तिशीचा डी. आय्. जी. मुलकी सेवेतला एखादा स्कॉलर आय्. ए. एस्. वाटावा असा दिसतो. उची बरीच, पण अगदी सडसडीत, डोळ्यावर चक्क चष्मा आणि वेषही सिव्हिलियन. खाकी गणवेश नव्हे. आवाजही साधा आणि मोकळा, दमदार किंवा करडा नव्हे. वागण्याबोलण्याच्या पद्धती विश्वास बसू नयेत इतक्या सौम्य. थोडक्यात, नक्षलवाद्याच्या अमानुष उच्चाटनप्रयत्नामागचा 'ब्रेन' हा असेल असं बिलकूल वाटू नये अस, काहीसं प्राध्यापकी, व्यक्तिमत्त्व. मुलकी आणि लष्करी/पोलिसी खात्याच्या अधिकाऱ्यांच्या जवळ जाण्याची आमची ही काही पहिलीच वेळ नव्हती, मात्र हा अधिकारी इतर अनेकाहून फार निराळा वाटला आणि तसा तो निराळा आहेही. जागतिक इतिहास, राजकारण आणि तत्त्वज्ञान यावर त्याचं बऱ्यापैकी प्रभुत्व आहे आणि त्याचा तुलनात्मक अभ्यास–निदान निरीक्षण–करण्याची क्षमता आहे. प्रमुख जागतिक तत्त्वप्रणालीची–विशेषत राजकीय स्वरूपाच्या–चर्चा तो करू शकतो. त्याच्या एअर कन्डिशंड चेंबरमध्ये त्याचं स्वत.चं लहानस ग्रंथालय आहे विशेषतः नक्षलवादाशी दोन हात करायची जबाबदारी आल्यानतर साम्यवादाच्या उगमापासून त्यातल्या चालू आतरराष्ट्रीय विचारप्रवाहापर्यंतचं वाचन त्यानं केलेल आहे बऱ्याचशा नक्षलवाद्यांनाही कदाचित नक्षलवाद एवढा समजला असेल की नाही कुणास ठाऊक ! युरो(पियन) कम्युनिझमवर आमच्याशी चर्चा करायचीही त्याची तयारी होती अर्थात आमची नव्हती !

श्री. वेंगल राव याचा संदर्भ दिल्यानंतरच विजय रामा रावन मोकळेपणान बोलायला सुरुवात केली, तेव्हा गृहस्थ नुसताच पढिक नसून मुत्सद्दीही असल्याचं लक्षात आल. दोन तासाच्या त्याच्या मुलाखतवजा भाषणात त्यानं आम्हाला तोड उघडण्याची भरीव संधी (लस्सी पाजण्याचा पाहुणचार वगळता) क्वचितच दिली आणि नक्षलवादाचा इतिहास व चळवळीची पार्श्वभूमी सागण्याच्या मिषान, अडचणीच्या मुद्द्याना व आमच्या प्रश्नाना वेळोवेळी यथास्थित बगल दिली. शब्दाचा वापर अत्यत तोलून–मापून आणि आपण अडकू शकू अशी फट कुठेही न सोडण्याची दक्षता. त्याच्या मुलाखतीतला बराच भाग या लेखमालेत याआधी वापरला गेलेला आहेच–data या स्वरूपात–बाकी या प्रदीर्घ मुलाखतीतून निष्पन्न झाला तो त्याचा धूर्तपणाच. आमच्याकडे दोस्तीच्या नात्यानच पहात असल्याच त्यान जाहीर केलं आणि त्याचं प्रतीक म्हणून पूर्वीच्या चळवळग्रस्त भागात आम्हाला हिंडवून आणायची तयारीही दाखवली. लगेच वरगळचे डी. एस्. पी. वेंकट राम रेड्डी याना फोन वगैरे (अर्थात, पोलिसाच्या गाडीतून guided tour घेऊन समाधान मानायची आमची तयारी नसल्यामुळे ही ऑफर आम्ही अमलात आणली नाही.)

अर्थात या प्रदीर्घ मुलाखतीतून नकळत बऱ्याच गोष्टी मिळाल्या. एक तर, गृहस्थ वरून शात दिसत असला तरी आतून कुठे तरी थोडासाच पण, चरकल्याची साक्ष पटली. कदाचित आणीबाणीतले अत्याचार भोवतील अशी बारीक भीती असावी. केरळच्या राजनप्रकरणात वरिष्ठ पोलिसअधिकारी अडकल्याच ताजं उदाहरण होतच व त्याचा उल्लेखही त्याच्या बोलण्यात आला.! आमच्याच

सरकारचा आता आम्हाला पुरेसा पाठिंबा राहिलेला नाही आणि जनतासरकार तर आणीबाणीत भूतपूर्व राज्यकर्त्यांशी एकनिष्ठ राहिलेल्या अधिकाऱ्यांमागे हात धुऊन लागलेलं आहे तारकुंडे कमिशन नेमण्याचा व अहवालाला प्रसिद्धी देण्याचा उद्देशही पोलिसखात्याला वेगळं काढून झोपडण्याचाच दिसतो. या कारणामुळे सध्या आमच्या खात्याच नीतिधैर्य मोठ्या प्रमाणात खचलेलं आहे,' अशी स्पष्ट तक्रार त्यान बोलून दाखविली. आणीबाणीचा फायदा घेऊन अत्याचार व कत्तली केल्याचा आरोप विजय रामा रावनं साफ नाकारला आणि ते अपेक्षितच होतं. तथापि नक्षलवाद्याविरुद्ध पूर्वीपासूनच कायदेशीर पण कडक उपाययोजना करण्यात येत असल्याचं मान्य करून त्यानं त्याचं समर्थन करणारी दोन कारणही दिली– " १. आम्ही कायद्याचे रक्षक आहोत आणि कायदा हातात घेणाऱ्याविरुद्ध जरूर ती कारवाई करण हे आमचं कामच आहे नक्षलवादी चळवळ ही घटनाद्रोह करणारी व म्हणून बेकायदेशीर मार्गाने जाणारी आहे, त्यामुळे तिला आळा घालण जरुरीच होत आणि २. आम्ही सरकारचे नोकर आहोत. 'वरून' ठरलेल्या धोरणाची व आदेशाची आम्ही फक्त अमलबजावणी करायची असते ते चूक की बरोबर याची चिकित्सा करायचा हक्क वा जबाबदारी आमची नाही." अर्थात त्याच्या एकंदर पवित्र्याशी दुसरे स्पष्टीकरण फारस जुळत नाही. वरून आलेले हुकूम पाळण्यापेक्षाही स्वतःच्या कन्व्हिक्शनमधूनच त्याचा आत्यंतिक नक्षलवादविरोध जन्मलेला आहे, याबद्दल आम्हाला शंका वाटत नाही आणि त्यामुळेच एखाद्या 'जी हुजूर' छाप अधिकाऱ्यापेक्षा ही चळवळ दडपायचे प्रयत्न विजय रामा रावनंच अधिक निकरान (आणि पर्यायान अधिक निर्दयपणान) केलेले असणार याबद्दलही संशय वाटत नाही अर्थात, 'नक्षलवाद्यांशी आमचं वैयक्तिक वैर काहीच नाही. उलट त्याच्यातल्या अनेक वाट चुकलेल्या तरुणाबद्दल मला अपार सहानुभूती वाटते. त्याना कमीत कमी शिक्षा व्हावी व त्यानी स्वतःला सावरावसुधारावं, सन्मार्गावर यावं, यासाठी मी स्वतः प्रयत्न केलेले आहेत,' 'असं सांगायला डी आय् जी साहेब चुकले नाहीत.

प्रौढवयात, तत्त्वज्ञान, कायदा व शस्त्र अशा तिन्ही पातळ्यांवर नक्षलवादाशी लढायला सज्ज झालेला हा मुख्य मंत्र्यांचा विश्वासू व एकनिष्ठ सेनापती उटासारख्या तिरक्या चालीन धावणाऱ्या आपल्या बुद्धिमत्तेच्या, brain-workच्या बळावर सध्या तरी नक्षलवाद्याना जोरदार शह देऊन राहिल्याचं दृश्य दिसत आहे त्याच्या आणखी एक-दोन हत्यारांबाबत पुढील लेखांकात विस्तारान लिहावं लागणार आहेच. तथापि त्याच्याबद्दल कानी आलेल्या एक-दोन गोष्टी हा लेखांक संपवितानाच सांगायला हव्यात. आंध्रमध्ये, विशेषतः आणीबाणीच्या कालखंडात स्थानबद्ध राजकीय विरोधकाचा आणि खासकरून नक्षलवाद्याचा अमानुष छळ–शारीरिक व मानसिक–करण्यात आला हे आता जगजाहीर झाल आहे त्यासाठी अत्याचाराचे जे नवे कल्पक प्रकार शोधण्यात आले त्यामागे विजय रामा रावची प्रेरणा असल्याची चर्चा हैदराबादेतील त्या वर्तुळात ऐकू येते. दुसरी गोष्ट म्हणजे श्री. लक्ष्मण पगार ह्या महाराष्ट्रीय नक्षलवादी कार्यकर्त्याची जीभ कापण्यात आल्याचं खळबळजनक प्रकरण आता बहुश्रुत-बहुचर्चित आहे. हा प्रकार मुंबईत घडला आणि त्यासाठी आंध्रच्या वरिष्ठ पोलिसअधिकाऱ्याची एक 'टीम'च मुंबईला येऊन उतरली होती.

असं ऐकतो की त्या टीममध्ये विजय रामा रावचाही समावेश होता.

आणि पुण्याच्याच एका दैनिकान प्रसिद्ध केलेल्या त्या प्रकरणाचा तपशील बरोबर असेल तर धारदार शस्त्रान पगार यांची जीभ प्रत्यक्ष कापणारा अधिकारी हा आंध्रचा डी आय् जी (इंटेलिजन्स) हाच होता !

[ क्रमशः ]

---


ग्रामीण आंदोलनांचा मागोवा घेणारे पुस्तक

# श्री ग्रा मा य न

( दुसरी आवृत्ती : प्रकाशनाच्या वाटेवर )

श्री. ग. माजगावकर

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव । पुणे ३०

मूल्य : पंधरा रुपये

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### ६।८।७७ ते १२।८।७७

### जनतापक्षाच्या धोरणात आक्रमक बदलाची शक्यता

या सप्ताहाच्या सुरुवातीलाच कर्कराशी उदित असून चंद्र मेष या मंगळाच्या राशीत आहे. केंद्रोय मंत्रिमंडळाच्या निर्मितीच्या वेळी कर्कराशीतील शनीचे बरेच प्राबल्य होते. आता या राशीत रवी-शनी हे दोन्ही सामर्थ्यवान ग्रह सहयोगात असून वृषभ राशीतील मंगळाचे त्याना बरेच मोठे सहकार्य होणार आहे. पतप्रधान श्री. मोरारजी देसाई याना रवी-शनीचे जरी पुरेसे सहकार्य नसले तरी मंगळाचे भरपूर सहकार्य आहे तसेच परराष्ट्रमंत्री अटलबिहारी वाजपेयी याच्या धनुराशीला राहूचे सहकार्य आहे. त्यामुळे या दोन्ही व्यक्ती लोकांचे लक्ष वेधून घेणार आहेत. जनतापक्षाच्या धोरणात डावीकडे झुकणारा थोडा आक्रमक बदल होणार असून त्याचे पडसाद श्री. मोरारजी देसाई यांच्या निर्णयात उमटणार आहेत. केंद्रीय मंत्रिमंडळात वाढ, बदल, खातेबदल असे काही तरी होणार आहे. इंदिरा गांधीच्या माजी सरकारातील खळबळजनक अशी काही प्रकरणे नव्याने उजेडात येणार असून कॉंग्रेसपक्षाच्या आक्रमक धोरणाला त्यामुळे अडसर निर्माण होणार आहे. माजी पतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी पुन्हा जरी राजकीय रंगमंचावर येण्याचा पवित्रा घेत असल्या तरी कॉंग्रेसमध्येच त्याना प्रखर विरोधाला तोंड द्यावे लागणार आहे. या दृष्टीने श्री. यशवंतराव चव्हाण याची कसोटी लागणार आहे. महाराष्ट्र सरकारचा युवक कॉंग्रेसविरोधी पवित्रा स्पष्ट होईल.

---

**मेष :** उत्कर्षदायक

आंतरिक्षातील ज्या अनेक राशी सध्या आघाडीवर आहेत त्यात मेष ही एक रास आहे. सुखस्थानी रवी-शनी मानसिक स्वास्थ्य किंवा समाधान फारसे देणार नसले तरी ते काही तुमचे अहित करणार नाहीत. उलट तुमच्या उत्पन्नात ते भरपूर भर घालतील. व्यापार असो की तुमचा एखादा कारखाना असो त्याचा उत्कर्ष होणार आहे. पडून राहिलेल्या मालास विक्रीची संधी मिळेल. व्यापारी वायदे अचूक ठरतील. अनेक क्षेत्रात नवे काही तरी घडू लागणार आहे. नोकरीत प्रतिकूल परिस्थिती आता उरलेली नाही. आजवर जे काम तुम्ही केले त्याचे बक्षीस बढतीच्या रूपाने या वेळी तुम्हाला मिळणार आहे. अनेक बाजूनी लाभदायक घटना घडतील. रेस-लॉटरीत तुमचे नशीब बहरून येणारच नाही असे समजू नका. मात्र जन्मस्थ ग्रह बलवान हवेत एकंदरीत प्रतिष्ठा, पैसा देणारा असा हा काळ आहे. शुभ दिनांक ११-१२.

**महिलांना :** जीवनात काही तरी आकर्षक घडणार आहे.

**विद्यार्थ्यांना :** मागे पडलेला अभ्यास पूर्ण होईल.

**वृषभ :** उत्कर्षाचा काळ

दैवाची जेव्हा अवकृपा असते तेव्हा फक्त अपयशच पदरात पडते; पण दैव जेव्हा कृपा करते तेव्हा यश चवऱ्या ढाळते. मित्रहो, तुमच्यावर आता दैव चवऱ्या ढाळीत आहे. यात कोणतीच अतिशयोक्ती नाही. कारण अंतरिक्षातील अति सामर्थ्यवान ग्रह तुमच्यावर सध्या खूष आहेत. त्यामुळे तुमच्या जीवनात उत्कर्षाचे पर्व सुरू झाले तर आश्चर्य मानू नका. पराक्रमातील रवि-शनीची जोडी तुमच्याकडून मोठी कर्तबगारी घडविणार आहे. नोकरी-व्यवसायात दुर्मिळ असे यश तुमच्या पदरात पडणार आहे घडेल ते उत्कर्षाचे व आश्चर्यकारक असेल. पैशाची चिंता करू नका. शुभ दिनांक ६-१०.

**महिलांना :** संगीत, नृत्य या कलेत प्रतिष्ठा मिळेल.

**विद्यार्थ्यांना** . अभ्यासात लक्षणीय प्रगती होईल.

**मिथुन :** प्रतिष्ठा उंचावेल

बाराव्या मंगळाची तुम्ही मुळीच पर्वा करू नका. कारण तो तुमचे कोणतेच वाईट करणार नाही. कारण तुमच्या यशाची खरी सूत्रे या वेळी राशीत असलेल्या गुरु-शुक्राच्या हाती आहेत. ते तुम्हाला काहीही कमी पडू देणार नाहीत. बुद्धी व भावना या दोन्ही आघाडीवर तुमच्या हातून परिणामकारक लिखाण होणार आहे. या वेळी तुमची प्रतिष्ठा अनेक बाजूनी उचावली तर आश्चर्य मानू नका. व्यापारात नवे बदल घडवू शकाल. मंदीचा काळ आता संपला आहे. उद्योगात नव्या योजना प्रत्यक्षात आणू शकाल, नोकरीत अपेक्षित बदल घडतील त्रास देणारे वरिष्ठ अधिकारी तुमच्यापासून दूर जातील. तुमच्या गुणांचे चीज होईल. आर्थिक बाजू बचतीच्या दृष्टीने फारशी समाधानकारक राहणार नाही. पण पैसा मिळेल शुभ ८-१०

**महिलांना** . संसारात सारे समाधानकारक असेल.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यासातील प्रगतीने मन आनंदी राहील.

**कर्क :** यश निश्चित

बारावा गुरु तसा वाईटच आहे, पण तो बौद्धिक राशीत आहे त्यामुळे त्याची तुम्हाला प्रतिकूल फळे मिळणार नाहीत. त्यापेक्षा राशीत असलेला रवि-शनियोग खूपच उपकारक आहे. कोणत्याही कामात मोठे यश देण्याचे त्याचे सामर्थ्य तुम्हाला लाभले असल्यामुळे इतर प्रतिकूल ग्रहाची तुम्ही मुळीच पर्वा करू नका. या वेळी धंद्यात नव्या युगाची सुरुवात होईल. आजवर न मिळालेले यश या वेळी मिळून जाईल. व्यापारी लोकांना कोणत्याही अडचणी भासणार नाहीत. नोकरीत तुमच्या शब्दाला मोठे महत्व येणार आहे. बदल देखील संभवतो. चालू कामात तुमच्या कार्यक्षमतेला मोठा वाव मिळणार आहे -बेकारीच्या त्रासातून अनेक भाग्यवान मोकळे होणार आहेत. शुभ ६-१०.

**महिलांना :** नोकरीत महत्त्व वाढेल.

**विद्यार्थ्यांना :** ठरवलेला बेत पार पडेल.

**सिंह :** संघर्षातून यश

राशिस्वामी रवि बारावा आहे व तो शनीच्या सहवासात आहे. दोन तुल्यबळ शत्रू एकत्र आले म्हणजे जे घडते तेच तुमच्या बाबतीत घडत आहे. मनाचा कोंडमारा अजून थोडे दिवस चालूच राहाणार आहे तुमचा मान सध्या तरी कमी झाला आहे; पण तो काही फार वेळ राहाणार नाही. पुढच्या आठवड्यात रवि राशीत आला की तुमच्या आकांक्षाना गती येईल. प्रोत्साहक घटना घडतील. सध्या मात्र अनेक बाबतीत संघर्षाचे वातावरण राहणार आहे त्यात यश मिळेल याची खात्री बाळगा. नोकरीत जमवून घेणे आवश्यक आहे. सहकारी चहाड्याचुगल्या करणारे असले तरी त्याचा वरिष्ठांवर परिणाम होणार नाही. आरोग्य साभाळणे आवश्यक आहे वेकारांना तात्पुरते काम मिळेल. शुभ ६-९.

**महिलांना :** सार्वजनिक कार्य करताना काळजी घ्या.

**विद्यार्थ्यांना** परीक्षेच्या बाबतीत थोडे अनपेक्षित घडेल.

**कन्या :** अनपेक्षित लाभ

कन्याराशीच्या माणसांवर सध्या सारेच महत्त्वाचे ग्रह बेहद्द खूष आहेत. बऱ्याच काळानतर इतकी छान ग्रहरचना तुमच्या

वाट्याला आलेली आहे याचा अर्थ सारे *'आलबेल' आहे असा मात्र नव्हे* कारण बुध हा सात्विक स्थितीचा कारकग्रह बारावा आहे तो ध्यानीमनी नसलेला एकेक खर्च उभा करणार आहे. पैसे कुठे गेले ते समजणेसुद्धा कठीण आहे असे असले तरी पैसा मिळण्यास मात्र काहीच कमतरता नाही रवि-शनि अनेक मार्गांनी तुमच्यापुढे रक्कम उभी करणार आहेत. त्यामुळे तुमच्या प्रतिष्ठेला कुठेही तडा जाणार नाही. रेस-लॉटरी अशा मार्गाने पैसा मिळण्याची संधी येईल. शेअर्स किंवा वायदे अचूक उतरून लाभ होईल. गेलेला मनाचा उत्साह पुन्हा येईल शुभ दि.-८-१०

**महिलांना :** मुलांची विनाकारण काळजी करण्याचे मुळीच कारण नाही.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यास व इतर गुणांचे कौतुक होईल.

**तूळ : नोकरीत उत्कर्ष**

बारावा राहू तुम्हाला तसा मोकळा सोडील या भ्रमात राहू नका मात्र या वेळी तुमच्या मनात कोणताही न्यूनगंड शिल्लक राहणार नसून थोडेफार प्रसन्न वातावरण राहणार आहे त्याचा फायदा अनेक बाजूंनी मिळेल प्रामुख्याने नोकरीच्या क्षेत्रात उत्कर्षाचे नवे पर्व सुरू होणार आहे ज्यांच्या नोकऱ्या कायम झाल्या नसतील त्यांच्या नोकऱ्या कायम होतील नोकरीतील अस्थिरपणा कमी होईल. बढती-प्रमोशनचेसुद्धा जमून जाईल कलावंत लोकांना हा आठवडा प्रगतीचा आहे. त्याची उपेक्षा संपेल पैसा व प्रसिद्धी मिळेल या वेळी प्रवासाचे जमून जाईल. सरकारी खर्चाने परदेशप्रवास होण्याची शक्यता आहे आरोग्याची मात्र काळजी घ्या. विशेष करून साथीच्या आजारापासून सावध राहा शुभ दि -७-११

**महिलांना** लेखन व संगीतकला यात नाव मिळेल

**विद्यार्थ्यांना :** शैक्षणिक वातवावरण बरेच प्रसन्न राहील

**वृश्चिक : भाग्यकारक घटना**

तुमचे या वेळेचे ग्रहमान बरेच उपकारक व आकर्षक आहे. भाग्यस्थानी आलेला रविशनीचा सहयोग तुमचे मनोरथ पूर्ण करणार आहे. हुशारीने वागलात तर फायदा घेऊ शकाल औद्योगिक क्षेत्रात तुमचे मनसुबे कसोटीला उतरतील. मोठेपणा मिळेल. पुढारीपण चालत येईल. नोकरीत आगामी काळातील ऐतिहासिक घटनांची चाहूल या वेळी लागेल. नोकरीत फार छान काळ आहे. रेसमध्ये या वेळी तुमचे नशीब उघडू शकेल. मात्र जन्मस्थ ग्रह अनुकूल हवे. विशेष महत्त्वाच्या कारणासाठी परदेशी जाण्याचे स्वप्न साकार होण्याची शक्यता आहे कौटुंबिक जीवनात प्रेमपूर्ण वातावरण राहील निवडणुकीत यश मिळू शकेल उच्च पदस्थ व्यक्तींबरोबर मित्रत्वाचे संबंध जुळून येतील शुभ दि.-७-११.

**महिलांना :** अनेक दिवसांच्या अपेक्षा पूर्ण होतील.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यासात परिश्रम घेणे आवश्यक आहे

**धनू : सफलता मिळेल**

गेल्या महिन्यापासून तुमच्या प्रगतीची जी घोडदौड चालू झाली आहे ती आता कुणीही रोखू शकणार नाही कारण गुरु, बुध, राहू अशा ग्रहांची ताकद तुमच्या पाठीशी उभी आहे ते तुमचे बळ सारखे वाढवीत आहेत संसारात आता गोडीगुलाबीचे-प्रेमाचे वातावरण निर्माण झाले आहे. गुरु स्नेहपूर्ण वातावरण निर्माण करीत आहे. तुमचे मोठेपण त्यामुळे वाढते राहील अनेक क्षेत्रात केलेल्या प्रयत्नाचे फळ तुमच्या पदरात पडणार आहे. हा सप्ताह मोठा अर्थपूर्ण आहे. आध्यात्मिक क्षेत्रात अपेक्षित सफलता पदरात पडणार आहे. नोकरीत तुमच्या भोवती स्तुतिपाठकाचे कडबोळे निर्माण होईल. फक्त 'नीरक्षीर' न्यायाने त्यांची पारख करा आर्थिक बाबही बरीच भक्कम होईल. अनपेक्षित लाभ होईल. रवि शनि शारीरिक स्वास्थ्य जरी मनासारखे देणार नाहीत तरी आर्थिक बाजू सुधारेल शुभ दिनांक ९-११.

**महिलांना** संसारात प्रेम व स्नेह निर्माण होईल

**विद्यार्थ्यांना** सुप्त गुणांना प्रोत्साहन मिळेल.

**मकर : कर्तबगारीला प्रतिसाद.**

तुमच्या भोवती निर्माण झालेली उदासीनता अजून पूर्ण दूर होणार नसली तरी तुमचे भेदरलेले मन मात्र बरेच मोकळे होणार आहे त्या दृष्टीने हा सप्ताह खूपच महत्त्वाचा ठरावा पाचवा मंगळ हे तुमचे वरदान आहे व तोच तुमच्याकडून काही तरी घडवील. अजून तशी कोणतीच अनुकूलता नाही तरी पण तुमच्या कर्तबगारीला प्रतिसाद मिळणार आहे. यशाची चाहूल लागणार आहे. नोकरीत यश आहे चालू नोकरीत लाभदायक घटना घडतील वरिष्ठांबरोबर संबंध बिघडणार नाहीत याची काळजी घ्या बेकारांना स्वतंत्र उद्योगासाठी मदत मिळेल. तज्ज्ञांची मदत मिळेल. प्रवासाचा बेत सध्या तरी पुढे ढकला. कारण काळ तेवढा अनुकूलच नाही. राजकारण व समाजकारण यात भाग घेतला तरी सल्लागार तपासून घ्या तब्येतीला जपणे आवश्यक आहे शुभ दिनांक १०-१२.

**महिलांना :** अपेक्षाभंगाचे दुःख आता बरेच कमी होईल.

**विद्यार्थ्यांना :** संशोधनात्मक परिश्रम सत्कारणी लागतील.

**कुंभ : निराशा संपेल**

अंतरिक्षातील सर्व राशीत कुंभरास ही नेतृत्वाचे गुण व विद्येचे लेणे देणारी एक मोठी रास आहे; पण ग्रहांची पुरेशी मर्जी नसल्यामुळे तुमच्याभोवती अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे; पण मित्रहो, लवकरच या कोंडाळ्यातून ग्रह तुम्हाला बाहेर काढणार आहेत शत्रुस्थानात अशुभ ग्रह असावेत असे ज्योतिषशास्त्राचे मत आहे त्यामुळे तुमच्या शत्रुस्थानी असलेले रवि-शनी ही तुमची एक सामर्थ्याची बाजू आहे याची खात्री बाळगा व्यवसायातील स्पर्धक व विरोधक तीव्र वृत्ती सोडून सहकार्याचा हात देतील व्यापारात नवे तेज निर्माण करण्यात यश येईल. शेअर्स व इतर व्यापारी वायदे अचूक उतरतील. बेकारांना आता फारच थोडा काळ त्रासाचा उरलेला आहे शुभ ९-१०.

**महिलांना :** नोकरीत चांगले वर्चस्व प्रस्थापित होईल.

**विद्यार्थ्यांना .** शिक्षणासाठी परदेशी जाण्याची संधी मिळेल.

**मीन : प्रगतीला वेग**

अनुकूल काळ आला की त्या वेळी दैवाची चक्रे अनुकूल घटना निर्माण करीत जातात. सध्या तुम्ही रथाच्या वेगाने प्रगतीचा मार्ग आक्रमीत आहात व त्यात यश येत आहे. या वेळी जे जे कराल ते ते लाभदायक ठरणार आहे जे निर्णय घ्याल ते आगामी उत्कर्षाची नांदी ठरतील. फक्त राशीत असलेला केतू व सातवा राहू याकडे अगदीच दुर्लक्ष करू नका प्रामुख्याने संसारात कडू-गोड प्रसंग निर्माण होणारच नाहीत असे नव्हे. अशा वेळी संयमाने परिस्थिती हाताळली तर सारे सुरळीत होईल. नोकरीची परिस्थिती समाधानकारक राहील. वरिष्ठांची मर्जी राहून तुमच्या नव्या योजना अथवा कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांचे धोरण तुम्हाला उपकारक असेच राहील. पत्रकार, लेखक, कलावंत यांना प्रसिद्धीचा हा काळ आहे शुभ ९-१०.

**महिलांना :** घरसंसारात अधिक लक्ष देणे आवश्यक आहे.

**विद्यार्थ्यांना :** मनाची मरगळ दूर होऊन उत्साह निर्माण होईल. □

# ' टॉलस्टॉय ' पुस्तक योजना

## पाच पुस्तके । प्रत्येकी सात रुपये । नोंदणी शुल्क पंधरा रुपये

### या योजनेत उपलब्ध होणारी पुस्तके

| पुस्तकांचे नाव | लेखक | मूल्य ( अंदाजे ) |
|---|---|---|
| १ : टॉलस्टॉय–एक माणूस | सुमती देवस्थळे | पन्नास रुपये |
| २ : महाडचा मुक्तिसंग्राम | प्रा. रा. म. बिवलकर<br>प्रा. झुंबरलाल कांबळे | वीस रुपये |
| ३ : पश्चिमेचे पुत्र | रवींद्र पिंगे | पंधरा रुपये |
| ४ : दि टच् | अशोक प्रभाकर डांगे | पंधरा रुपये |
| ५ : आर डॉक्युमेंट | अशोक जैन | दहा रुपये |

## वरील सुमारे १०० रुपये दर्शनी किंमतीची ५ पुस्तके फक्त ५० रुपयात

### योजनेसंबंधी थोडे अधिक

* योजनेतील ' महाडचा मुक्तिसंग्राम ' व ' आर डॉक्युमेंट ' ही दोन पुस्तके सभासदांनी ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात संस्थेच्या कार्यालयातून घेऊन जावीत.
* ' पश्चिमेचे पुत्र ' व ' दि टच् ' ही दोन पुस्तके सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात मिळू शकतील.
* ' टॉलस्टॉय–एक माणूस ' हे पुस्तक डिसेम्बर ७७च्या शेवटच्या आठवड्यात मिळू शकेल.
* नोंदणी शुल्क पंधरा रुपये त्वरित पाठवावे. पाचही पुस्तकांची सवलतीची किंमत + नोंदणी-शुल्क असे मिळून होणारे रुपये पन्नास एकदम पाठवले तरी चालू शकेल
* ज्याना पुस्तके रजि. पोस्टाने घरपोच हवी असतील त्याना ती जानेवारी ७८ पूर्वी एक, दोन किंवा तीन हप्त्यात सोयीप्रमाणे पाठविली जातील टपाल पाठवणी खर्च + सवलतीची न भरलेली किंमत इतक्या रकमेची व्ही. पी. सभासदाला केली जाईल. ती त्याने सोडवून घ्यायची आहे
* व्यक्तिगत ग्रंथसंग्रह हा योजनेचा मूळ हेतु असल्याने ग्रंथ-विक्रेत्यांना या योजनेत सहभागी होता येणार नाही.
* रक्कम शक्यतो म. ऑ. ने पाठवावी. चेक असल्यास वटणावळ रुपये दोन अधिक.
* चेक, ड्राफ्ट, म. ऑ. ' राजहंस प्रकाशन ' या नावे पाठवावी. सोबत नाव, पत्ता संपूर्ण असावा.

# किंवा

## १०० रुपये ठेव राजहंस प्रकाशनाकडे पाच वर्षे ठेवणारास व्याजाच्या मोबदल्यात वरील पाचही पुस्तके विनामूल्य मिळतील.

( टपाल + पाठवणी-खर्च ठेवीदाराकडे)

**' राजहंस प्रकाशन ', १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ३०.**